म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें.
विषय ना० वा
दा. क्र. ११८२४

IRBK-0111824

दा. क्र. ११८२४.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.


सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

MAY 1973

NOV 1973

JUL 1974


৬৫৪২৫
30|3|07
3420
1972





११८२४
IRBK-0111824


# प्र ति ज्ञा

पं. दा. प्र. पाठकशास्त्री







५

किशोर कादंबरिका

श्री : ५७१ [ २–६७ ]

●

©१९६७
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.

●

किशोर कादंबरिका
आवृत्ति पहिली
शके १८८८, सन १९६७

●

मूल्य रु. २–५०

●

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.
३, राउंड बिल्डिंग, मुंबई २


●

कंपोज :
बाबर व भंडारी कं.
३४२ नारायण, पुणें २

●

मुद्रक :
स. गु. घोरपडे
प्रिन्टेक्स्ट
४६४/१ सदाशिव, पुणें २





पुराणे म्हणजे आपला पुरातन, प्राचीन इतिहास. त्यांत आपल्या पराक्रमी पूर्वजांच्या अनेक तेजस्वी कृत्यांची नोंद आढळते. या पुराणांतून दोघां बालमित्रांची एक घटना निवडून ती तुमच्यासाठीं कादंबरीरूपानें देण्यांत लेखक पं. दा. प्र. पाठकशास्त्री यांनीं मोठें औचित्य साधलें आहे. हा विषय निवडण्यांत त्यांची मार्मिकता दिसून आली आहे. तुम्हांला तो आवडेल यांत शंका नाहीं. आणि पुराणांतील ही एक ऐतिहासिक कथा वाचल्यानंतर साहजिकच तुम्ही अशा कथांची आणखी मागणी करायला लागाल. कारण या कादंबरींत तुम्हांला हवें असलेलें पराक्रम, अद्‌भुतता इ. सर्व कांहीं आलेलें आहे.

१. वेगळया वाटा

२. धनुष्याची स्मरणभेट

३. प्रतिज्ञेचा उच्चार

४. भीष्माचार्यांची भेट

५. सर्वोत्तम शिष्य

६. दोन शिष्यांच्या दोन तऱ्हा

७. विलक्षण गुरुदक्षिणा

८. शिष्याचा पराक्रम

९. प्रतिज्ञेची पूर्तता

मराठी ग्रंथ ... शाखा.
५.६४२४ ... वा.
क्रमांक.. ३५८० ... दि ३०।३।५७

१

# वेगळ्या वाटा

विद्यार्थी क्रीडांगणावर जमले होते. निरनिराळ्या खेळांच्या शर्यती घेतल्या जात होत्या. विद्यार्थ्यांचे दोन गट पाडले होते. त्यांचा एकमेकांवर मात करण्याचा प्रयत्न कसोशीनें चालू होता.

प्रत्येक खेळांत चमकणारे खेळाडू दोनच—द्रुपद आणि द्रोण. केवळ योगायोगानें ते दोघेहि विरुद्ध बाजूंना झाले होते. प्रत्येकानें कोणत्या ना कोणत्या स्पर्धेत आपली बाजू विजयी करण्याचा मान मिळवला होता. द्रुपद हा पट्टीचा खेळाडू म्हणून आश्रमांत त्याचें नांव सर्वतोमुखीं होतें. पण, आजच नवीन आलेला द्रोण, त्याला चांगलाच प्रतिस्पर्धी भेटला होता. त्याच्या खेळाकडे सर्वांच्या नजरा लागल्या होत्या.

शेवटीं खेळ संपले. भेंड्यांचा खेळ झाला. श्लोकामागून श्लोक म्हटले जाऊं लागले. पाठांतरांत कच्चीं असलेलीं मुलें बाजूला पडलीं. म्हटलेल्या श्लोकाच्या शेवटच्या अक्षराचा श्लोक पहिल्यासारखा ताबडतोब सांपडेनासा झाला. आणि द्रोणाला संधि मिळाली. द्रोणाचें पाठान्तर जबरें होतें आणि स्मरणशक्ति विलक्षण होती. स्पष्ट आणि स्वच्छ उच्चारांत केलेल्या श्लोकांच्या फेंकीनें त्याचे प्रतिस्पर्धी चकित होऊन जात.

शेवटीं शेवटीं तर द्रुपदाच्या बाजूवर द्रोणानें लागोपाठ तीन वेळां श्लोक म्हणून भेंड्या लावल्या; आणि द्रोणाची फळी त्या

दिवशीं अजिंक्य ठरली. सर्वांनीं द्रोणाचा गौरव केला. त्याचा जयजयकार केला. त्यांत सर्वांप्रमाणें द्रुपदहि सामील झाला होता. द्रुपदाला द्रोणाच्या गुणांचा मत्सर वाटला नाहीं, तर आपल्याला मनाजोगा सोबती मिळाला, याचाच त्याला मनापासून आनंद झाला.

सार्‍या आश्रमांत त्या दिवशीं द्रोणाचें नांव दुमदुमत होतें.

संदीपन ऋषींच्या आश्रमांत द्रोण विद्यार्जन करण्यासाठीं आला होता. सर्व शास्त्रांत संदीपनांची गति अमोघ होती. त्यांच्या अध्यापनकौशल्याचा बोलबाला दाही दिशांना झालेला होता. त्यांची कीर्ति ऐकूनच द्रोण संदीपनांचा आश्रम शोधीत शोधीत आला होता. आश्रमांत सर्व प्रकारचे विद्यार्थी होते. श्रीमंत होते, गरीब होते. राजपुत्र होते, तसेच गरीब ब्राह्मणपुत्र पण होते. तल्लख बुद्धीचे होते तसेच सामान्य बुद्धीचेहि होते. सर्वांना आपापल्या विषयाची ओढ होती आणि प्रत्येकाचें संदीपन ऋषींकडून समाधान होत होतें. प्रत्येक विद्यार्थी आश्रमांतल्या जीवनांत अगदीं रंगून गेला होता. कारण आश्रमाचें वातावरणच तसें प्रसन्न होतें.

बाहेरून दाट झाडी असलेला आश्रम आंतमध्यें चांगला ऐसपैस होता. आश्रमांत आवश्यक असणारींच झाडें लावण्यांत आलीं होतीं. त्यांची योजनाबद्ध आंखणी करून वाढ करण्यांत आल्यामुळें आश्रमाला रेखीव स्वरूप प्राप्त झालें होतें. वृक्षांची लागवड करतांना योजना आणि परिश्रम केलेले होते. त्यामुळें तेथें नेहमीं लागणाऱ्या वनौषधी, सर्व प्रकारचीं फळें अमाप येत होतीं. बहरलेल्या सुगंधी फुलांनीं आणि रानफुलांच्या ताटव्यांनीं आश्रमांतील वातावरण सदा प्रसन्न रहात होतें.

आश्रमाच्या जवळून नदी वहात होती, त्यामुळें आश्रमाच्या मध्यभागीं असलेलें विशाल सरोवर पाण्यानें सदैव तुडुंब भरलेलें

असे. निरनिराळ्या रंगीबेरंगी कमळांनीं त्या सुंदर जलाशयाची शोभा आणखीनच वाढवली होती.

आश्रमांत भरपूर दूध देणाऱ्या असंख्य गाई होत्या. निरागस जीवन जगणारे हरणांचे कळप आणि पिसाऱ्यांचा संभार ऐटीनें मिरवणारे मोर त्या आश्रमाचें वैभव वाढवीत होते.

त्या निसर्गसंपन्न आश्रमांत पाऊल ठेवतांच द्रोणाला मोठें प्रसन्न वाटलें. कुलगुरु संदीपन ऋषींनीं आत्मीयतेनें विचारपूस केल्यानें तर त्याला पहिल्या दिवशींच आश्रम घरच्यासारखा वाटूं लागला. त्याच्याभोंवतीं गोळा झालेल्या नव्या मित्रांनीं त्याला कितीतरी प्रश्न विचारले. त्या प्रश्नांचीं उत्तरें त्यानें हंसत हंसत पण गमतीचीं दिल्यामुळें तर द्रोण थोडक्या वेळांतच सर्वांना हवाहवासा झाला.

एकानें विचारलें, "तुझं नांव काय रे ?"

"माझं नांव माहीत आहे तुला." द्रोणानें उत्तर दिलें.

"आजच तूं आलास; अन् तुझी-माझी ओळख तरी आहे का ?" त्यानें उलट विचारलें. तोंच द्रोण हंसत हंसत म्हणाला,

"तुझ्याशींच काय; आश्रमांतल्या सर्वांशीं माझी रोज गांठभेट होते." हें ऐकतांच मात्र सर्वांनाच आश्चर्य वाटलें. तसें दोघांतिघांनीं एकदम विचारलें,

"तें कसं काय बुवा ! आम्ही नाहीं समजलों."

"मग ऐका तर" द्रोणानें त्यांपैकीं एकाला विचारलें, "आपल्या या आश्रमांत सर्वजण भोजन कशावर करतात ?"

"पत्रावळीवर," त्यानें चटकन् उत्तर दिलें.

"त्या पत्रावळीवर काय ठेवतात ? सांग बरं तूं," द्रोणानें दुसऱ्या एकाला विचारलें.

" द्रोण." त्यानें लगेच उत्तर दिलें.

" मग तेंच माझं नांव. येतो ना माझ्याशीं रोज तुमचा संबंध ?" असें द्रोणानें म्हणतांच सर्वांमध्यें एकच हास्याची लाट पसरली.

या पहिल्याच संवादानें द्रोणानें सर्वांना आपलेसें केलें. आणि क्रीडांगणावर तर द्रोणानें कमालच केली.

द्रोणाचा जयजयकार चालू असतांनाच द्रुपदाच्या मनांत द्रोणाशीं गट्टी करण्याचें निश्चित झालें; आणि द्रुपदानें द्रोणाला आपल्या पर्णशालेंत नेलें.

विद्यार्थ्यांना राहण्यासाठीं मंडलवार योजना केलेली होती. वयानुरूप छोटें छोटे गट करून त्यांच्या राहण्याचीं व्यवस्था करण्यांत आलेली होती. प्रत्येक गटाला एक सुंदरशी पर्णशाला शाकारून दिली होती. त्या पर्णशालेची व्यवस्था त्या गटाच्या प्रमुखानें पाहण्याचें ठरविण्यांत आलें होतें.

अशाच एका गटाचा द्रुपद हा प्रमुख होता. तो होता मोठा हुशार, चलाख तसाच खिलाडू वृत्तीचा. कधीं कधीं 'मी राजपुत्र आहें' असा अहंकार त्याला चाटून जाई, इतकेंच. पण तें क्वचित्. एरवीं तो दिलदार अन् गुणग्राही होता.

म्हणूनच द्रोणाला त्यानें आपल्या गटांत घेतलें.

गटांतील प्रत्येकजण आपल्या सहकाऱ्यांशीं आणि मंडलांतील सर्वांशीं आत्मीयतेनें वागत असे. प्रत्येकाची वागणूक आश्रमाची आणि आश्रमाच्या कुलगुरूंची प्रतिष्ठा वाढवणारी असे. प्रत्येकजण आश्रमाशीं सहजपणेंच एकजीव झालेला होता.

प्रत्येकाचें सर्वांशीं वागणें जरी प्रेमाचें होतें तरी प्रत्येकाचा कोणी ना कोणी जिवाभावाचा मित्र होता. आणि तें साहजिक होतें. विशेष मैत्री असलेल्या जोड्या आश्रमांत प्रसिद्ध होत्या. त्यांत द्रुपद-द्रोणाच्या जोडीची प्रसिद्धि आतां विशेष होऊं लागली.

तें पाहिलें तर द्रुपद आणि द्रोण यांच्यामध्यें स्वभावाशिवाय कोणतें साम्य होतें ! द्रुपद हा राजा पुष्पदंताचा ज्येष्ठ पुत्र. पांचाल देशचा भावी राजा. तर, द्रोण हा एका सामान्य ब्राह्मणाचा मुलगा. त्याच्या घराण्यांत परंपरेनें विद्वत्ता आणि सच्चारित्र्य चालत आलें होतें, हें खरें; पण त्यांच्या जोडीला दारिद्र्यानेंहि ठाण मांडलें होतें.

कोणाहि पित्याला अभिमान वाटावा अशीच द्रोणाची तरतरीत बुद्धि होती. त्याच्या बुद्धीच्या प्रगल्भतेनेंच द्रुपदावर मोहिनी घातली होती. म्हणूनच द्रुपद आणि द्रोण यांची गट्टी जमली. दोघांच्या आवडीनिवडी सारख्या. त्यामुळें दोघांचे सारे व्यवहार मिळून चालत. दोघे एकमेकांना कधींच सोडून रहात नसत. स्नान, पाठ, भोजन इत्यादि कार्यक्रम दोघांचे जुळ्या भावांसारखे चालत. मित्र म्हणत, 'त्यांचीं शरीरें भिन्न असलीं तरी हे दोघे अभिन्नहृदयी आहेत !'

संदीपनांनाहि या दोघांच्या अभिन्न मैत्रीची जाणीव झाली होती. "अरे, द्रुपदा, द्रोण कुठं आहे रे ?" किंवा "अरे द्रोणा, द्रुपद कुठं आहे रे ? " असें विचारण्याची कधीं पाळीच येत नसे. कधीं कधीं गुरुजींना त्या दोघांची एकजीव झालेली मैत्री पाहून असें वाटायचें कीं, यांच्या मैत्रीला कोणाची दृष्ट लागली तर !

संदीपनांच्या समोर नवीन पाठ घेण्यासाठीं विद्यार्थी बसले होते. नवीन पाठ देण्यापूर्वी कालचें पाठांतर एकेक जण म्हणून दाखवीत होता. द्रोणाचें पाठांतर म्हणून झालें होतें. द्रुपदावर पाळी आली; पण त्याचें पाठांतर न झाल्यानें तो तसाच स्वस्थ बसून राहिला. संदीपनांनीं विचारलें,

"कोण ? द्रुपद ? आज तुझें पाठांतर झालें नाहीं ?"

" नाहीं गुरुदेव, " द्रुपद खालीं मान घालून म्हणाला.

" आपल्या आश्रमांत पाठांतर न करणाऱ्याला कोणती बंध ?" आहे, हें माहीत आहे ना तुला ? " गुरुदेवांनीं शांतपणें विचारले.

" *होय, गुरुदेव माहीत आहे मला,* " *द्रुपदानें उत्तर दिलें.*

" मग तीच शिक्षा तुला आज भोगावी लागणार आहे, " गुरु संदीपन थोडेसे कठोर होऊन बोलले. आवडत्या नि हुशार विद्यार्थ्याला शिक्षा करावी लागते आहे याबद्दल त्यांना वाईट वाटत होतें, पण त्यांचा नाइलाज होता.

" आज्ञा गुरुदेव " म्हणत नम्रतेनें नमस्कार करून द्रुपद खालीं मान घालून पाठशाळेंतून निघून गेला.

सर्व विद्यार्थी भोजनाला बसले होते. नेहमींप्रमाणें संदीपन विद्यार्थ्यांच्या पंक्तींतून फिरत होते. समाचार घेत फिरतांना त्याचें लक्ष दोन रिकाम्या पानांवर गेलें. तीं दोन पानें द्रुपद-द्रोणांचीं आहेत हें त्यांनीं ओळखलें. आपण फक्त द्रुपदालाच शिक्षा केली आहे, हें त्यांच्या ध्यानांत होतें. पण द्रोणहि ज्याअर्थी दिसत नाहीं त्याअर्थीं त्यानेंहि स्वतःला शिक्षा करून घेतली असावी, असें संदीपनांना वाटलें, आणि ते तडक त्या दोघांच्या निवासाकडे निघाले. पर्णशालेच्या दारांतच आंत कोणीतरी बोलतो आहे, याची चाहूल त्यांना लागली. बाहेर उभे राहूनच संदीपन ऐकूं लागले.

" द्रोणा ! हें रे काय ? तूं गेला नाहींस जेवायला ? " द्रुपद विचारीत होता.

" एक दिवस जेवलों नाहीं तर काय होणार आहे मला ? " द्रोणानें उत्तर दिलें.


" अरे पण, शिक्षा मला झाली आहे, तुला नव्हे," द्रुपद समजावणीच्या स्वरांत बोलत होता.

"होय, पण शिक्षा भोगतांना काय वेदना होतात, हें निदान कळायला तरी हवं, म्हणजे पुढं केव्हाहि ती पाठांतर न करण्याची चूक माझ्याकडून होणार नाहीं." द्रोणानें निक्षून सांगितलें.

"तें खरं आहे; द्रोणा, पण पुढं कधींकाळीं होणाऱ्या चुकीसाठीं आजच शिक्षा भोगणं बरोबर नाहीं. उलट मला शिक्षा झाली असतां तूंहि ती शिक्षा भोगावीस यांत मला मात्र या शिक्षेपेक्षां जास्त वेदना होताहेत," द्रुपद कळवळून बोलत होता.

"नको, द्रुपदा, असं नको बोलूं. अरे! तुला झालेली शिक्षा आपल्याबरोबर तशीच कोणीतरी भोगीत आहे, या जाणिवेनं कमी व्हावी, म्हणून मीच ती भोगण्याचा निश्चय केला आहे. शिक्षेच्या काळांत तुलाहि सोबत होईल. आणि मलाहि शिक्षा म्हणजे काय असते तें कळेल." द्रुपदाचा अनावर झालेला हुंदका एकदम बाहेर पडल्यानेंच द्रोणाचें बोलणें थांबलें.

कुलगुरु संदीपन आपल्या दोघां शिष्यांचा तो संवाद ऐकत निश्चल उभे होते. दोघांच्या एकजीव झालेल्या मैत्रीचें कौतुक कोणत्या शब्दांनीं करावें, हेंच त्यांना उमगेना. नकळत डोळ्यांत जमा झालेले अश्रु चटकन पुसून ते आंत जाऊन दोघांच्या समोर उभे ठाकले.



अचानक गुरुदेव पर्णशालेंत आलेले पाहून दोघांनीं चटकन् उठून प्रणाम केला. आणि हात जोडून नम्रतेनें खालीं माना घालून ते उभे राहिले.

संदीपन ऋषींच्या हाता-खालून आतांपर्यंत शेंकडों

विद्यार्थी तयार होऊन गेले होते. अनेकांचें निरागस प्रेम त्यांनीं पाहिलें होतें, अनुभवलें होतें. पण द्रोण-द्रुपदांच्या अपूर्व प्रेमानें संदीपन सद्गदित झाले होते. पण स्वत:ला सावरून संदीपन म्हणाले,

" मीं तुम्हां दोघांचं संभाषण ऐकलं. एकमेकांबद्दल जीव टाकणारं तुमचं निर्व्याज प्रेम पाहून मी भारावलों आहें. जा, तुम्ही दोघेहि जा—अन् आपापल्या पानांवर बसा. झाली शिक्षा पुरे झाली."

एकमेकांकडे पहात गुरुजींना श्रद्धेनें नमस्कार करून ते दोघे भोजनासाठीं तेथून निघून गेले.

त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहात असतांना संदीपनांच्या मनांत कां कोण जाणे, एक चमत्कारिक विचार आला, ' एकमेकांबद्दल जीव ओतण्याची केवढी ही प्रवृत्ति ! या मनोवृत्तीला न जाणो तडा गेला तर ! ...

* * *

दिवसांमागून दिवस, महिन्यांमागून महिने, वर्षांमागून वर्षें निघून गेलीं. दोघांचाहि विद्याभ्यास पूर्ण झाला होता. दोघेहि स्वत:च्या विषयांत पारंगत झाले होते. संदीपनांनाहि आपण आपली विद्या जशी गुरूपासून घेतली, ती तशीच्या तशी शिष्यांना दिल्याचें समाधान मिळालें होतें. अध्ययनाचें कार्य संपल्यानें दोघेहि कृतकार्य झाले होते. आश्रमांतील संस्कारशील वातावरणांत रंगलेल्या त्या दोघांना आश्रम सोडणें अवघड वाटत होतें; पण घरीं परत जाणेंहि आवश्यक होतें.

तशांतच एक दिवस राजदूतांकरवीं निरोप आला कीं, " विद्याभ्यास पूर्ण झाला असल्यास युवराजांनीं राजधानीस परत यावं. सर्वजण आपल्या आगमनाची वाट पहात आहेत. "

घरच्या या निरोपानें द्रुपद थोडासा अस्वस्थ झाला होता. आश्रमाचा संबंध दुरावणार, आपल्या परम मित्राला सोडून जावें लागणार, याचें त्याला मनस्वी दुःख होत होतें. आश्रमांतलें स्वतंत्र पण शिस्तबद्ध जीवन पुन्हां आपल्या वांट्याला येणार नाहीं, याची त्याला पुरेपूर जाणीव होती. या जाणिवेनेंच द्रुपद सुन्न होऊन बसला होता. इतक्यांत द्रोण बाहेरून आला. नेहमीं-सारखा द्रुपद प्रसन्न दिसला नाहीं. म्हणून द्रोणानें विचारलें,

"काय रे, कशाचा विचार करतो आहेस ?"

"तुला कळलंच असेल कीं !" द्रुपद त्याच्याकडे न पाहतांच बोलला.

"होय, मग त्यांत वाईट काय वाटून घेतोस एवढं? अध्ययना-नंतर घरीं जायलाच पाहिजे प्रत्येकाला." द्रोण समजुतीनें बोलून गेला.

"तें खरं आहे द्रोणा, पण तुला सोडून जायचं अगदीं जिवा-वर आलंय्." द्रुपदानें आपल्या खिन्नतेचें खरेंखुरें कारण सांगितलें.

"अरे, मीहि तुझ्याबरोबरच निघणार आहें. परवांच गुरुदेव म्हणत होते कीं, आतां तुम्हांला घरीं जायला हरकत नाहीं म्हणून." द्रोणाच्या या बोलण्यानें द्रुपदाला थोडें बरें वाटलें.

"मग आपण दोघेहि गुरुदेवांची परवानगी घेऊं." असें म्हणत द्रोणानें द्रुपदाला हाताला धरून उठवलें.

गुरुदेवांच्या समोर दोघेहि नमस्कार करून उभे राहिले.

काय बोलावें, घरीं परत जाण्याची परवानगी कशी मागावी, हें त्यांना कळेना. त्या दोघांचा कंठ दाटून आला होता. अश्रु डोळ्यांत मावत नव्हते. केव्हांतरी आश्रम सोडण्याचा प्रसंग येणा-रच होता. पण तो प्रसंग आतां प्रत्यक्ष उपस्थित झाल्यावर त्यांच्या

अंतःकरणांत कालवत होतें. ते दोघे तसेच खालीं मान घालून कांहीं वेळ उभे राहिले.

संदीपनांना त्या दोघांची मनःस्थिति लक्षांत येण्याला वेळ लागला नाहीं. विद्या संपादन करून विद्यार्थी परत जाण्याचे प्रसंग आश्रमांत वारंवार येत असत. पण या वेळीं त्यांनाहि एक क्षणभर गहिंवर आला. तरी पण लगेच ते म्हणाले,

"बाळांनो! तुमच्या अंतःकरणांतील वेदना मी जाणतों. आश्रम सोडण्याच्या वेळीं प्रत्येक विद्यार्थ्याची हीच अवस्था होत असते. घरची ओढ आणि आश्रमाची, आश्रमांतील सवंगड्यांची ताटातूट यांच्या कैंचींत सांपडून जीव गुदमरतो हें मला माहीत आहे."

"होय, गुरुदेव; आमची तशीच अवस्था झाली आहे," द्रोण म्हणाला.

"त्यांतहि तुम्ही दोघे एकमेकांचे–विशेषतः माझेहि आवडते आहांत. तुम्ही दोघांनीं इथं मन लावून अभ्यास केला, त्याचं फळ तुम्हांला शास्त्रांत पारंगत होऊन मिळालं आहे. तुम्ही आपल्या पालकांची इच्छा-आकांक्षा पूर्ण केली आहे. तुम्हांला माझा पूर्ण आशीर्वाद आहे. तुम्ही सुखासमाधानानं घरीं परत जा. आपलं आयुष्य आपल्या कुळाचं नांव उज्ज्वल करीत घालवा. माझा आशीर्वाद सदैव तुमच्या पाठीशीं आहे."

गुरुजींच्या आशीर्वचनानें त्यांना धीर आला. आणि कृतार्थतेच्या जाणिवेनें दोघांनीं गुरुदेवांना साष्टांग नमस्कार घातला....

आश्रमांत बातमी पसरली–'सर्वांचे आवडते द्रुपद-द्रोण आज घरीं परत जायला निघणार!'

सारे सहाध्यायी एकत्र आले होते. दोघेहि सर्वांचा निरोप घेत होते. आश्रमांतून बाहेर पडतांना त्यांचें अंतःकरण हेलावलें होतें.

सर्व विद्यार्थ्यांच्या बरोबर संदीपनहि आश्रमाच्या बाहेर दोघांना प्रेमाचा निरोप देण्यासाठीं आले होतें. कोणीहि बोलत नव्हतें.

सर्वजण आश्रमाच्या जवळून वाहणाऱ्या नदीजवळ आलें. तेव्हां द्रोण म्हणाला, " गुरुदेव आणि विद्यार्थिमित्रांनो ! तुम्ही आतां इथंच थांबा. आपल्या इष्टमित्रांना जवळच्या पाणवठ्यापर्यंत पोहोंचवावं असं शास्त्रवचन आहे ना ? गुरुदेवांचा आम्हांला आशीर्वाद आहेच. आपणां सर्वांचं असंच प्रेम आम्हां दोघांवर असूं द्या."

द्रोणाच्या या वाक्यांनीं संदीपनांना विशेष समाधान वाटलें. शास्त्रवचनाचा व्यवहारांतहि हा योग्य उपयोग करील याची त्यांना खात्री पटली.

सर्वांचा प्रेमळ निरोप घेऊन द्रोण-द्रुपदांच्या वाटचालीला सुरुवात झाली. 'आतां आपली ताटातूट होणार ' या जाणिवेनें ते दोघेहि अति अस्वस्थ झाले होते. बराच वेळ कोणीच बोललें नाहीं.

अखेर द्रुपदानेंच मौनाचा भंग केला.

" द्रोणा, तूं इथून कुठं जाणार आहेस ? "

" दुसरीकडे कुठं जाणार ? घरीं. "

" घरीं जाऊन तूं काय करणार आहेस ?"

" खरं सांगूं द्रुपदा ! तें अजून मीं ठरवलं नाहीं. "

" द्रोणा ! माझ्याबरोबर चल तूं. घरीं जाऊन काळजी लावून घेण्यापेक्षां माझ्याकडं तुला कसलीहि काळजी राहणार नाहीं. "

द्रुपदाचें हें बोलणें द्रोणाला तितकेंसें आवडलें नाहीं. पण तसें कांहीं न दाखवतां द्रोण म्हणाला, " द्रुपदा, कांहीं झालं तरी

आणि कसंहि असलं तरी तें माझं घर आहे. आणि दुसरं असं कीं, स्वतःच्या घराची स्वतः काळजी करायची नाहीं तर कोणीं ?"

"तरी पण तूं माझ्या घरीं यावंस" द्रुपद पुन्हां आर्जवानें म्हणाला.

"तें कां मला कळत नाहीं ? तुझ्या बोलण्यांतील आत्मीयता मला समजते. पण तूं अजून परतंत्र आहेस. तुझे वडील तुझ्या घराचे कर्तेधर्ते आहेत. तूं मोठा भाग्यवान आहेस द्रुपदा !" द्रोणानें विषय वदलण्याचा प्रयत्न केला.

"असूं दे रे. वडील असले म्हणून तुला यायला काय झालं ?" द्रुपदानें पुन्हां तोच विषय चालू केला.

"अरे द्रुपदा, ते आहेत म्हणून मी येत नाहीं असं नव्हे, तर तुझे वडील असतांना तूं तुझ्या जवाबदारीवर बोलावणं योग्य नाहीं म्हणून."

रेखीव शब्दांत आपण थोडें कठोर बोललों हें जाणून द्रोण समजावणीच्या स्वरांत लगेच म्हणाला,

"द्रुपदा, तुला सांगून ठेवतों मी. यथाकाल तूं राजा होशील, त्या वेळीं मी अवश्य येईन."

"खरंच, येशील तूं ? दे बरं वचन."

"वचन देतों मी. पण मी आल्यावर तूं मला काय देणार ?"

"माझं मन पाहतोस द्रोणा तूं ? सांगूं तुला मी काय देईन तें ?"

"हं, सांग बघूं."

"ऐक तर मग. मी राजा झाल्यावर जर तूं आलास, तर मी तुला माझं अर्धं राज्य देईन." द्रोणाच्या हातावर हात ठेवीत द्रुपदानें वचन दिलें.

" राज्याचं जाऊं दे रे ! त्या वेळचं त्या वेळीं. निदान माझी गरिबाची ओळख ठेव म्हणजे पुरे. " द्रोणानें टाळी देत म्हटलें.

द्रुपद थोडासा चमकला. " वा ! द्रोणा, हीच परीक्षा केलीस माझी तूं ! " तो थोडा खिन्नतेनें बोलला.

असे दोघेहि बोलत बोलत बरेच चालून आले होते.

या परिसरांत पुन्हां ते कशाला येणार होते ? आलेच तर गुरुदक्षिणा द्यायला. त्या रम्य परिसराचें दर्शन घेत चालतांना रस्त्याला दोन वाटा फुटल्या. येथूनच त्यांच्या जीवनाच्या दोन वेगवेगळ्या वाटा फुटत होत्या खरोखरी.

दोघेहि थांबले. एकमेकांकडे पहात राहिले. आश्रमांतील जीवन कसें चुटकीसारखें निघून गेलें. तो जीवनपथ त्यांच्या मनश्चक्षूंपुढून सर्रकन् निघून गेला. उभयतांनीं भोगलेल्या सुखदु:खांच्या आठवणी त्यांच्या नजरेंत सामावल्या होत्या. डोळेच बोलूं लागले. अश्रूंची भाषा चालू झाली. आणि दोघांनीं एकमेकांना कडकडून मिठी मारली.

हळूहळू मिठी सैल झाली. पुन्हां एकदां एकमेकांकडे पाहून दोघांचें पाऊल आपापल्या मार्गावर पडलें. पायांना गति आली. अबोल झालेलीं जड अंत:करणें स्मृतींनीं आणखी जड झालीं होतीं.

अखेर, पुन्हां पुन्हां वळून पाहणाऱ्या त्या दोघांना गर्द वन-राईनेंच एकमेकांपासून दूर नेलें.

● ●

धनुष्याची

२

# स्मरण-भेट

" आई ! आई ! मला दूध दे ग " बाळ अश्वत्थामा पळत पळत घरांत आला, अन् आईच्या पाठीशीं झळंबत म्हणाला.

" देतें हं बाळ ! थांब थोडा वेळ." कृपी अश्वत्थाम्याला एवढें म्हणाली मात्र, बाळानें लगेच भोकाड पसरलें.

" तूं आतांशा वेळच लावतेस दूध द्यायला, अं ..अं...दे ना मला लवकर दूध ! मला खेळायला जायचंय् अं....अं "

" बाहेर दादा आले का बघ बरं जरा. तूं परत यायच्या आंत मी दूध तयार ठेवतें, हं जा, जा, लवकर."

बाळ पळत पळत बाहेर गेला डोळे पुसत. दादा बाहेर नव्हतेच. तसाच तो घराच्या बागेंत फाटकाजवळ आला. लांबवर दादा कुठेंच दिसले नाहींत, तसा तो पुन्हां पळत निघाला तो आईच्या पुढ्यांत येऊन उभा राहिला.

" दादा कांहीं आले नाहींत, हं. तूं मला दूध दे बरं."

" हं, हें घे, टाक पिऊन लवकर." कृपीनें वाटी पुढें ठेवली.

रोजची वाटी अश्वत्थाम्यानें तोंडाला लावली. एकच घोट घेतला असेल, लगेच ती वाटी खालीं ठेवीत तोंड वेडेंवाकडें करीत तो म्हणाला, " हें काय दूध आहे ?"

" होय रे, हें आपल्या घरचं दूधच आहे."

" मग रोजच्यासारखं कां नाहीं लागत तें ?"

" बाळ तूं शहाणा आहेस ना ? मग मी सांगीन तुला कधीं तरी, आधीं हें पी अन् जा खेळायला. " कृपीनें त्याच्या हनुवटीला हात लावीत वाटी स्वतःच त्याच्या तोंडाला लावली. आईच्या स्नेहाळ दृष्टीकडे पहात अश्वत्थाम्यानें चाखतमाखत तें दूध संपवलें.

" जा आतां खेळायला." असें आईनें सांगतांच अश्वत्थाम्यानें धूम ठोकली. पाठमोऱ्या अश्वत्थाम्याकडे कृपी पहात राहिली. तिच्या डोळ्यांत अश्रु तरारले. हें असें किती दिवस चालणार ! या विचारानें तिचें मस्तक सुन्न झालें.

द्रोण घरांत आला तरी कृपी तशीच बसली होती. तिला पाहतांच तो म्हणाला, " तुझ्या डोळ्यांत आज पाणी कां ?"

" तुम्हांला तें आज दिसलं इतकंच, रोजचंच झालं आहे तें."

" मग आज तरी तें कां दिसलं ?" द्रोणानें उलट विचारलें.

" माझा आज नाइलाज झाला म्हणून. "

" म्हणजे ? मी नाहीं समजलों. सांग बरं खरं काय झालं तें. "

" काय सांगण्यासारखं आहे त्यांत ? आपल्या भूषणाची कथा ! "

" होय, दारिद्र्य आपलं भूषण आहे खरं. अग, लक्ष्मी नि सरस्वती एकत्र नांदल्याहेत का कधीं ? "

" तें मला माहीत आहे हो. पण आपल्या बाळाला का त्याचा त्रास ? "

" बाळापर्यंत पोहोंचलं म्हण कीं आपलं वैभव ! "

" होय, अखेर आज कळलं त्याला. इतके दिवस घालवले मीं कसे तरी; पण आज मात्र माझा निरुपाय झाला. "

" काय झालं तें नेमकं सांग मला. "

" आजपासून बाळभूक बंद झाली आहे. काल तसा निरोप

आला होता. दूध घ्यायचं तरी कसं ? आपला व्यवहार तरी आहे का तसा ? ”

“ नाहीं खरा. मग बाळाला काय दिलंस ? ”

“ दिलं दुधासारखं पांढरं कांहींतरी. ”

“ कांहींतरी म्हणजे ? ”

“ कोमट पाण्यांत साळीचं पीठ कालवून दिलं. ” कृपीला हें सांगतांना हुंदका आवरेना. द्रोणालाहि कसेंसेंच वाटलें. पण तो तरी काय करणार ? विद्वान् म्हणून द्रोण दररोज शेंकडों नमस्कार स्वीकारीत होता. पण रोखीनें व्यवहार करायला त्याच्या कडोसरीला छदाम नव्हता.

आश्रमांतून घरीं परत आल्यापासून त्याचें हें असेंच चाललें होतें. आश्रमांत विद्यार्थ्याला लागणाऱ्या सर्व सोयी उपलब्ध होत्या. गरजेच्या वस्तु, निवास-भोजनाची व्यवस्था कुलगुरूंकडूनच होत असल्यानें चिंतेचा प्रश्नच नव्हता.

आश्रमांत झालेले संस्कार मूळच्या घरांतील वळणाला पोषकच होते. परंपरागत अध्ययन-अध्यापन करणारें तें कुटुंब. आदरानें जे बोलावतील आणि देतील त्याचाच स्वीकार करायचा. वेळप्रसंगीं भिक्षा वृत्तीनें रहायचें. घरांत सांठा म्हणून करायचा नाहीं. केवळ हातावरचें पोट हें त्यांच्या संसारांत यथार्थ होतें.

द्रोणाच्या संसाराला गृहिणीहि उत्तम मिळाली होती. जांवयाची विद्वत्ता पाहूनच कृपाचार्यांनीं आपली मुलगी द्रोणाच्या पदरांत घातली होती. आज ना उद्यां जांवई नांव काढल्याशिवाय राहणार नाहीं, याची त्यांना मनोमन खात्री होती. कृपीलाहि आपल्या पतीच्या विद्वत्तेचा अभिमान होता. पतीच्या दरिद्री संसाराशीं ती एकरूप झाली होती आणि आहे त्यांत समाधान मानून राहूं लागली होती.

कोणापाशीं कशाचीहि याचना करायची नाहीं, हा द्रोणाचा बाणा असल्यानें लोकांना त्याच्या घरांतील दारिद्र्याची कल्पना येत नसे. भिक्षा मागणें, हा वर्णधर्म म्हणूनच तो पाळत होता. त्याच्या मर्यादा सांभाळण्यास कृपीनेंहि हातभार लावला होता, पण व्यवहारांत तिला फार नडूं लागलें. आतां घरांत तिसरें माणूस आल्यानंतर तर तिच्या संसाराची परवड होऊं लागली. आणि तशांतच हा प्रसंग घडला.

तिच्या डोळ्यांतून वाहणाऱ्या अश्रुधारा पहात द्रोण उभा होता.....शेवटीं कृपीलाच राहवलें नाहीं. ती कधींहि द्रोणाला निक्षून बोलली नव्हती. पण आपल्या संसाराच्या उन्हाळ्याची झळ बाळाला पोहोंचल्यानें तिला आतां असह्य झालें. ती पोट-तिडकेनें बोलली,

"हें पहा, आतां ही परिस्थिति दुस्सह झाली आहे. यावर कांहींतरी उपाय शोधलाच पाहिजे."

"मग तूंच सांग, मी काय करूं तें," द्रोणानें मनापासून विचारलें.

"मी सांगेन तें ऐकणार आहांत का ?"

"योग्य असेल, तर निश्चित करीन."

"तर मग ऐका. तुम्ही रेणुकापुत्र परशुरामाकडे जा. तो अत्यंत उदार आहे, अशी त्याची कीर्ति आहे. ब्राह्मणाला तो कधींहि विन्मुख पाठवीत नाहीं. तुमच्या योग्यतेप्रमाणें तुम्हांला लाभ होईल असं मला वाटतं."

द्रोणाला कृपीचा विचार योग्य वाटला. आणि त्यानें होकार दिला.

एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय केलेल्या परशुरामाचा दरारा विलक्षण होता. त्याच्या समोर जायचें म्हणजे तितकीशी सोपी

गोष्ट नव्हती. तरीहि द्रोणानें त्याच्याकडे जाण्याचें निश्चित केलें.

निघण्याच्या वेळीं त्याचें अंतःकरण भरून आलें. कृपीचा निरोप घेतांना त्याच्या तोंडून अस्फुट शब्द बाहेर पडले, "नीट जपून रहा. बाळाला सांभाळ."

कृपीनें फक्त मान हलवली अन् डोळ्याला पदर लावला. बाळ अश्वत्थामा जवळच उभा राहून बघत होता. त्याला समजलें कीं बाबा लांब गांवाला निघालेत. तो चटकन् वडिलांच्या गुडघ्याला मिठी मारीत म्हणाला,

"बाबा ! तुम्ही आम्हांला सोडून दूर चाललांत का ? रागावलांत माझ्यावर ! मी आतां हट्ट कधीं करणार नाहीं."

"नाहीं रे बाळ ! तूं हट्ट करतोस म्हणून नाहीं मी जात." द्रोणानें अश्वत्थाम्याला उचलून घेत म्हटलें.

"मग कां जातां तुम्ही ?"

"तुझा हट्ट पुरवतां यावा म्हणून मी जातों आहें."

"मी येऊं तुमच्याबरोबर ?"

"नको, नको, तूं शहाणा आहेस ना ! आईला एकटी राहूं दे का ? सांग बरं."

"नाहीं, मी आईला नाहीं एकटी राहूं देणार !"

"तर मग जा बरं, आईकडे."

खालीं सोडतांच अश्वत्थामा आईला जाऊन बिलगला.

दोघांकडे पाणावलेल्या डोळ्यांनीं पहात द्रोण मार्गस्थ झाला.

चालतांना पायांतल्या खडावांचा चट्चट् असा आवाज येत होता. चालण्याच्या गतीबरोबर मनांत विचारांनाहि गति मिळाली.

—'आपल्याला घरप्रपंचासाठीं घर सोडण्याची पाळी यावी हं ! पण आपलं काम होईल का ? परशुराम मोठे कठोर आहेत

म्हणतात. त्यांना आपल्याबद्दल कांहीं कणव येईल का ? का हात हालवीत तिथून परतावं लागेल ? निघालों आहें खरा, काय व्हायचं असेल तें होईल. विचारांच्या तंद्रींत तो भराभर चालत होता. छोटे-मोठे नाले ओलांडीत होता. दाट अरण्यांतून मार्ग काढत होता. सपाट मैदानावरून सप्सप् चालत होता. त्याचें लक्ष निसर्गसुंदर दृश्यांकडे नव्हतें. पक्ष्यांच्या मंजुळ कूजितानें त्याचे पाय थांबले नव्हते. मोराचा मनोहर पिसारा पाहून तो थबकला नव्हता. त्याला भगवान परशुरामांचा आश्रम गांठायचा होता. त्याच तंद्रींत तो चालत होता.

अखेर परशुरामांच्या आश्रमांत त्यानें पाऊल ठेवलें.

आश्रम साधाच होता. तेथील मोठमोठ्या झाडांच्या बुंध्यावरून तो फार प्राचीन असावा, याची कल्पना येत होती. तेथें माणसांची तितकीशी वर्दळ नव्हती. जागजागीं पूर्वीं यज्ञ केल्याचीं कुंडें दिसत होतीं. त्यांत आतां झाडांचीं वाळलेलीं पानें भरून गेलीं होतीं.

दुतर्फा झाडीमधून मोठ्या रस्त्यानें द्रोण निघाला. आश्रमाच्या परिसरांत मोठे रस्ते होते आणि ते आश्रमाच्या मूळ वस्तीकडे जाऊन पोहोंचत होते. चालत चालत द्रोण पर्णशालेच्या प्रवेशद्वारापाशीं येऊन पोहोंचला.

समोरच एका छोट्याशा व्यासपीठावर भगवान् परशुराम बसले होते. त्यांची ध्यानधारणा चालू होती.

वयोवृद्ध असलेल्या परशुरामांची मुद्रा तेजाळ होती. पांढऱ्या झालेल्या जटा-दाढीवरून त्यांच्या मुद्रेवर सौम्यपणा जाणवत होता. एकेकाळीं खदिरांगारासारखे असणारे डोळे आतां शांत दिसत होते. अर्धोन्मीलित दृष्टि नासिकाग्रावर स्थिर झाली होती. पद्मासन घालून ताठ बसलेल्या त्यांच्या तेजस्वी आकृतीपुढें येऊन द्रोण आदरानें खालीं बसला. आपोआपच त्याचे हात जोडले गेले.

काय बोलावें, हें न उमगल्यानें तो तसाच विनम्रभावानें हात जोडून बसला होता. दृष्टि परशुरामांवर स्थिर झाली होती. इतक्यांत त्याच्या कानांवर गंभीर शब्द आले,

" बाळ ! चिरंजीव हो ! कोण आहेस तूं ? "

" भगवन्, मी एक ब्राह्मणपुत्र आहें. द्रोण माझं नांव."

" घाबरूं नकोस. बराच लांबून आलेला दिसतोस. जा ! स्नान-संध्या कर, फलाहार करून विश्रांति घे. "

द्रोणाची कल्पना साफ चुकली. त्याला वाटणारी भीति पार पळाली, वीर परशुरामांच्या पहिल्याच भेटींत त्याचें चित्त हरखलें.

आश्रमाच्या विशाल सरोवरांत चार हात मारून त्याचें शरीर मोकळें झालें. संध्यावंदनादि आन्हिक आटोपून तो पर्णशालेकडे निघाला. रस्त्यांत निरनिराळीं फळझाडें फळभारांनीं वांकलीं, होतीं. हातीं येतील तीं पिकलेलीं फळें त्यानें यथेच्छ खाल्लीं. झऱ्याचें स्वच्छ पाणी पिऊन थकलेला त्याचा जीव ताजातवाना झाला. पर्णशालेच्या एका कोपऱ्यांत विश्रांतीसाठीं टेकला तों तेथेंच त्याला गाढ झोंप लागली. दोन-तीन तासांची झोप झाल्यानें त्याचें श्रान्त शरीर हलकें झालें. सारा शिणवटा निघून गेला.

दुपार टळून गेली होती. आश्रमांत तशी विशेष वर्दळ नव्हतीच. परशुरामांच्या निवासांत तर अगदीं मोजकीच शिष्यमंडळी वावरत होती. परशुरामांच्या जवळपास कोणीहि नव्हतें. परशुराम स्वस्थ चित्तानें बसून चिंतन करीत होते.

द्रोण हलक्या पावलांनीं त्यांच्या पुढ्यांत जात असतांनाच त्यांची दृष्टिभेट झाली.

" ये, बैस." परशुराम म्हणाले.

सांष्टांग प्रणिपात करून द्रोण थोड्या अंतरावर खालीं बसला

मराठी ग्रंथ

" चिरंजीव हो ! कां आला होतास बाबा, तूं ?"

" संसारी जीव आपणांकडे ज्यासाठीं येतात, त्यासाठींच."



" संसारी आहेस म्हण कीं ! "

" होय, सपुत्रकलत्र आहें मी."

" अध्ययनाशिवायच संसारांत पडलास काय ?" परशुरामांनीं पूर्वेतिहास जाणण्याच्या हेतूनें विचारलें.

" नाहीं, भगवन् ! थोडाफार विद्याव्यासंग केला आहे मीं. "–

" कोणाकडे ? "

" संदीपन महामुनींच्या आश्रमांत. "–

" ठीक आहे. मग संसारांत कां अडचण आली ?"

" योग्य ती संभावना होत नाहीं म्हणून."

" मग मी काय तुझी संभावना करणार ?– "

" भगवन् ! असं कसं होईल ? आपल्या दातृत्वाची कीर्ति ऐकूनच मी इथवर आलों आहें, " द्रोणानें येण्याचा हेतु सांगितला.

" अस्सं ? आलं माझ्या लक्षांत. पण त्या दातृत्वाचा आतां काय उपयोग ? "

" म्हणजे ? मी नाहीं समजलों, भगवन् !"

" अरे, माझ्याकडे आतां देण्यासारखं कांहीं राहिलं नाहीं. मीं माझं सर्वस्व ब्राह्मणांना दान देऊन टाकलं आहे. "

" भगवन्, मग मीच उशिरा आलों म्हणायचा ! माझं नशीब ! "

"एवढा शिकलासवरलेला तूं, आणि नशिबाच्या गोष्टी बोलतोस ! "

"मग काय म्हणूं, भगवन् ? माझी परिस्थिति आणि आपलं दातृत्व यांचा मेळ बसला नाहीं." द्रोणाच्या आवाजांत नैराश्य जाणवत होतें.

"याबद्दल मलाहि वाईट वाटतं, संसारी माणसाच्या गरजा आणि परिस्थिति यांची सांगड बसणं कठीण ! मला तुझ्या परिस्थितीची जाणीव झाली आहे." परशुरामांच्या बोलण्यांत दिलासा होता.

"हें मी माझं भाग्य समजतों, भगवन् !"

"तुझं भाग्य उजळण्यासाठीं कांहींतरी करावं असं मला वाटूं लागलं आहे.

"मग त्यासाठीं मीं काय करावं ? आपण आज्ञा द्या ! "

"कांहीं काळ तुला या आश्रमांत रहावं लागेल."

"आनंदानं राहीन मी, मर्यादेचं उल्लंघन होत नसेल तर एक विचारूं ? " द्रोण धाडसानेंच पण भीत भीत म्हणाला.

"द्रोणा, आतां तुला मीं आपला म्हटलं आहे. घाबरूं नकोस-खुशाल विचार." भगवन् परशुरामांच्या या वाक्यांनीं द्रोणाच्या मनावरचें दडपण दूर झालें. वज्रस्वरूप परशुरामांचें अंतःकरण नवनीतासारखें मृदु आहे, याची द्रोणाला खात्री पटली. सारा आश्रम आणि आश्रमाचा परिसर त्याला घरच्यासारखा वाटूं लागला.

"भगवन्, आपण मला आपलं म्हटलं यांतच मी कृतार्थ झालों."

"द्रोणा, तसं नव्हे. तुला कृतार्थ व्हायला परिश्रम करावे लागतील !"

"अवश्य करीन मी, " द्रोण निर्धारानें बोलला.

"तर मग ऐक ! तुला प्रथमच मीं सांगितलं आहे कीं माझ्या-

जवळ आतां कांहींच राहिलं नाहीं. पण एक गोष्ट मात्र माझ्या-जवळ आहे. ती म्हणजे धनुर्विद्या. ती तुला देण्याचा माझा विचार आहे." भगवान् परशुरामांनीं द्रोणाकडे, रोखून पहात म्हटलें.

विद्याव्यासंग केलेल्या द्रोणाला तो विचार जणुं वरदानच वाटला. धनुर्विद्येच्या कौशल्यावर एकवीस वेळां निःक्षत्रिय पृथ्वी केलेल्या चंड-प्रतापी परशुरामांचे बोल होते ते. क्षणभर भानच हरपलें द्रोणाचें.

"ती तूं ग्रहण करशील ?" या परशुरामांच्या प्रश्नानें द्रोण भानावर येऊन म्हणाला, "भगवन् ! कां नाहीं ? आळशावर गंगाच आली म्हणायची."

"उद्यां तुला पहिला पाठ देईन मी, शुभ मुहूर्तावर."

"आज्ञा गुरुदेव !" द्रोणानें सांष्टाग नमस्कार घातला.

द्रोणासारखा शिष्य आणि भगवान परशुरामासारखा गुरु. जणूं मणिकांचनयोग. विद्याभ्यासानें द्रोणाची बुद्धि प्रगल्भ झालेली. ग्रहणशक्तीनें चरम सीमा गांठलेली. त्यांत परशुरामांची त्याच्या-विषयींची आत्मीयता. त्यामुळें अध्ययन-अध्यापनाला विलक्षण गति आली. वीर परशुरामांचें धनुर्विद्याकौशल्य वादातीत होतें. त्याचा प्रत्यय द्रोणाला वेळोवेळीं येऊं लागला.

आतांपर्यंत धनुष्याचा टणत्कार घमेंडखोर क्षत्रियांचा नक्षा उतरण्यासाठीं परशुरामांनीं केलेला होता. तीक्ष्ण धार असलेला परशू आणि कमावलेल्या प्रत्यंचेच्या धनुष्यानें उन्मत्तांच्या रक्ताचे डोह आणि मुंडक्यांच्या राशी निर्माण केल्या होत्या. अलीकडे तो परशू आणि तें धनुष्य कोपऱ्यांत विश्रांति घेत पडलें होतें. त्या धनुष्याचा टणत्कार पुन्हां होऊं लागला होता, अर्थात् केवळ अध्यापन करण्यासाठीं.

परशुरामांनीं द्रोणाला धनुर्विद्या दिली ती त्यांतील बारकाव्यां-सह. त्यांतील रहस्य त्यांनीं शिष्याला समजावून दिलें. आणि

त्याचबरोबर धनुर्विद्येचें मोठेपणहि द्रोणाच्या मनांत बिंबवलें.

"द्रोणा, तूं धनुर्विद्येचे पाठ कित्येक वेळां माझ्यापेक्षां सरस करतोस, त्या वेळीं मला पुनःप्रत्ययाचा आनंद होतो बघ." परशुराम सात्त्विक समाधानानें बोलत होते.

"गुरुदेव ! मला हातीं धनुष्य धरतां येऊं लागलं, हें आपल्या कृपेचं फल आहे. माझी सरसता असेलच तर त्यांत आपलंच मोठेपण आहे."

या विनम्र वचनांनीं परशुरामांना द्रोणाबद्दल वाटणारी आत्मीयता दुणावायची आणि त्यांच्या सहृदय अंतःकरणांतून बोल बाहेर पडायचे.

"द्रोणा ! ही धनुर्विद्या आपल्या भारतवर्षाचं भूषण आहे. या विद्येंत तसूभर चुकीलाहि क्षमा नाहीं. चित्ताची एकाग्रता बाणाच्या अग्राहून सूक्ष्म असावी लागते, तरच लक्ष्यवेध अचूक होतो. द्रोणा, हीं पथ्यं तूं कांटेकोर सांभाळलींस, म्हणूनच माझी धनुर्विद्या तुझ्या ठिकाणीं संक्रान्त होऊं शकली, याची फलप्राप्ति तुला तुझ्या आयुष्यांत निश्चित होईल."

परशुरामांच्या या आशीर्वादरूप बोलांनीं द्रोणाला अंगभर मांस यायचें. आपल्या विद्वत्तेला लाभलेली धनुर्विद्येची जोड आपला भविष्यकाळ गाजवील याबद्दल त्याला खात्री पटायची. आपल्या कुटुंबाचीं दैन्याचीं लक्तरें झटकलीं जातील. मानसन्मानाचें सुखी जीवन जगणें कठीण होणार नाहीं; या विचारांनीं द्रोणाला बरें वाटायचें.

आश्रमांत वागण्याचा त्याला अभ्यास होताच, फक्त बदल होता तो व्यासंगाचा. निरनिराळे लक्ष्यवेध वेगवेगळ्या स्थानांवरून करण्यांत त्याला वेळ अपुरा पडे. त्याच्या धारदार बुद्धीला परिश्रमाची जोड मिळाली होती आणि त्यांतच गुरुजींच्या पूर्ण

आशीर्वादाची भर पडली होती. त्यामुळें द्रोणाच्या रूपानें फार मोठा धनुर्धारी आकार घेत होता.

धनुर्विद्येबरोबरच इतर शस्त्रविद्यौहि द्रोणानें आत्मसात् केली. भगवान् परशुरामांनीं त्याला अस्त्रविद्या देण्यांतहि उणीव ठेवली नाहीं. शास्त्रास्त्रविद्येसह धनुर्विद्येंत द्रोण निष्णात झाला. परशुरामांची खात्री पटली. आपली विद्या या जगांत पुन्हां वेगळ्या रूपांत प्रकट होणार हें निश्चित झालें. तेव्हां ते म्हणाले,

"द्रोणा ! आतां पुन्हां तीच पाळी आली आहे."

"कोणती गुरुदेव ?"

"तुला देण्याला आतां माझ्याजवळ कांहीं उरलं नाहीं."

"असं कसं होईल, गुरुदेव ?"

"होय, द्रोणा, तसंच झालं आहे. मी माझी संपूर्ण धनुर्विद्या तुला देऊन टाकली आहे. विद्या संक्रांत केल्याचं मला पूर्ण समाधान आहे."

"गुरुदेव ! शिष्याला यापरतं दुसरं भाग्य तें कोणतं ?"

"अरे, तुला माहीत आहे ना, सूर्याचे किरण मातीच्या ढेकळावर पडतात आणि रत्नावरहि पडतात. पण प्रकाशतं रत्नच ना ?"

"होय गुरुदेव ! पण...माझी आणि रत्नाची..."

"...योग्यता आहे. आणि ती मीं केलेली आहे, हें लक्षांत ठेव ! द्रोणा, तुझा भविष्यकाल उज्जवल आहे. तुझी धनुर्विद्या तुझी कीर्ति त्रिखंडांत करील. माझा तुला पूर्ण आशीर्वाद आहे."

भगवान् परशुरामांनीं आशीर्वाद देण्यासाठीं हात वर करीत पुन्हां म्हटलें, "आजपासून तूं द्रोणाचार्य झालास. आचार्यत्वाची योग्यता तुला प्राप्त झाली आहे. पृथ्वीच्या पाठीवर कोठेंही गेलास तरी तुला कांहीं कमी पडणार नाहीं. तुझ्या सर्व इच्छा-आकांक्षा पूर्ण होतील."

"भगवन् ! या देहांत चेतना असेपर्यंत मी आपण दिलेल्या विद्येशीं प्रतारणा करणार नाहीं." द्रोण बोलून गेला.

" तें योग्यच आहे, द्रोणा ! त्यासाठींच मी तुला माझी एक प्रिय वस्तु भेट म्हणून देणार आहें " आणि असें म्हणून परशुरामांनी स्वतःचें सुंदर पण दणकट धनुष्य हातांत घेऊन द्रोणाला अधिक जवळ बोलावलें. ते म्हणाले, " हें धनुष्य तुला मी माझी स्मरण-भेट म्हणून देत आहें. "

हर्षभरल्या हृदयानें आणि विनम्र हातांनीं धनुष्याचा स्वीकार करीत द्रोण म्हणाला,

" जशी आपली आज्ञा गुरुदेव ! "

" या धनुष्यानं माझ्या सर्व इच्छा-आकांक्षा पूर्ण केल्या आहेत. सारा त्रिखंड याच्या टणत्कारानं एके काळीं व्यापून गेला होता. तें हें धनुष्य. तुझ्या संकटकाळांत ह्या धनुष्याचा तुला उपयोग होईल. जा, तुला उदंड आयुष्य आणि कीर्ति लाभो ! "

" धन्य झालों मी गुरुदेव ! "

दोन्हीं हातांत असलेल्या धनुष्यावर विनम्र भावानें नतमस्तक झालेल्या द्रोणाचे अश्रु टप टप गळूं लागले होते.



# प्र ति ज्ञे चा

## ३

# उ च्चा र

राज्यारोहणाच्या वाढदिवसानिमित्त सारी नगरी शृंगारली होती. राजमार्गावर तर गुढ्यापताकांची गर्दी झाली होती. सडे घातले होते. रांगोळ्या काढल्या होत्या. मोठमोठ्या कमानी उभारल्या होत्या. लोक दाटीवाटीनें उभे राहिले होते. राजमार्गावरून मिरवणूक जाणार होती. सर्वांची एकच इच्छा! निदान वर्षाकांठीं एकदां तरी राजदर्शन व्हावें. एरवीं राजाच्या दंतकथाच घरांत बसून ऐकायच्या. राजदरबारांत घडलेले बरेवाईट प्रसंग कानांवर येतील तेवढेच. पण आजच्या दिवशीं ऐश्वर्यासह राजा पहायला मिळे. म्हणूनच ही सारी गर्दी.

"सम्राट, द्रुपद महाराजांचा जयजयकार असो!" या ललकारीनें मिरवणुकीकडे राजरस्त्यावरील जनसमुदायानें लक्ष वेधलें.

सुवर्णघंटांचा आवाज करीत मंदगतीनें चालणारा गजराज, भलामोठा वाजवला जाणारा चौघडा घेऊन जाणारा प्रशस्त गाडा. निवडक सैनिकांचे निरनिराळे ताफे, शस्त्र-साधनांनीं सुसज्ज असलेलें घोडदळ, त्यांच्या दोन्ही अंगांना जयकार करणारे भालदार, त्याच्यामागें राज्यांतील प्रतिष्ठित मंडळी, राजघराण्यांतील अधिकारी मंडळी, अशी राजशाही थाटाची भव्य मिरवणूक चालली होती.

अखेर राजाचा सुवर्णरथ आला. पांढरे शुभ्र देखणे सहा घोडे तो ओढीत होते. मिरवणुकीतील साऱ्या ऐश्वर्याला साजेसा रथ आणि रथाला योग्य ती व्यक्ति लाभली होती. महाराजांची दृष्टि चौफेर फिरत होती. आपल्या ऐश्वर्याच्या परिणामाचा अंदाज घेत होती.

द्रुपदराजाचें वैभव राजमार्गावर प्रकट झालें होतें, तें पाहण्यांत राजधानीची जनता दंग झाली होती. दाटीवाटीमुळें एकत्र आलेले स्त्री-पुरुष बोलत होते.

"पाहिलंत का? याला म्हणतात वैभव! राजैश्वर्य!"

"आहे खरं, पूर्वीपेक्षां आतांच्या महाराजांचा थाट वेगळा आहे खरा."

"अहो! वेगळा काय म्हणतां? पित्याहून पुत्र वरचढ म्हणा!"

"ऐश्वर्याचं असूं द्या हो! पण जनतेच्या प्रेमाचं काय? तें वरचढ राहिलं, निदान तेवढं तरी टिकलं म्हणजे पुरे!"

"म्हणजे? राजघराण्याबद्दलचं प्रेम पातळ झालं म्हणा कीं!"

"तसं नव्हे हो, तुमच्या-आमच्या प्रेमाची जरुरी आहे कोणाला?"

राजाचा रथ समोरच थांबला, तसा हा संवादहि थांबला.

राजाच्या हालचालींत ऐश्वर्याचा दिमाख होता; पण सात्त्विक समाधानाचा अभाव जाणवणारा होता. त्याचे डोळे कांहींतरी शोधीत होते. आपल्या सामर्थ्याच्या दराऱ्यानें ही जनता जमली आहे, हें त्याला निश्चित माहीत होतें. जनतेच्या चेहऱ्यावरील भावभावना कळत होत्या त्याला. आपल्या वडिलांच्या दर्शनाला आसुसलेल्या जनतेचें स्मरण त्याला होत होतें. त्या वेळीं श्रद्धेनें, आदरानें नतमस्तक होणारी हीच का ती प्रजा, असा संभ्रम त्याला पडत होता.

आणि खरेंच होतें तें. राजा द्रुपद बलवान् असला, सामर्थ्य-संपन्न असला तरी 'प्रजेचें अनुरंजन करणारा राजा' म्हणून जनमानसांत त्याला स्थान मिळालें नव्हतें. केवळ त्याला भिऊनच त्याच्या दर्शनाला लोक जमले होते. नेमकें हेंच शल्य त्याला बोचत होतें. आणि त्याचे डोळे पूर्वींच्या श्रद्धाळू जनतेचा शोध घेत होते.

राजा म्हणून केलेल्या वंदनाचा स्वीकार करीत असतां द्रुपदाची दृष्टि एके ठिकाणीं स्थिरावली. हे तेजस्वी डोळे आपल्या-वर रोखून पाहणारी एक व्यक्ति आपल्या आयुष्यांत पूर्वी केव्हां-तरी येऊन गेली आहे, असें त्याला मनोमन पटलें.

पण हा कोण असावा ? हें मात्र त्याच्या ध्यानांत येईना. आणि कसें येणार तरी लक्षांत ? कारण आत्मीयतेनें कोणाबद्दल विचारच करायचा नाहीं, हा द्रुपदाचा स्वभाव बनला होता.

त्या व्यक्तीच्या डोळ्यांतले भाव त्याला जणुं सांगत होते— 'बघ, म्हणत नव्हतों मी ! माझी आठवण तरी राहील का तुला ? '

पण सम्राट् द्रुपदाला त्याचें काय होय ?

राजाचा सुवर्णरथ हलला. मिरवणूक पुढें निघून गेली. जनता पांगली. पण ती व्यक्ति मात्र तेथेंच उभी होती.

द्रोणाचार्य होते ते ! भगवान् परशुरामांकडून धनुर्विद्या संपादन केलेले द्रोणाचार्य. परशुरामांची अनुज्ञा घेऊन ते निघाले. वाटें-तच पांचाल देश लागला, तेव्हां त्यांच्या लक्षांत आलें कीं, हाच तो देश, या देशाचा राजा आपला बालमित्र आहे; त्यानें आप-ल्याला भेटीचें निमंत्रण पूर्वींच दिलेलें आहे. आतां तो निश्चित राज्यावर बसला असेल. वैभवांत रहात असेल. आपल्याला तो

ओळखील का ? पण, आपण गेल्याशिवाय तरी तो कसा ओळखणार ! आपण जावेंच; काय हरकत आहे जायला ?

असा विचार करून द्रोणाचार्य पांचाल देशाच्या राजधानींत आले. त्या दिवशीं राजधानींत राजदर्शनाच्या मिरवणुकीची धामधूम चालू होती. अनायासें आपल्या बालमित्राचें वैभव दृष्टीला पडेल म्हणून द्रोणाचार्यही त्या गर्दींत जाऊन उभे राहिले.

शृंगारलेल्या नगरांत लोकांचे थवे राजमार्गावर लोटत होते. त्यांमधून जनतेच्या भावनांचा नि विचारांचा कानोसा घेत द्रोणाचार्य जात होते. लोकांचीं परस्परांतील बोलणीं ऐकत असतांना कुठें तरी खटकतें आहे, असें त्यांना वाटलें, आणि प्रत्यक्ष राजाचें दर्शन घडत असतांना तर त्यांची खात्रीच पटली कीं जनता राजावर मनापासून प्रेम करीत नाहीं. केवळ दराऱ्यापोटीं हे लोक गोळा झालेले आहेत.

आपल्यावर द्रुपदाची दृष्टि स्थिरावली, पण त्या दृष्टींत तो पूर्वींचा ओलावा नव्हता हें द्रोणाचार्यांच्या लक्षांत आलें. आश्रमांत सहाध्यायी म्हणून वावरणाऱ्या बाल द्रुपदाची स्नेहाळ दृष्टि त्यांच्या स्मरणांत होती. पण येथें त्याचा मागमूस नव्हता. द्रुपदांत कांहीं तरी विशेष बदल झाला आहे, हें त्यांनीं ताडलें.

'मग आपण द्रुपदाची भेट घ्यावी का नाहीं ? भेट घ्यायला काय हरकत आहे ? समजा, ओळख नाहीं दिली तर ? आपण ओळख तर करून द्यावी. आतां राजा झाला आहे तो. कामाच्या रगाड्यांत राहिली नसेल आठवण पूर्वींची. बालपणची आठवण करून दिल्यावर येईलच त्याच्या लक्षांत,' असें विचारचक्र द्रोणाचार्यांच्या डोक्यांत बराच वेळ चालू होतें. अखेर आपण भेट घ्यायचीच या निर्धारानें त्यांचें पाऊल पुढें पडलें.

मिरवणुकीचा सोहळा संपला होता. लोक घरोघर निघून गेले होते. केवळ निमंत्रितांची राजसभा राजवाड्यांत भरणार होती. त्यासाठीं खाशी निमंत्रित मंडळी आपापल्या वाहनांतून राज-प्रासादाकडे निघाली होती. त्याच राजरस्त्यानें द्रोणाचार्य निघाले. राजवाड्याच्या प्रवेशद्वारापाशीं आले. पण त्यांना आंत कोण सोडणार ?

कोणी पालख्यांतून, कोणी घोड्यावरून, कोणी रथांतून येत होते. प्रत्येकाचा परिवार त्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें होता, प्रत्येकाच्या वाहनाची व्यवस्था करण्यांत, मानकऱ्यांना राजसभेंत पोहोंचविण्याची व्यवस्था करण्यांत सारा नोकरवर्ग गुंतला होता. एका बाजूला उभे राहून द्रोणाचार्य सारें पहात होते. मानकरी मंडळी येण्याची संपली, तसे द्रोणाचार्य पुढें झाले. त्यांना पहातांच द्वारपालांची वेगळीच कल्पना झाली. कोणी तरीं आश्रमीय तपस्वी राजवाडा पहाण्यासाठीं आलेला असावा असें त्यांना वाटलें. दिसतो आश्रमवासी पण खांद्याला धनुष्य कसें ? तेहि बुचकळ्यांत पडले.

सर्व मंडळी आंत निघून गेल्यावर प्रवेशद्वारावर सामसूम झाली. द्रोणाचार्य मात्र तेथेंच उभे होते. त्यांच्याकडे द्वारपालांचें लक्ष जातांच त्यांनीं त्यांची चौकशी केली. आपल्याला राजाचें निमंत्रण असून राजाच्या भेटीसाठींच आपण आलों असल्याचें द्रोणाचार्यांनीं सांगितलें.

राजसभागृह पूर्ण भरलें होतें. राज्ययंत्रणेमधील उच्च श्रेणीचे अधिकारी आपापल्या जागीं बसले होते. राज्यांतील प्रतिष्ठित मंडळी त्यांच्या योग्यतेनुसार स्थानापन्न झाली होती. राज्यारोहणाचा वाढदिवस म्हणून दरवर्षी अशी राजसभा भरविली जात असे. त्या

निमित्तानें राजाचें ऐश्वर्य प्रजेला कळावें म्हणून द्रुपद राजानें या दोन कार्यक्रमांची योजना केली होती. त्यांपैकीं पहिला कार्यक्रम म्हणजे राजैश्वर्याचें प्रदर्शन करणारी मिरवणूक आणि दुसरा कार्यक्रम हा राजसभेचा. मिरवणूक ही सर्वसामान्य जनतेसाठीं तर राजसभेची योजना राज्यांतल्या प्रतिष्ठित मंडळींसाठीं.

भालदार-चोपदारांनीं ललकारलेल्या जयजयकारांत सम्राट् द्रुपदानें राजसभेंत प्रवेश केला. सर्वांनीं उठून राजाचें स्वागत केलें. राजसभेंत त्या वेळीं एक प्रकारचें गंभीर वातावरण निर्माण झालें होतें. वास्तविक या वेळीं प्रसन्न वातावरणाची अपेक्षा होती; पण, द्रुपदराजाच्या स्वभावामुळें तेथील वातावरणाला गूढगंभीरता आली होती. राजा द्रुपदाला अहंगंडानें पछाडलें होतें. मी आणि माझें याशिवाय त्याला दुसरा विषय नसे. ‘ राज्याच्या चतुःसीमा माझ्यामुळेंच वाढल्या; आजचें या राज्याचें वैभव माझ्यामुळेंच निर्माण झालें, ’ ही त्याची वृत्ति बनली होती. आणि त्याचेंच अहंगंडांत रूपांतर झालें होतें. त्यामुळें प्रत्येक जण आपल्या वागण्या-बोलण्यांत कांहीं कमी-जास्त होऊन महाराजांचा रोष घडूं नयें या भावनेनें जीव मुठींत धरून वागत होता. त्यामुळेंच वातावरणाला गंभीरता आली होती.

आपापल्या योग्यतेप्रमाणें राजाला नजराणे देण्याचा कार्यक्रम सुरू झाला.

इतक्यांत द्वारपाल आंत आला. त्रिवार प्रणाम करून म्हणाला,

“ महाराज, बाहेर कोणी आश्रमवासी आला आहे, आणि तो आपल्या भेटीची इच्छा करतो आहे. ”

“ पण ही राजसभा निमंत्रितांसाठीं आहे ना ? ” महामंत्री म्हणाले.

"मलाहि महाराजांचं निमंत्रण आहे, असं तो म्हणतो आहे, मंत्रिवर." द्वारपालानें स्पष्टीकरण केलें.

राजा द्रुपदाला स्वतः कोणाला निमंत्रण दिल्याचें आठवेना. विचार करतां त्याच्या लक्षांत आलें कीं, आजच्या मिरवणुकींत ज्याच्यावर आपली दृष्टि स्थिरावली होती तो तर नसेल ?

राजा थोडा विचारांत गढलेला पाहून द्वारपाल थोडें धैर्य करून बोलला,

"महाराज, आश्रमवासी खरा, पण त्याच्या खांद्यावर धनुष्य आहे."

"आश्रमवासी आणि धनुर्धारी ?" महामंत्र्यांच्या तोंडून एकदम उद्गार निघाला.

पण द्रुपदाला मात्र एकदम खूण पटली. मिरवणुकींत दिसलेली तीच ही व्यक्ति. त्यानें तत्काळ आज्ञा दिली, "त्याला आंत घेऊन या !"

"आज्ञा महाराज!" म्हणून प्रणाम करून द्वारपाल बाहेर पडला.

या अनपेक्षित प्रकारानें पुढील कार्यक्रम मात्र तसाच थांबला. सर्वांचें लक्ष दरवाजाकडे लागलें. महाराजांनीं स्वतः निमंत्रण केलेली व्यक्ति आहे तरी कोण, हें जाणण्याची सर्वांना उत्कंठा होती. राजा द्रुपदहि या आकस्मिक प्रसंगामुळें थोडासा अस्वस्थ झाला होता.

दारांतून प्रवेश करणाऱ्या त्या व्यक्तीवर सर्वांचे डोळे रोखले गेले. रेखीव बांध्याचे आणि घोटीव शरीराचे तेजस्वी द्रोणाचार्य एकेक पाऊल शांतपणें टाकीत पुढें येत होते. जटाधारी असलेली त्यांची मुद्रा विद्वत्तेनें रसरसलेली आणि प्रसन्न होती. त्यांच्या डाव्या खांद्यावरचें धनुष्य त्यांना विशेष शोभून दिसत होतें. साधेंच पण प्रसन्न आणि तेजस्वी व्यक्तिमत्त्व लाभलेले द्रोणाचार्य

राजाच्या पुढयांत येऊन उभे ठाकले. आणि उजवा हात वर करून म्हणाले,

" राजा तुझा सदैव जयजयकार असो ! "

द्रुपदाला तो आवाज केव्हांच्या तरी जुन्या परिचयाचा वाटला. या माणसाच्या सहवासांत आपण राहिलों होतों हेंहि राजा द्रुपदाच्या लक्षांत आलें. पण तें प्रकट करायचें कसें ? आणि तें सुद्धां या भरलेल्या राजसभेंत ? कारण राजाच्या अलीकडे बनलेल्या अहंकारी प्रवृत्तीला तें मानवणारें नव्हतें. म्हणून द्रुपदानें बळेंच विचारलें,

" कोण आपण ? कोणाची भेट घ्यायची आहे ? "

राजा द्रुपदाच्या या प्रश्नानें द्रोणाचार्य क्षणभर चकित झाले. राजा असा त्रयस्थासारखा प्रश्न विचारील असें त्यांना स्वप्नांतहि वाटलें नव्हतें. आतां आपणच आपली ओळख करून द्यावी असें ठरवून द्रोणाचार्य म्हणाले,

" मी द्रोण ! आपला बालमित्र द्रोण ! "

राजाला सारें बालपणचें आश्रमांतील आयुष्य आठवलें. हा आपल्यावरोबर असलेला द्रोण आहे, हेंहि त्याला पटलें. परंतु त्याची अशी वाच्यता सर्वांसमक्ष व्हावी हें त्याला पटलें नाहीं.

" पण, आतां मी बाळ राहिलों नाहीं, " द्रुपदाच्या बोलण्यांत स्पष्ट उपहास होता.

" तें खरें आहे, पण ती बालपणची मैत्री तरी कायम राहिली आहे ना ? "

" मैत्री कसली ! योगायोगानं जवळ आलों असूं इतकंच ! "

द्रोणाचार्यांना द्रुपदाच्या अहंकाराचा वास यायला वेळ लागला नाहीं. तरीहि ते शांतपणें म्हणाले, " पण आज मी योगायोगानें आलों नाहीं. "

"मग आपल्याला कोणीं निमंत्रण धाडलं होतं ?" द्रुपदानें शब्दांत पकडण्याचा प्रयत्न केला, तेव्हां द्रोणाचार्य ठासून म्हणाले, "तूंच !"

"कोणी मीं ? आणि आपल्याला निमंत्रण पाठविलं ? तें कशा-साठीं ? असं असंबद्ध काय बोलताहांत आपण ?" राजा द्रुपद तोल सोडून बोलला.

"राजा, विस्मरणाचं वेड पांघरून चाललेलं तुझं बोलणंच असंबद्ध आहे असं दिसतं."

"या द्रुपदराजाला कशाचं विस्मरण ?"

"आठवण करून देऊं काय मी या भर राजसभेंत ?"

"केवळ आठवण करून देण्यासाठीं आलां आहांत काय इथं आपण ?"

"होय ! तुझ्या त्या वेळच्या खास निमंत्रणावरूनच मी आज इथं आलों आहें. तुझी तशी इच्छाच असेल तर देतों आठवण !"

द्रोणाचार्यांच्या स्वराला आलेली धार द्रुपदाला जाणवली. तेव्हां तो म्हणाला, "कशाची आठवण हें मला कळूं दे तरी !"

"मग ऐक तर ! संदीपन ऋषींचा आश्रम सोडल्यावर आपण घरीं निघालों होतों. त्या वेळीं तूं माझ्याकडून वचन घेतलं होतंस, तूं राजा झाल्यावर मी तुझ्या भेटीसाठीं यावं म्हणून आणि मीहि येण्याचं कबूल केलं होतं. त्या वेळीं तूं मला वचन दिलं होतंस, तुझ्या कदाचित् लक्षांत नसेल."

द्रोणाचार्य बोलण्याचें मध्येंच थांबले, कदाचित् द्रुपदाला आपण दिलेल्या वचनाची जाण असेल म्हणून. इतक्यांत द्रुपद म्हणाला,

"कामाच्या गर्दींत तें कसं शक्य आहे ?"

"राजा, तुला तें शक्य झालं नसेल; पण मला तें अत्यंत आव-श्यक वाटतं आहे आत्तां. म्हणूनच तूं दिलेलं वचन मी तुला ऐकवतों."

सारी राजसभा या अनपेक्षित घटनेनें विस्मित झाली होती. आतां काय घडणार याचें कुतूहल आणि भीति सर्वांच्याच चेहऱ्यांवर दिसत होती. अखेर त्या स्तब्ध-गंभीर वातावरणाचा भंग द्रोणाचार्यांच्या बोलण्यानेंच झाला.

" अर्थात्, तूं दिलेल्या वचनाचं पालन करावंस किंवा नाहीं, हा सर्वस्वी तुझा प्रश्न आहे. पण तूं दिलेलं वचन असं होतं कीं, 'द्रोणा ! तूं जर मी राज्यावर बसल्यानंतर माझ्या भेटीला आलास तर मी तुला माझं अर्धं राज्य देईन. "

हे शब्द ऐकतांच सभागृहाचे डोळे राजावर केंद्रित झाले. राजा आतां हा प्रसंग कसा निभावून नेतो याकडे सारी सभा दत्तचित्त होऊन राहिली होती.

पण द्रुपदराजाच्या मिस्किल हास्यानें दरबाराच्या असह्य तटस्थतेची कोंडी फोडली आणि सारा दरबार राजाच्या उपहासगर्भ हास्यांत सामील झाला.

द्रोणाचार्य विकारवश न होतां राजा द्रुपदावर दृष्टि रोखून उभे होते. राजाकडून उत्तराच्या मोबदल्यांत मिळालेलें उपहासगर्भ हास्याचें शल्य त्यांना बोंचलें होतें. तरीहि ते तसेच निर्विकारपणें उभे राहिले.

स्वतःच्या मिस्किल हास्याला साऱ्या सभाजनांची साथ घेत द्रुपद बोलला,

" वा ! द्रोणा, वा ! वाक्यांतील अक्षरन् अक्षर पाठ करून ठेवलं आहेस कीं ! " द्रुपदाच्या या वाक्यानें सभेंत हास्याची लाट उसळली. आणि या प्रसंगाला द्रोणाचार्यांच्या पद्धतशीर चेष्टेचें स्वरूप आलें.

" चेष्टा करूं नकोस द्रुपदा ! "

" चेष्टेवारी नेण्याइतकी तरी ती गोष्ट आहे का ? "

" मग मीं तुझ्या वचनाचा अर्थ तरी काय लावायचा ?" द्रोणाचार्य कांहींतरी निर्णय लावलाच पाहिजे या जाणिवेनें म्हणाले.

" बालपणीं केलेल्या बालिश बडबडीला वचनाची किंमत येत नसते. द्रोणा ! तुला कशाची जरुरी असेल, तर तशी व्यवस्था भांडारांत करण्यांत आली आहे."

द्रुपदाच्या बोलण्यानें मूळ मुद्द्याला बगल दिली होती आणि द्रोणाचार्यांची सामान्य याचकांसारखी वाट लावली होती. द्रोणाचार्यांना हें कळण्यास वेळ लागला नाहीं. द्रुपदानें केवळ नकार दिला असता तरी त्याचें दुःख द्रोणांना कांहीं वाटलें नसतें. पण, स्वतःची संभावना दारीं आलेल्या याचकापेक्षां निराळी नसावी याचें मनस्वी दुःख झालें त्यांना. द्रुपदाच्या दृष्टीनें द्रोण असलेला हा कृपीचा पति द्रोणाचार्य, तसा सामान्य राहिला नव्हता. त्याचें असामान्यत्व जाणण्याला द्रुपद राजा सत्तामदानें असमर्थ ठरला होता. द्रुपदाच्या असमर्थतेला कदाचित् क्षमा झाली असती; पण त्याच्या मदांधतेला तडा गेलाच पाहिजे असें जाणून द्रोणाचार्य म्हणाले,

" द्रुपदा ! मी तुझ्याकडे भीक मागायला आलों नाहीं ! केवळ राजा म्हणून तूं आपल्या वचनाला किती जागतोस हें जाणण्यासाठीं मी आलों होतों. "

" वा ! द्रोणा ! भीक मागायला येऊन माझ्या वचनाची परीक्षा करायला निघालास ! आणि भिक्षा मागायची ती तरी स्वतःच्या योग्यतेची ! तुझ्यासारख्यानं राज्य चालवण्यापेक्षां कुणाच्या तरी राज्यांत नागरिक म्हणून राहणंच बरं ! "

आपली योग्यता द्रुपदानें काढली या कल्पनेनेंच द्रोणाचार्य उसळून म्हणाले, " केवळ परंपरेनं राजा झालास ! म्हणून माझी

योग्यता काढतोस ? या द्रोणाचार्याला तूं काय समजतोस ? ब्राह्म-तेज आणि क्षात्रतेज यांचा मूर्तिमंत साक्षात्कार झालेल्या मला तूं अजून जाणलें नाहींस ! "

"अरे, तूं माझ्या दारांत आलास, तेव्हांच मीं तुला जाणलें आहे. आणि दुसरें असें कीं तूं कसाहि असलास तरी मला जाणण्याची जरुरी नाहीं. जा ! तूं जसा आलास तसा जा ! नाहींतर–"

"...बाहेर हाकललं जाईल ! असंच म्हणायचं होतं ना तुला !" द्रोणाचार्यांनीं वाक्य पूर्ण केलें.

"होय ! तूंच म्हणालास हें एकापरी बरं झालं. कोण आहे रे तिकडे ? याला राजवाड्याबाहेर घालवून द्या !" द्रुपदानें आज्ञा दिली.



आज्ञा होतांच सेवक पुढें झाले, तसे द्रोणाचार्य म्हणाले, "थांब, राजा, मला बाहेर जाण्याचा मार्ग माहीत आहे. पण तूं हें लक्षांत ठेव! ज्यांच्या समक्ष तूं मला सांगतो आहेस, आणि ज्यांच्याकडून तूं मला बाहेर घालवून देणार आहेस, त्यांच्यासमोर तुला या राजवाड्यांतून बाहेर पडावं लागेल."

"सभाजनहो! ऐकलीत का! एका सामान्य याचकाची उद्दाम वाणीं!" राजा द्रुपद एकदम जोरांत सेवकांना म्हणाला. "अरे! पाहतां काय! द्या याला बाहेर हाकलून! पार राजधानीच्या सीमापार घालवा!"

द्रोणाचार्यांच्या दोन्ही दंडांना सेवकांनीं धरलें आणि त्यांना बाहेर खेंचूं लागले. तेव्हां द्रोणाचार्य कठोर निश्चयानें जोरांत म्हणाले,

"द्रुपदा! लक्षांत ठेव! तुला आलेली सत्तेची धुंदी माझा शिष्यच उतरवील, निश्चित असा एक काळ येईल! त्या वेळीं तुला वाटूं लागेल, आपण बालपणचें वचन पूर्ण केलें असतें आणि राजसत्तेच्या मस्तींत असें वागलों नसतों तर बरें झालें असतें. त्याच वेळीं हा द्रोणाचार्य म्हणजे काय आहे याची तुला प्रचीति येईल."

एक वेळ द्रुपद राजाकडे क्रोधानें डोळे रोखून आणि सर्वांकडे एकवार बघून द्रोणाचार्य धनुष्यांतून सुटलेल्या बाणासारखे बाहेर पडले.

• •

## भी ष्मा चा र्यां शीं
## भे ट

द्रोणाचार्य हस्तिनापुरांत आले ते कृपाचार्यांच्याकडेच. ते त्यांचे जांवईच. फार दिवसांनीं मुलगी भेटल्यानें कृपाचार्यांना समाधान झालें. नातवाशीं बोलण्यांत कृपाचार्यांना आनंद होई. त्याच्या जिज्ञासू प्रश्नांना उत्तरें देण्यांत त्यांना गंमत वाटे. त्या कन्या-नातवांमुळें त्यांचा बराच वेळ घरींच जाऊं लागला.

पण द्रोणाचार्य केवळ हस्तिनापुरांत मजेनें राहण्यासाठीं आलेले नव्हते. त्यांना राजसभेंत प्रवेश मिळणें तसें कठीण नव्हतें. कारण त्यांचे सासरे कृपाचार्य राजसभेंत मान्यता पावलेले होते. आणि तसा केवळ प्रवेश होणें आणि तोहि दुसऱ्याकरवीं होणें, हें द्रोणाचार्यांना पसंत नव्हतें. म्हणूनच द्रोणाचार्य काळाची वाट पहात थांबले होते. स्वतःच्या गुणांनीं स्वतःची ओळख राजसभेंत व्हावी अशी त्यांची इच्छा होती. आणि लवकरच तो योग जुळून आला— अगदीं अनपेक्षितपणें.

सायंकाळची वेळ होती. हस्तिनापुरांतील सुखी जनता मनो-विनोदासाठीं घराबाहेर पडली होती. स्त्री-पुरुषांचे थवे राजरस्त्या-वरून जात-येत होते. बाजारपेठा उंची मालांनीं आणि श्रीमंत गिऱ्हाइकांनीं भरून गेल्या होत्या. राज्यांत सुबत्ता आणि शांतता असल्याचा अनुभव पावलोंपावलीं येत होता. दैन्यदारिद्र्याचें पुसट चित्रहि दिसत नव्हतें.

अशा समृद्ध राज्याच्या संपन्न राजधानींत हिंडण्यासाठीं द्रोणाचार्य बाहेर पडले. राजमार्गावरून हिंडत हिंडत ते गांवाबाहेर आले. राजप्रासादाच्या पाठीमागें असलेल्या क्रीडांगणावर मुलें खेळत होतीं. एकजात सारीं तरतरीत मुलें, मुद्दाम तयार करून घेतलेलें क्रीडांगण, विटीदांडूचा खेळ चालला होता. मुलें खेळण्यांत दंग झालीं होतीं. द्रोणाचार्य त्यांच्याकडे पहात उभे राहिले.

विटी टोलवणारा मुलगा विशेष चपळ होता. त्याची हालचाल अशी सफाईनें होत होती कीं कोणाचेंहि त्याच्यावर लक्ष खिळून रहावें. द्रोणाचार्य सुद्धां त्याच्या खेळावर मनापासून प्रसन्न होऊन त्याचा खेळ पहात राहिले.

त्यांच्या लक्षांत यायला वेळ लागला नाहीं कीं, हीं मुलें राजघराण्यांतील आहेत. कोण कोणचा हें त्यांना कसें कळणार? पण त्या मुलांना पाहून त्यांच्या विचारांचें चक्र चालू झालें. हीं मुलें आपल्याला विद्यार्थी म्हणून मिळालीं तर? ...असा विचार त्यांच्या मनांत येऊन गेला. त्यांच्या एकूण हालचालीवरून, राजबिंड्या रूपावरून हीं मुलें राजघराण्यांतीलच असावींत, त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था अगोदरच झालेली असावी हें उघड दिसत होतें. त्यामुळें त्यांच्या अध्यापनाच्या व्यवस्थेंत आपला प्रवेश कसा होणार असा प्रश्न त्यांच्या मनांत उपस्थित झाला. तोंच खेळांतली विटी त्या तरतरीत तरुणानें अशा कांहीं जोरानें टोलवली कीं ती त्या क्रीडांगणाच्या बाहेर गेली आणि जवळच असलेल्या एका खोल विहिरींत जाऊन पडली.

नेहमींपेक्षां जोरांत विटी गेली तसा सगळ्यांनीं एकच कल्लोळ केला. पण ती विटी विहिरींत पडली हें कळतांच सगळे त्या विहिरीच्या भोंवतीं गोळा झाले.

विहीर मोठी होती. तितकीच खोल होती. पण तिला पायऱ्या नव्हत्या. कधींकाळीं बांधलेल्या त्या विहिरींत बराच गाळहि सांठला होता. आणि त्या गाळांतच या मुलांची विटी रुतून बसलेली दिसत होती. विटी काढायची कशी ? कारण खालीं विहिरींत उतरण्याची सोय नव्हती. आणि माचाडावरून दोर टाकून ती काढून घ्यावी म्हटलें तरी तेंहि शक्य दिसत नव्हतें.

सर्वांना खेळण्याची इतकी त्वरा झाली होती कीं, मध्येंच हा अडथळा निर्माण झाल्यानें ते सगळे चिडलेच. आणि ज्यानें ही विटी टोलवली होती त्याला बोल लावूं लागले :

" नाहीं तरी या अर्जुनाला सांभाळून खेळायचं माहीतच नाहीं. आतां खेळ म्हणावं कसा खेळतोस तो ! "

" म्हटलंच होतं मी ! अरे, त्या अर्जुनाला जपून खेळायला सांगा, पण तो कसचा जपून खेळतोय् ! "

" खेळायला, जोरांत विटी टोलवायला बरं वाटलं. आतां काढ म्हणावं बाहेर ती विटी ! "

सगळे अर्जुनाला बोलूं लागले. अर्जुन तरी काय करणार ! तसा अर्जुन धडपड्या होता, पण या वेळीं त्याचा नाइलाज झाला होता. त्याच्याभोंवतीं कांहीं मुलें जमलीं. कांहीं विहिरीच्या सभोंवतीं उभीं राहिलीं.

द्रोणाचार्य हळू हळू पावलें टाकीत या मुलांच्या मागें केव्हांच येऊन उभे राहिले होते; त्यांच्याकडे कोणाचें लक्षच नव्हतें. द्रोणाचार्यांनीं त्यांचें बोलणें ऐकलें होतें. त्यांच्या बोलण्यावरून त्यांनीं केलेला तर्क खरा ठरला होता. ते सर्व राजघराण्यांतीलच होते. राजकुमारच होते. आणि आत्तांच्या बोलण्यावरून तर विटी लांबवर टोलवणाऱ्या तरतरीत मुलाचें नांवहि त्यांना समजलें होतें. अर्जुन होता तो.

द्रोणाचार्य पुढें झाले. त्यांनीं विहिरीच्या गाळांत पडलेली तीं विटी पाहिली. त्यांनीं विचारलें, "काय रे, तुमच्यापैकीं कोणालाहि ही विटी वर काढतां येत नाहीं ?"

द्रोणाचार्यांच्या या प्रश्नानें सगळेच गोरेमोरे झाले. कोणालाहि ती विटी बाहेर काढतां येत नव्हती. पण नकार तरी कसा द्यायचा? 'मला हें येत नाहीं' असें कमीपणाचें उत्तर द्यायचें तरीं कसें ? या विचारानें सर्वजण एकमेकांच्या तोंडाकडे पाहूं लागले; कोणीच बोलेना, तेव्हां पुन्हां एकदां द्रोणाचार्यांनीं विचारलें,

"तुमच्यापैकीं कोणीहि ही विटी बाहेर काढूं शकत नाहीं ?"

तेव्हां त्यांच्यांतला एकजण म्हणाला, "अहो, ती काढणार तरी कशी ?"

"कशी म्हणजे ! बाणानं;" द्रोणांनीं सहजपणें सांगितलें.

"बाणानें ?" सगळेच एकदम आश्चर्यानें उद्गारले.

"होय, बाणानें. तुम्हीं धनुर्विद्या शिकतां आहांत ना ? "

"हो, आमचं धनुर्विद्येचं शिक्षण झालं आहे."

"मग ही साधी विटी तुम्हांला बाहेर काढतां येत नाहीं ! यावरून मला वाटतं कीं तुम्हांला खरी धनुर्विद्या अद्यापि शिकवलेली दिसत नाहीं."

द्रोणाचार्य असें म्हणतांच सारेजण पुन्हां एकमेकांकडे पाहूं लागले. कारण आत्तांपर्यंतच्या आयुष्यांत असें स्पष्ट बोलणारा या राजकुमारांना कोणी भेटलाच नव्हता. थोडयाशा धिटाईनेंच अर्जुन पुढें झाला आणि म्हणाला, "तें कांहीं असो ! आतां ती विटी बाहेर निघणार नाहीं खास."

"अरे ! तोंडानं असं म्हणवतं तरी कसं तुम्हांला ? या ठिकाणीं माझा शिष्य असता तर त्यानं ही विटी सहज काढून दाखवली असती." द्रोणाचार्य असें म्हणतांच मात्र सारे जण हंसूं लागले.

सर्वांच्या हंसण्यांतला उपहास अर्जुनाला जाणवला. तो स्वतः विचारी असल्यानें सावरून घेण्याच्या दृष्टीनें म्हणाला,

" अहो, आपण हें कांहींतरीच म्हणतां ! बाणानं ही विटी वर निघेल यावर आमचा विश्वासच बसत नाहीं. "

" कसा बसेल विश्वास ? तसा प्रयोग तुम्हीं कधीं पाहिलाच नसेल ! " द्रोणाचार्य ठामपणें बोलले.

" मग तो आपण करून दाखवाल का ?" अर्जुनाच्या विचारण्यांत कुतूहल अधिक होतें.

इतक्यांत कोणीतरी पुढें येऊन विचारले, " आणूं का धनुष्य ? "

अर्जुनाच्या कुतूहलानें द्रोणाचार्यांना बरें वाटलें. आणि सर्वांना चकित करायचें ठरवून ते म्हणाले, "त्याला धनुष्यच कशाला पाहिजे ?"

इतकें बोलून त्यांनीं खालीं पडलेली एक दर्भशलाका हातीं घेतली आणि डोळे मिटून मंत्राचें स्मरण केलें. अभिमंत्रण केलेली ती दर्भशलाका त्यांनीं विटीच्या रोखानें फेंकली.

अशा कांहीं वेगानें ती दर्भशलाका निघाली कीं ती विटीच्या खालच्या भागाला लागली मात्र ! खेळांत दांडूचा टोला बसावा त्याप्रमाणें ती विटी जी वर उडाली ती विहिरीच्या बाहेर येऊन पडली.



सर्वांनीं हा अद्भुत चमत्कार समक्ष

डोळ्यांनीं पाहिला. आणि उपहासानें हंसल्याचा सर्वांना मनोमन पश्चात्ताप झाला. सगळे आश्चर्यानें थक्क होऊन गेले.

'सामान्य दर्भशलाका ती काय! पण मंत्राच्या सामर्थ्यानं आपल्या इच्छेप्रमाणें कार्य करूं शकते. मग धनुष्याच्या प्रत्यंचेवर चढवलेला बाण! आणि तोहि अभिमंत्रण केलेला असेल तर? काय करूं शकणार नाहीं?' या विचारांनीं अर्जुन मुग्ध होऊन म्हणाला,

"महाराज! आहे खरी धनुर्विद्या आपली. आपल्या या धनुर्विद्येच्या कौशल्याची जाणीव नसल्यानंच सर्वांच्याकडून हंसण्याचा प्रमाद झाला. आपण क्षमा करावी."

द्रोणाचार्य हंसले. म्हणाले, "चालायचंच, लहानच आहांत तुम्ही, जा आतां, पुन्हां खेळ सुरू करा."

द्रोणाचार्य निघाले तोंच अर्जुन पुढें होऊन हात जोडून म्हणाला,

"महाराज आचार्य! आपल्याला एक नम्र विनंती आहे."

"कोणती बाळ?"

"वेळ असल्यास आपण माझ्याबरोबर चलावं."

त्याच्या बोलण्यांतला आर्जवी स्वर डावलणें द्रोणाचार्यांना शक्यच झालें नाहीं. आणि लगेच ते म्हणाले, "चल, पण कुठं?" अर्जुन पुढें आणि मागें द्रोणाचार्य निघाले. त्या वेळीं परस्परांच्या मनांत विचार येत होते.—

'यांनीं मला आपला शिष्य मानून सर्व धनुर्विद्या दिली तर' अर्जुनाचें मन म्हणत होतें.

'याच्यासारखा तेजस्वी शिष्य मिळाला तर आपली प्रतिज्ञा पुरी व्हावयास वेळ लागणार नाहीं.' द्रोणाचार्य मनोमनीं बोलत होते.

थोडक्याच अवधींत दोघांच्याहि अंतःकरणांत परस्पर-आत्मीयतेचे भाव निर्माण झाले. सूर्याचा प्रकाश पडल्यावर पाझरणाऱ्या

सूर्यकांत मण्यासारखी अर्जुनाची अवस्था झाली. त्याच्या अंतःकरणांतील श्रद्धाभाव द्रोणाचार्यांना पाहातांच पाझरूं लागला.

द्रोणाचार्यांना घेऊन अर्जुन थेट राजवाड्यांत आला. त्यांना त्यानें अत्यंत आदरानें राजमंडपांत आणलें आणि एका उच्चासनावर बसवून तो म्हणाला, "आचार्य, आपण थोडा वेळ इथं थांबावं. हा पहा मी आलोंच." असें म्हणून अर्जुन लगबगीनें आंत निघून गेला.

द्रोणाचार्य, अर्जुनाच्या हालचालीकडे कुतूहलानें पहात थांबले. त्याच्या वागण्याबोलण्यांतील मार्दव, हालचालींतील चपळाई आणि त्याच्या वयाच्या मानानें शोभून दिसणारी नम्रता पाहून द्रोणाचार्यांचें मन खरोखरच प्रसन्न झालें.

अर्जुन तेथून निघाला तो थेट भीष्माचार्यांच्या समोर येऊन उभा राहिला. धांवत पळत आलेल्या अर्जुनाला पाहून भीष्माचार्यांना थोडें आश्चर्य वाटलें. प्रणाम करून उभा राहतांच अर्जुनाला त्यांनीं ममतेनें विचारलें, "अर्जुना, काय गडबड आहे? अगदीं धांवत पळत आलास खेळ सोडून?"

"आचार्य पितामह! खेळाहूनहि अधिक विलक्षण अशी एक घटना आतां घडली. ती सांगण्यासाठींच खेळ सोडून मी आपणाकडे आलों आहें." अर्जुनानें सांगून टाकलें.

"काय, घडलें तरी काय असं, कीं तूं ज्यामुळें खेळ सोडून आलास?"

घडलेली घटना जशीच्या तशी पितामहांना अर्जुनानें सांगितली. ती ऐकत असतांना भीष्माचार्यांच्या मुखावरील भाव बदलत होते. अर्जुनाचें बोलणें शांतपणें ऐकणाऱ्या भीष्मांना जें पाहिजे होतें तें सांपडल्याचा आनंद झाला होता. बहुधा भगवान् परशुरामांकडे शस्त्रास्त्रविद्या संपादून आलेले द्रोणाचार्य ते हेच असावेत, असा त्यांनीं तर्क बांधला. ते म्हणाले,

" समजलं. अजून कांहीं सांगायचं आहे का ?" भीष्माचार्यांच्या ह्या प्रश्नानें अर्जुनाला हुरूप आला.

तो म्हणाला, " पितामह, आपली अनुमति असेल तर एक इच्छा मी प्रकट करूं का ?"

" अर्जुना, मी तुझी इच्छा जाणून आहें. तुझी इच्छा वावगी नसणारच, हेंहि मला माहीत आहे; तरी पण सांग तूं."

अर्जुनानें हात जोडून कळकळीनें विचारलें, " त्यांची आमचे गुरुदेव म्हणून योजना होईल का ? "

थोडा वेळ विचार करून भीष्माचार्यांनीं शांतपणें त्याला होकार दिला.

" आपल्या राजमंडपांत त्यांना मी घेऊन आलों आहें " अर्जुनानें लगेच वेळ न दवडतां सांगितलें. अर्जुनाच्या मनांतील विद्येची तीव्र इच्छा भीष्मांना जाणवली. त्यांना त्या जागीं बसवलें नाहीं. ते उठले आणि म्हणाले,

" चल, आपणच जाऊं त्यांच्याकडे. "

राजमंडपांत द्रोणाचार्यांना पाहातांच भीष्माचार्यांचा तर्क खरा ठरला. ऐकलेल्या त्यांच्या आकारप्रकारावरून, शांत तेजस्वी मुद्रेवरून ते द्रोणाचार्यच आहेत याची त्यांना खात्री पटली.

" मी द्रोण आपणांस अभिवादन करीत आहें." नम्रपणें द्रोणाचार्य आसनावरून उठून म्हणाले. त्यांना पाहून भीष्माचार्यांना समाधान वाटलें.

द्रोणाचार्यांच्या अभिवादनाचा स्वीकार करून भीष्माचार्य म्हणाले, " आतांपर्यंत नांव ऐकून होतों, आज भेट झाली. समाधान वाटलं. अर्थात् भेट झाली आणि तीहि या अर्जुनामुळें. मोठा चाणाक्ष अन् लाघवी आहे तो. त्याची एक इच्छा आहे. बघा आपण पुरवाल का ? आपण होकार दिलात तर मलाहि बरं वाटेल.

भीष्माचार्यांच्या एकाच वाक्यांतून द्रोणाचार्य आणि अर्जुन यांची इच्छा जणू सांधली गेली. अर्जुनाच्या इच्छेला आपली पूर्ण संमति आहे हें द्रोणाचार्यांनीं न कळत सुचवलें.

"या राजकुमारांना आपण शस्त्रास्त्रविद्या शिकवावी अशी इच्छा आहे." भीष्माचार्य गंभीरपणें म्हणाले.

"अर्जुनासारखे विद्यार्थी मिळाले तर कोणता गुरु विद्यादान करणार नाहीं? यांच्यासारख्या विद्यार्थ्यांना देण्यासाठींच तर आचार्य आमची विद्या आहे, मी आनंदानें तयार आहें या गोष्टीला."

"वा, द्रोणाचार्य, आपण अर्जुनाच्या इच्छेला होकार दिलात आणि माझ्याहि शब्दाला मान दिलात. खरोखरी ही गोष्ट फार उत्तम झाली. आपण आतांपासूनच या राजकुमारांचे गुरु झालां आहांत." भीष्माचार्यांनीं अधिकारवाणीनें सांगून टाकलें. ते अर्जुनाकडे पहात म्हणाले,

"अर्जुना, आपल्या गुरुदेवांना प्रणाम कर आणि सर्वांना सांग कीं उद्यांपासून धनुर्विद्येचे पाठ यांच्याकडून तुम्ही घ्यायचे आहेत."

अर्जुनाची छाती आनंदानें भरून आली. आपली इच्छा इतक्या लवकर पूर्ण झाली या कल्पनेनेंच त्याचें अंग मोहरलें आणि त्यानें "प्रणाम! गुरुदेव!" म्हणून मोठ्या श्रद्धेनें द्रोणाचार्यांना सांष्टांग नमस्कार घातला.

आपल्या मनश्चक्षूसमोर आपल्या प्रतिज्ञापूर्तीचीं भविष्यकालां-तील चित्रें रंगवीत दोन्ही हातांनीं आशीर्वाद देत द्रोणाचार्य उद्गारले, "आयुष्मान् भव! विजयी भव!"

• •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ... 
०६९४२४ ... ग्रा. वा.
3560 ... नोंद दि. 30/3/67

# सर्वोत्तम शिष्य

द्रोणाचार्य गुरु म्हणून आपल्याला लाभले, याचा सर्वांत जास्त आनंद कोणाला झाला असेल तर तो पांडवांना ! त्यांतहि अर्जुनाला तर तो आनंद कसा प्रकट करावा हेंच कळेना. आपल्याच विचारांच्या तंद्रींत तो होता. उद्यांपासून एका नवीन अध्यायाला प्रारंभ होणार ! अभूतपूर्व अशा शस्त्रांचें अध्ययन करण्याची इच्छा पूर्ण होण्याच्या मार्गाला लागणार ! या विचारांनीं उल्हसित झालेला अर्जुन केव्हां निद्राधीन झाला, हें त्याचें त्यालाच कळलें नाहीं.

द्रोणाचार्यांची गुरुस्थानीं नेमणूक झाली, असें शब्दानें जरी ठरलें होतें, तरी नेहमींच्या राजकीय अधिकृत रीतिरिवाजाप्रमाणें त्यांची नेमणूक राजमुद्रांकित होण्याचा कार्यक्रम सकाळींच ठरविण्यांत आला होता. साधाच पण संस्कारी समारंभ म्हणून त्या प्रसंगाचें विशेष महत्त्व होतें. सर्वांच्या समक्ष कौरवपांडव राजपुत्रांनीं गुरुदेव म्हणून पूजा करायची आणि त्यांचें आमरण शिष्यत्व स्वीकारायचें होतें.

द्रोणाचार्यांची राजकुमारांसाठीं गुरुपदीं नेमणूक झाली; ही बातमी जेव्हां कृपाचार्यांना समजली, तेव्हां त्यांची अवस्था मात्र विचित्र झाली. कारण राजपुत्रांना शिक्षण देण्याचें काम वास्तविक त्यांच्याकडे होतें. त्याच कामासाठीं त्यांची नेमणूकहि झाली होती. पण, आतां या जांवयाच्या नेमणुकीमुळें आपलें काय

होणार, हा एक नवीनच प्रश्न त्यांच्यापुढें निर्माण झाला होता. बरें, कृपाचार्य बोलणार तरी कोणाला ? कारण द्रोणाचार्य हे तर प्रत्यक्ष त्यांचे जांवई आणि त्यांनीं स्वतःच त्यांना तेथें आणलेलें. पण द्रोणाचार्यांनीं तो प्रश्न अशा कांहीं कौशल्यानें सोडविला कीं कृपाचार्यांना त्या विषयाची डोकेंदुखी म्हणून राहिली नाहीं.

गुरुपूजेसाठीं व्यासपीठावर बसण्याची जेव्हां द्रोणाचार्यांना विनंती करण्यांत आली, तेव्हां द्रोणाचार्य स्वतः उठले आणि सर्वांना उद्देशून म्हणाले, "या राजसभेंत गुरुपूजेचा अग्रमान कृपाचार्यांचा आहे, त्यांनीं तो प्रथम स्वीकारावा, आणि आपणहि त्यांची प्रथम पूजा करावी, असं मला वाटतं."

द्रोणाचार्यांच्या या नम्र सूचनेचा सर्वांवर असा कांहीं विलक्षण परिणाम झाला कीं, कृपाचार्यांसह सर्व उपस्थितांचा द्रोणाचार्यां-विषयींचा आदर दुणावला. कृपाचार्यांनाहि आपल्याला अपमानित जीवन कंठावें लागणार नाहीं, याची खात्री झाली. कौरवपांडवांना आपल्या पहिल्या श्रद्धास्थानांत कांहीं बदल झाला आहे, असें वाटलें नाहीं.

कृपाचार्यांना प्रथम उच्चासनावर बसविलें गेलें. कौरव-पांडवांनीं त्यांची आधीं पूजा केली आणि आशीर्वाद घेतला. नंतर राजपद्धतीला अनुसरून गुरुपूजनाचा कार्यक्रम झाला. क्रमशः सर्वांनीं द्रोणाचार्यांची गुरु म्हणून पूजा केली. यथाविधि कार्यक्रम झाला. आणि द्रोणाचार्य त्या वेळेपासून राजकुमारांचे शिक्षणगुरु म्हणून राजमुद्रांकित झाले. गुरुशिष्यांचें आंतरिक नातें तर त्या-अगोदरच जडलें होतें.

राजप्रासादाच्या पाठीमागें असलेल्या प्रशस्त क्रीडांगणावर द्रोणाचार्य शस्त्रविद्येचे पाठ देऊं लागले. शस्त्रविद्या द्रोणाचार्यांनीं

भगवान् परशुरामाच्याकडून संपूर्णतया आत्मसात् केली होती. त्यांतील बारकावे त्यांच्या रहस्यांसह जाणून घेतले होते. सर्व प्रकारच्या शस्त्रांचें प्रात्यक्षिक भगवान् परशुरामांच्या समोर झालें असल्यामुळें त्यांच्या शस्त्रविद्येला कोणत्याहि प्रकारची शंका राहिली नव्हती. याचा प्रत्यय या राजपुत्रांना यावयास वेळ लागला नाहीं. लक्ष्यवेधाचें रहस्य समजावून देण्याचें त्यांचें अध्यापनकौशल्य या नवीन छात्रगणांना थक्क करी. प्रात्यक्षिक करून दाखवीत असतांना द्रोणाचार्यांचें चापल्य या विद्यार्थ्यांना लाजवीत असे.

द्रोणाचार्यांचें अलौकिक अध्यापनकौशल्य सर्वांवरच परिणामकारी ठरलें. पण त्यांतहि त्यांचा पांडवांवर विशेष परिणाम झाला. कारण कौरवांपेक्षां पांडव विशेष विद्याप्रेमी होते. सुखभोग नि आराम यांतच विशेष आनंद मानणाऱ्या कौरवांपेक्षां पांडवांवरच द्रोणाचार्यांचें विशेष लक्ष जडलें. कारण दररोज दिलेला पाठ पूर्ण करण्यांत पांडवांनीं कधीं उणीव ठेवली नव्हती. त्याउलट कौरवांना दररोजचा पाठ पुरा झाला न झाला याचा विधिनिषेध नव्हता; शिवाय पांडवांपेक्षां कौरवांची बुद्धि विद्यार्जनापेक्षां बढाया मारण्यांत अधिक रंगणारी. ग्रहणशक्ति व समजहि त्यामुळें कमी. साहजिकच कौरव-पांडवांच्या मध्यें अंतर पडूं लागलें.

कोणतीहि गोष्ट समजावून देण्यांत द्रोणाचार्य कधींहि चालढकल करीत नव्हते. एकदां, दोनदां, दहांदां शिष्याच्या लक्षांत येईपर्यंत ते समजावून देत असत. पण त्याचा नेमका फायदा पांडवांना होत असे. पांडवांची तेजस्विता नजरेंत भरण्याजोगी होती. आणि या सर्वांवर शोभून दिसणारा त्यांचा गुण म्हणजे नम्रता, द्रोणाचार्यांशीं वागण्यांत प्रकट होणारी त्यांची विनयशील वृत्ति

कौरवांच्या उद्धटपणाच्या पार्श्वभूमीवर उठून दिसे. द्रोणाचार्य कितीहि विद्वान् असले, आमचे गुरु असले तरी ते आमचे आश्रित आहेत ही भावना कौरवांच्या वागण्यांत केव्हां केव्हां प्रकट होई. पण त्या भावनेचा स्पर्शहि पांडवांच्या अंतःकरणाला झालेला नव्हता.

यामुळेंच द्रोणाचार्यांचा पांडवांवर विशेष लोभ जडला. त्यांतहि द्रोणाचार्य आणि अर्जुन या गुरु-शिष्यांची जोडी एकजीव झाली होती. द्रोणाचार्यांनीं दिलेले पाठ तन्मयतेनें पूर्ण करण्यांत अर्जुनानें आपला पहिला क्रमांक केव्हांहि सोडला नाहीं. आपल्या पूर्वपुण्या-ईनेंच द्रोणाचार्यांसारखे गुरु लाभलें अशी अर्जुनाची श्रद्धा होती. आणि त्या श्रद्धेला यथावकाश फल मिळूं लागलें होतें.

निरनिराळ्या शस्त्रविद्या शिकवून झाल्या. विविध अस्त्रे, त्यांचे उपयोग, त्यांचें निराकरण यांचे पाठ पूर्ण झाले. मंत्रविद्याहि शिष्यां-च्या पदरांत द्रोणाचार्यांनीं टाकली. सैन्यांतील निरनिराळ्या तंत्रांचा अवलंब कसा करावा हेंहि त्यांनीं शिकविलें. सर्व कांहीं शिकवून झालें. भगवान् परशुरामांपासून घेतलेली विद्या पांडवांना काना-मात्रेचाहि फरक न करतां द्रोणाचार्यांनीं दिली. आणि द्रोणाचार्य विद्याऋणांतून मुक्त झाले.

राजपुत्रांच्या शिक्षणाचा भार द्रोणाचार्यांसारख्या योग्य गुरूवर सोंपविल्यामुळें भीष्माचार्य निर्धास्त होते. द्रोणाचार्यांच्या विद्वत्ते-विषयीं त्यांना मुळींच संदेह नव्हता. द्रोणाचार्यांच्या गुरूंकडून भीष्माचार्यांनीं धनुर्विद्येचे, अस्त्रविद्येचे पाठ घेतलेले असल्यामुळें द्रोणाचार्यांचें अध्यापन आपल्या परंपरेला धरूनच होईल याची त्यांना खात्री होती. अधूनमधून द्रोणाचार्यांच्या जवळ ते विचारपूस करीत. तेव्हां " सर्व कांहीं सुरळीत चालू आहे, " असेंच त्यांच्या-कडून भीष्माचार्यांना कळे.

राजगृहीं नियुक्त झाल्यापासून द्रोणाचार्यांचा योगक्षेम व्यवस्थित चालूं लागला होता. दारिद्र्याचा त्यांच्या संसाराला आतां स्पर्शहि होत नव्हता. सुगृहिणी कृपीच्या सौख्यांत कांहींच उणें नव्हतें. पूर्वीच्या तिच्या यातना केवळ स्मरणप्राय झाल्या होत्या. बाळ अश्वत्थामा या राजपुत्रांचा सवंगडी होऊन त्यांच्याच बरोबर शिक्षण घेत होता. आपल्या पतीनें सरस्वतीची मनोभावानें केलेली सेवा फळास आली, अशी तिची श्रद्धा होती.

आतां कृपीच्या संसारांत काय कमी होतें ? विद्वन्मान्य पतिराज, राजसभेंत मान्यता, भावी राजांचे गुरुवर्य म्हणून गौरव; अश्वत्थाम्यासारखा सतेज पुत्र; सारें कांहीं दृष्ट लागण्यासारखें होतें.

कधीं कधीं द्रोणाचार्य हंसून म्हणतहि,

"हं आतां काय कमी आहे ! झालं ना सगळं मनासारखं ?"

"आपल्या मनांत नव्हतं वाटतं !"

"माझ्या मनांत खूप होतं, पण तूं जर मला त्या वेळीं घराबाहेर पाठवलं नसतंस तर ? तर आजचे हे सोन्याचे दिवस दिसले नसते."

खरोखरच द्रोणाचार्यांच्या आयुष्यांतील ते सोन्याचे दिवस होते. एक ध्यास मात्र त्यांच्या मनाला सतत लागलेला होता. त्याला काळजी म्हणतां येत नसली तरी त्याच्याविषयीं द्रोणाचार्य सारखा विचार करीत असत. तो विचार म्हणजे स्वतःच्या शिष्याकडून द्रुपदाचा समाचार घेण्याबद्दलचा ! त्या दृष्टीनें द्रोणाचार्यांनीं अर्जुनावर आपलें सारें लक्ष केंद्रित केलें होतें. अर्जुनानेंहि आचार्यांना चांगला प्रतिसाद दिला होता.

अर्जुनाच्या बुद्धिमत्तेवर द्रोणाचार्य प्रसन्न होते. कोणत्याहि अवघड विषयाची उकल द्रोणाचार्य करूं लागले कीं अर्जुन एकाग्र होऊन तो विषय चटकन् ग्रहण करी. इतरांचें लक्ष गुरूंच्या

सांगण्याकडे असे पण त्यांतल्या त्यांत अर्जुनाची एकाग्रता विशेष असायची. त्यामुळें साहजिकच अर्जुनाची विद्येंतील सरसता प्रथमपासून वाढीला लागली. त्याच्या आत्मविश्वासाला द्रोणाचार्यांच्या परिश्रमाचें खतपाणी मिळाल्यानें एक असामान्य धनुर्धर अर्जुनाच्या रूपानें आकार घेऊं लागला. त्याच्या अद्वितीयत्वाला मान्यता प्राप्त करून देण्यासाठीं द्रोणाचार्यांनीं एक कार्यक्रम आंखला. पण त्याला स्वरूप मात्र वेगळेंच दिलें. अर्जुनावरील आपल्या विशेष प्रेमाचा वास येऊं नये याची खबरदारी घेतली. अगदीं सहजासहजीं गोष्ट ठरविली ती त्यांनीं.

एकदां द्रोणाचार्य क्रीडांगणावरून परत येत होते. बरोबर विद्यार्थी होतेच. अर्जुन, दुर्योधन, दुःशासन, भीम, नकुल, सहदेव, सगळेच घरीं निघाले होते. आपसांत बोलत, थट्टामस्करी करीत चालले होते. क्रीडांगणावरून राजप्रासादाच्या मार्गावर येतांनाच भीष्माचार्य समोरून येतांना दिसले. त्यांना पाहतांच सारे थबकले. सगळे कां थबकले, हें पाहण्यासाठीं द्रोणाचार्यांनीं वर बघितलें; तों समोर भीष्माचार्य उभे !

" आचार्य नमोनमः ! " द्रोणाचार्यांनीं अभिवादन केलें. त्यांचें अनुकरण सर्वांनीं केलें. त्याचा स्वीकार करून भीष्माचार्य म्हणाले,

" आटोपलं क्रीडांगण ? "

" होय, आचार्य. "

" झाले का सगळे अभ्यासक्रम संपूर्ण ? एकदां सर्वांची प्रगति पाहावी म्हणतों ; " भीष्माचार्यांनीं सर्वांच्याकडे पहात इच्छा प्रकट केली.

" बहुतेक सगळे अभ्यासक्रम झाले आहेत. आपण केव्हांहि विद्यार्थ्यांची प्रगति पहावी. आपलं मार्गदर्शन उपयुक्तच होईल आचार्य."

द्रोणाचार्यांच्या बोलण्यांत आत्मविश्वास होता. त्यामुळें भीष्माचार्यांना मनोमन समाधान वाटलें. थोडें थांबून ते म्हणाले,

"मग ठरवा एखादा दिवस, मीं अवश्य येईन."

"ठीक आहे." द्रोणाचार्य अर्जुनाकडे पहात बोलले. द्रोणाचार्यांच्या पहाण्यांतला आशय अर्जुनाला समजायला वेळ लागला नाहीं. द्रोणाचार्यांच्या नजरेंत हाच भाव स्पष्ट होता कीं, अर्जुना ! या सर्वापेक्षां खरीखुरी तुझीच परीक्षा आहे. आणि त्याहिपेक्षां तुला दिलेल्या ज्ञानाची परीक्षा म्हणजे पर्यायानं माझी, माझ्या ज्ञानाची परीक्षा आहे.

अर्जुनानेंहि त्यांच्या नजरेला योग्य तो प्रतिसाद दिला. आणि 'आपल्या आशीर्वादानं ही परीक्षा मी उत्तीर्ण होईन' असें सुचविलें.

परीक्षेचा दिवस उजाडला. परीक्षा कशी घेतली जाणार याची कोणालाच कल्पना नव्हती. प्रत्येकजण आपापल्या परीनें तर्क करीत होता, पण परीक्षेचें निश्चत स्वरूप कोणीच सांगूं शकत नव्हता. अर्जुन मात्र निश्चल होता. तो कांहींहि बोलत नव्हता. त्याच्या मनांत केवळ एकच विचार दृढ होऊन राहिला होता, कीं 'आजची परीक्षा मी प्रथम क्रमांकानें उत्तीर्ण होणार !'

द्रोणाचार्यांनीं कोणालाहि न कळवितां परीक्षेची तयारी आधींच करून ठेवली होती. त्यांनीं सुताराकडून एक सुबक पक्षी तयार करवून घेतला होता. आणि तो क्रीडांगणाच्या कोपऱ्यावर असलेल्या मोठ्या झाडावर समोरून दिसेल अशा उंच फांदीवर बांधून ठेवला होता. लांबून पाहणाराला तो जिवंत पक्षी आहे असेंच वाटे.

द्रोणाचार्यांनीं सर्वांना बोलावून सांगितलें, "आजचा आपला परीक्षेचा कार्यक्रम क्रीडांगणावर होणार आहे. प्रत्येकानं आपलं धनुष्य मात्र अवश्य बरोबर आणावं."

राजपुत्र क्रीडांगणावर जमले. भीष्माचार्यांना घेऊन द्रोणाचार्य आले. समारंभासाठीं तयार केलेल्या उच्चासनावर भीष्माचार्य बसले.

भीष्माचार्यांची अनुज्ञा घेऊन द्रोणाचार्य पुढें आले आणि सर्वांना उद्देशून म्हणाले, " बाळांनो ! तुम्ही आजपर्यंत जें शिक्षण घेतलें आहे, त्याची आज परीक्षा आहे; या परीक्षेंत जो विशेष नैपुण्य दाखवील तो तुमच्यांतील सर्वोत्तम विद्यार्थी समजला जाईल."

" थोडक्यांत परीक्षेचें स्वरूप मी तुम्हांला समजावून सांगतों " ते पुढें बोलूं लागले,

" हें पहा या समोरच्या झाडाच्या शेंड्यावर एक पक्षी आहे, त्याचे सर्व अवयव स्पष्ट दिसत आहेत. त्या पक्ष्याचा उजवा डोळा आपल्या धनुष्यानें निश्चित करून त्याचा वेध करावयाचा आहे." ते थोडे पुढें येऊन उभे राहिले आणि म्हणाले, " लक्ष्य-सिद्धि करण्याची ही जागा. येथूनच प्रत्येकानें आपल्या धनुष्याच्या प्रत्यंचेला बाण जोडावयाचा आहे."

द्रोणाचार्यांनीं झाडाच्या शेंड्यावरचा पक्षी पुन्हां एकदां दाखविला आणि लक्ष्यवेध जेथून करावयाचा ती जागाहि पण दाखविली.

ही परीक्षा तशी विशेष अवघड नाहीं असेंच सर्वांना वाटलें.

" हं चला ! एकेक जण सिद्ध व्हा. प्रथम कोण प्रारंभ करतो ?" द्रोणाचार्यांनीं विचारलें.

सर्वांच्या पुढें धर्मराज उभा होता. त्यालाच द्रोणाचार्य म्हणाले, " हं, धर्मराज ! ये पुढं, चल."

धर्मराज पुढें झाला. लक्ष्यवेध करण्याच्या जागीं येऊन उभा राहिला. धनुष्याच्या प्रत्यंचेला बाण जोडून त्या पक्ष्याच्या रोखानें त्यानें बाण धरला.

तितक्यांत द्रोणाचार्यांनीं त्याला विचारलें, " धर्मा ! हें सांग कीं तुला समोर काय दिसतं आहे ? "

धर्मराज तसाच बाण रोखून म्हणाला, " मला समोरचं झाड दिसतं आहे. पक्षी दिसतो आहे तसंच फांदीहि पण दिसते आहे. "

धर्माच्या या बोलण्यानें द्रोणाचार्यांना वाईट वाटलें. त्याला बाजूला सारून ते म्हणाले, " बाजूला हो धर्मा ! तुझं काम नव्हे तें ! "

धर्माला बाजूला सारतांना द्रोणाचार्यांना वाईट वाटत होतें. पण त्याला उपाय नव्हता. धर्मराज आपल्या जागीं जाऊन उभा राहिला. त्याच्यानंतरचा क्रमांक दुर्योधनाचा होता. त्याला पाहून द्रोणाचार्य म्हणाले, " चल, दुर्योधना ! आतां तूं ये पुढं. "

दुर्योधन पुढें झाला खरा, पण त्याच्या पुढें येण्यांत थोडासा ताठाच होता. ' यांत काय विशेष ! मी सहज लक्ष्यवेध करीन ! हाच अहंकार त्याच्या हालचालींतून प्रकट होत होता.

दुर्योधनानें आपलें धनुष्य सज्ज केलें. बाण चढवला. लक्ष्य साधलें. तोंच द्रोणाचार्यांनीं विचारलें, " दुर्योधना ! साधलंस का लक्ष्य ? काय काय दिसतं रे तुला ? "

" मला ना ? पक्षी दिसतो, तो ज्यावर बसला आहे ती मोठी फांदी दिसते, एवढंच काय पण, झाडाचा वरचा भागहि मला दिसतो आहे. "

" आणखी काय काय दिसतं ? "

" आणखी सारे विद्यार्थी दिसतात. तुम्ही सुद्धां दिसत आहांत."

दुर्योधनाच्या या उत्तरानें द्रोणाचार्यांनीं कपाळावर आठी चढवीत म्हटलें, " या सर्वांचा लक्ष्यवेध तूं करणार म्हण कीं ! बरं तर, पुढं केव्हां तरी कर ! आतां बाजूला हो " द्रोणाचार्यांनीं त्यालाहि स्वस्थानीं पाठवलें.

धर्मराज आणि दुर्योधन यांच्या उत्तरांनीं द्रोणाचार्य कष्टी झाले होते. त्यांच्याकडून त्यांना या व अशा प्रकारच्या उत्तरांची अपेक्षा नव्हती; पण ते तरी काय करणार ? त्याहिपेक्षां त्यांना याचें विशेष दुःख झालें कीं, हें सर्व भीष्माचार्यांच्या पुढें घडलें आहे.

नंतर भीम आला. सर्व कांहीं तसेंच घडलें; आणि द्रोणाचार्यांच्या सांगण्यावरून तोहि परत गेला.

नकुल-सहदेवांची तीच अवस्था झाली. दुःशासनाची तीच. एकजात साऱ्यांचीं उत्तरें ठरलेलीं. त्यांत कोणताहि बदल नाहीं. नावीन्य नाहीं. द्रोणाचार्य मात्र मनस्वी कष्टी झाले. आपण केलेलें अध्यापन केवळ वरवरचें झालें असें त्यांना वाटूं लागलें. पण, आतां ते काय करूं शकत होते ?

अखेर द्रोणाचार्यांच्या समोर जेव्हां अर्जुन येऊं लागला, तेव्हां त्यांना थोडें बरें वाटलें. हाच आपण दिलेल्या विद्येचा योग्य उपयोग करील अशी त्यांना आशा वाटूं लागली. अर्जुनाच्या चालण्यांतल्या आत्मविश्वासानें, त्याच्या लक्ष्यवेधासाठीं सिद्ध असलेल्या विशाल डोळ्यांनीं द्रोणाचार्यांची आशा पालवली.द्रोणाचार्य त्याच्याकडे पाहूं लागले. त्यांच्या दृष्टींत सामावलेली भावना अर्जुनानें तत्काल जाणली.

" अर्जुना ! आतां माझा अखेरचा आधार तूंच ! या द्रोणाचार्यांचं नांव राखणं हें केवळ तुझ्याच हातांत आहे. आणि तुझेंहि विद्याकौशल्य तुला सिद्ध करायचं आहे. सावधान राहून उत्तरं दे ! " ते घोगऱ्या आवाजांत बोलले.

अर्जुनानेंहि अशा आत्मविश्वासानें त्यांच्याकडे पाहिलें कीं 'गुरुदेव ! तुम्ही निर्धास्त असा ! कांहींहि काळजी करूं नका ! मी

तुमचं नांव जाऊं देणार नाहीं. आणि माझंहि राखीन. आपण फक्त मला आशीर्वाद द्या ' हीच मागणी त्याच्या नजरेंत होती.

अर्जुन पुढें झाला. उच्चासनावर बसलेल्या भीष्माचार्यांना त्यानें नम्रपणें अभिवादन केलें. भीष्माचार्यांनीं त्याला मनापासून आशीर्वाद दिला. म्हणाले " यशस्वी हो बाळ ! "

नंतर द्रोणाचार्यांना प्रेमादरानें प्रणाम करून अर्जुन तसाच थांबला. द्रोणाचार्यांनीं त्याच्या मस्तकावर हात ठेवून दाटलेल्या कंठानें आशीर्वाद दिला, " बाळ, विजयी हो ! "

अर्जुन लक्ष्यवेध करण्याच्या जागीं जाऊन उभा राहिला. खांद्यावर चढविलेलें धनुष्य त्यानें हातांत काढून घेतलें. उजव्या हातांत एक तीक्ष्ण बाण घेऊन कपाळाला लावला आणि लक्ष्यवेध करण्यासाठीं पवित्रा घेतला. त्याची प्रत्येक हालचाल आत्मविश्वासपूर्ण होती. पवित्र्यांत उभ्या ठाकलेल्या अर्जुनावर सर्वांच्या नजरा खिळून राहिल्या होत्या.

अर्जुनानें धनुष्याच्या कमावलेल्या प्रत्यंचेला बाण लावला. आणि ती दोरी आकर्ण ताणली. डावा डोळा मिटून आपली तीक्ष्ण दृष्टि त्या पक्ष्यावर केंद्रित केली.

लक्ष्यावर त्याची दृष्टि खिळली आहे हें पाहून द्रोणाचार्य म्हणाले, " अर्जुना ! आतां तुला कोण कोण दिसतं रे ? "

अर्जुनानें थोड्या वेळानें शांतपणें उत्तर दिलें, " गुरुदेव ! मला त्या पक्ष्याशिवाय आतां कांहींहि दिसत नाहीं. "

या उत्तरानें द्रोणाचार्यांच्या अंतःकरणांतली निराशा पार पळून गेली. आपल्या अध्यापनाची कृतकृत्यता आज पुरी होणार अशी त्यांना अशा निर्माण झाली; कारण असें अपेक्षित उत्तर आतांपर्यंत कोणीच दिलें नव्हतें. पुन्हां त्यांनीं विचारलें,

"अर्जुना ! आतां पुन्हां एकदां सांग कीं, तुला नेमकं काय दिसतं आहे ?"




अविचल झालेल्या अर्जुनानें तितक्याच शांतपणें उत्तर दिलें, "गुरुदेव ! त्या पक्ष्याच्या डोळ्याशिवाय मला दुसरं कांहींहि दिसत नाहीं" हें उत्तर ऐकतांच द्रोणाचार्यांच्या अंगावर मूठभर मांस चढलें. एकाग्र धनुर्धराची नेमकी हीच स्थिति असायला हवी असते. तीच आतां अर्जुनाची झालेली आहे, हें त्यांनीं जाणलें. तरीहि त्यांनीं पुन्हां एकदां विचारलें,

"अर्जुना ! आतां तुझ्या दृष्टीला बरंच कांहीं दिसतं का रे ?"

या प्रश्नाला केवळ मानेनेंच नकार देऊन अर्जुन म्हणाला, "गुरुदेव ! आतां केवळ त्या पक्ष्याच्या उजव्या डोळ्याचा मध्य-भाग मला दिसतो आहे."

या उत्तरानें द्रोणाचार्यांचें अंतःकरण आनंदानें फुलून आलें. " वा ! अर्जुना ! वा ! " असे नकळत त्यांच्या मुखांतून उद्गार निघाले.

" हं अर्जुना ! सोड आतां बाण. " असें द्रोणाचार्यांनीं म्हणतांच अर्जुनानें दृष्टि केंद्रित झालेल्या लक्ष्यावर विलक्षण सफाईनें बाण सोडला. तो सूं सूं आवाज करींत नेमका लक्ष्यवेध करून आपलें काम करून गेला.

दुसऱ्या कोणत्याहि अवयवाला स्पर्शहि न होतां पक्ष्याचा उजवा डोळा बाणानें फुटलेला पाहतांच द्रोणाचार्य पुढें झाले, आणि त्यांनीं अर्जुनाला कडकडून मिठी मारली. त्याच्या पाठीवर प्रेमानें हात फिरवीत ते म्हणाले, " अर्जुना ! तूं आज माझं नांव राखलंस आणि माझा सर्वोत्तम शिष्य ठरलास ! मला किती आनंद झाला आहे म्हणून सांगूं ! " प्रेमाश्रूंनीं दाटलेल्या द्रोणाचार्यांच्या डोळ्यां-समोर एक भविष्यकाळांतलें चित्र उभें ठाकलें. अर्जुनानें द्रुपदाला पाशबद्ध करून आपल्यासमोर आणलें आहे.

भीष्माचार्यांनींहि वंदन करणाऱ्या अर्जुनाची पाठ थोपटली आणि आशीर्वाद दिला, " वत्स, चिरंजीव विजयी भव. "

पांडव आनंदानें नाचूं लागले. आचार्यांनीं मुक्त कंठानें अर्जु-नाची प्रशंसा केली. याचें वैषम्य कौरवांना वाटलें. त्यांतहि दुर्यो-धनाचा चेहरा काळवंडला; अर्जुनाची प्रशंसा सहन न होऊन तो तात्काळ क्रीडांगण सोडून निघून गेला.

● ●

# दोघा शिष्यांच्या

## ६

# दोन तऱ्हा

"आपला पक्ष प्रबळ व्हावा असं वाटतं ना, तुला दुर्योधना ?" शकुनीमामानें दुर्योधनाला विचारलें.

"हो वाटतं तर !"

"तर मी तुला एक उपाय सांगतों."

"सांगा, शकुनीमामा, अवश्य सांगा !"

"आजकाल सुतराज कर्णाचं नांव सर्वांच्या मुखीं आहे. नुकतंच त्यानं दंतघटाला युद्धांत जिकलं. त्याला आपल्या पक्षांत घ्यावं."

मामांनीं हा उपाय सुचवला तसा दुर्योधन म्हणाला, "पण मामा, तो आपल्यांत येणार कसा ? कदाचित् तो जर पांडवांचा पक्षपाती असला तर ?"

दुर्योधनाच्या या शंकेला शकुनीनें लगेच उत्तर दिलें "तुझी शंका बरोबर आहे, दुर्योधना ! पण मला माहीत आहे कीं, तो पांडवांचा द्वेष करतो !"

"तर मग त्याला आपलासा केलाच पाहिजे. आतां तें काम माझं मामा !" दुर्योधनानें निश्चय प्रकट केला.

दुर्योधन हा पांडवांविषयींच्या मत्सरानें भारलेला होता. त्याच्या मनांत पांडवांविषयीं, त्यांतहि अर्जुनाविषयीं विशेष असूया निर्माण झाली होती. त्या असूयेची सुरुवात द्रोणाचार्यांनीं घेतलेल्या परीक्षेच्या वेळेपासून झाली होती. अर्जुनाला सर्वांच्या समक्ष,

"तूं माझा सर्वोत्तम शिष्य आहेस" अशी शाबासकी त्या वेळीं द्रोणांनीं दिली. भगवान् परशुरामांपासून मिळालेली आपल्या गळ्यांतील रत्नमाला त्याच्या गळ्यांत घातली तेव्हां तर त्याच्या अंतःकरणांत मत्सराग्नीचा डोंब उसळला. त्या वेळेपासून कौरव आणि पांडव असें द्वंद्व त्याच्या मनांत कायमचें रुजलें. सरळ सरळ कौरव आणि पांडव असे दोन पक्ष तो मानूं लागला. केव्हांतरी कमीजास्त प्रसंग होणार! या दृष्टीनें त्यानें आपली बाजू समर्थ करण्याचा प्रयत्न चालू केला. आतां तर तो नुसता राजपुत्र नसून युवराज होता. राज्याचीं सारीं सूत्रें त्याच्याच हातांत होतीं. आणि कारस्थानांत कुशल असलेले शकुनीमामा त्याचा सल्लागार होता. त्याच्या सल्ल्यानें दुर्योधन वागत होता. अविचारापोटीं मत्सरी झालेल्या दुर्योधनाला मार्गदर्शनांतील बरेवाईटपणा मुळींच कळत नव्हता. केवळ पांडवांचा द्वेष हेंच त्यांचें उद्दिष्ट बनलें होतें.

दुर्योधनानें कर्णाला अंग देशाचें राज्य दिलें आणि त्याला राजा बनविलें. आपल्या अंवतींभोंवतीं असलेलीं माणसें अगदींच सामान्य असूं नयेत याची दक्षता दुर्योधन घेत होता. यासाठींच सूतपुत्र म्हणून समजल्या जाणाऱ्या कर्णाला त्यानें अंगराज बनविलें.

कर्णाला आपला मित्र बनवूनहि दुर्योधनाला समाधान झालें नाहीं. केवळ माणसें मिळविण्यानें स्वतःचें कर्तृत्व वाढतें असें नाहीं, याची जाणीव त्याला पदोपदीं येत होती. आपल्यापेक्षां अर्जुन शस्त्रास्त्रविद्येंत श्रेष्ठ ठरला आहे; याची त्याला खंत होती. कांहींहि करून त्याच्यावर आपण मात केली पाहिजे असें त्याला मनोमन वाटत होतें. पण अर्जुनापेक्षां सरस अशी एखादी अस्त्रविद्या द्रोणाचार्य आपणांला देतील का अशी एक शंका दुर्योधनाच्या मनांत आली. तेव्हां द्रोणाचार्यांनाच समक्ष विचारावें असा त्यानें विचार केला, आणि तो संधीची वाट पाहूं लागला.

अर्जुन नेहमीं द्रोणाचार्यांच्या सहवासांत असे. त्यांची मनोभावें सेवा करण्याचें त्यानें जणुं व्रतच घेतलें होतें. त्यांचीं छोटींमोठीं कामें करण्यांत त्याचा सारा दिवस जाई. दुर्योधनाला हें सर्व माहीत होतें. हें जाणूनच दुर्योधनानें एक संधि साधली. गुरुजींच्या ब्रह्मयज्ञ-तर्पणाच्या नित्यकर्मासाठीं पाणी आणण्यास अर्जुन नदीवर गेला होता. अर्जुन लवकर परत येणार नाहीं, असें पाहून दुर्योधन द्रोणाचार्यांपाशीं गेला. आचार्यांनीं विचारलें, " काय दुर्योधना, कां येणं केलंस ? "

" तसं काहीं विशेष काम आहे, असं नाहीं. पण... "

दुर्योधन बोलायचें थांबला तेव्हां द्रोणाचार्य म्हणाले,

" दुर्योधना, थांबलास कां ? बोल ना. तुझी कांही इच्छा असली तरी संकोच न करतां सांग. "

द्रोणाचार्यांच्या बोलण्यानें दुर्योधनाला थोडा विश्वास वाटला आणि तो हलकेच म्हणाला, " आचार्य, मला एक आपल्याला विचारायचं आहे. "

" विचार ना ! तेंच तर तुला मी आधीं सांगितलं. "

" अर्जुनाला तुम्हीं सर्वोत्तम शिष्य म्हणून निवडला, त्याला सारी शस्त्रास्त्रविद्या तुम्ही दिली; आणि त्यानंहि ती घेतली. त्या बलावर तो मोठा योद्धा झाला आहे. "

" यांत शंकाच नाहीं ! " द्रोणाचार्य मोकळेपणानें म्हणाले.

" पण आचार्य, मी मात्र तसाच राहणं, हें मला बरं वाटत नाहीं आणि आपल्याला तरी तें योग्य वाटतं का ? "

" दुर्योधना ! योग्यायोग्य वाटण्याचा इथं प्रश्नच निर्माण होत नाहीं. विद्यादानाचं काम माझं. ती विद्या घेणं, आत्मसात् करणं, वाढवणं, हें काम ज्याचं त्याचं. अर्जुन योद्धा झाला तो त्याच्या परिश्रमावर. तसा तूंहि हो. तुला थोडंच कुणी अडवलं आहे ? "

" मला अडवणार कोण, आचार्य ! पण आपल्याला आज एक महत्त्वाची गोष्ट विचारणार आहें. विचारूं का ?" साशंकतेनें इकडेतिकडे पहात दुर्योधन म्हणाला.

" मी मघाशींच तर तुला सांगितलं आहे. विचार ना ! "

" त्याला आपण मान्यता द्याल ?"

" तूं कांहींहि विचार, मी त्याला मान्यता देईन, मग तर झालं ? हं विचार आतां. "

" अर्जुनाला न शिकवलेली अशी एखादी महत्त्वाची अस्त्रविद्या आपण मला शिकवावी अशी माझी इच्छा आहे. "

" तुझी इच्छा असेल तर मी अवश्य शिकवीन. "

द्रोणाचार्यांच्या या वाक्यानें समाधान न झाल्यानें पुन्हां दुर्योधनानें विचारलें, " पण माझी अट आहे ना लक्षांत आचार्य ? "

" होय दुर्योधना ! माझ्या लक्षांत आहे. "

दुर्योधनाची अट विलक्षण असून द्रोणाचार्यांनीं त्याला संमति दिली. कारण, द्रोणाचार्य जाणून होते कीं, अर्जुनाला शिकवलेली अगर न शिकवलेली कोणतीहि विद्या असली तरी दुर्योधन ती किती प्रमाणांत ग्रहण करील ! दुर्योधनाचें बौद्धिक सामर्थ्य ते जाणून होते. त्यांनीं आतांपर्यंत सर्वांना सारखेंच शिक्षण दिलें होतें. पण स्वतःच्या तीक्ष्ण बुद्धीनें आणि अविश्रांत परिश्रमानें स्वतःची विद्या अर्जुनानें सतेज ठेवली होती. विद्येविषयीं आणि गुरुदेवांविषयीं असलेल्या गाढ निष्ठेनें त्याची विद्या सफल झाली होती. आणि नेमक्या ह्याच गोष्टींचा अभाव दुर्योधनाजवळ होता. अहंकारी वृत्तीनें त्याला ग्रासलें होतें. त्यामुळें त्याचें अध्ययन झालें, पण विद्येची सफलता मात्र त्याला सोडून गेली होती. हें सारें द्रोणाचार्यांना माहीत होतें.

द्रोणाचार्य दुर्योधनाला म्हणाले, " दुर्योधना, मी तुला माहेश्वरी विद्या शिकवणार आहें. नीट लक्ष दे. त्याचा उपयोग कसा करायचा तेंहि तुला सांगतों." असें म्हणून द्रोणाचार्यांनीं दुर्योधनाला माहेश्वरी विद्येचा पाठ दिला.

माहेश्वरी विद्येचा प्रभाव मोठा विलक्षण ! त्या विद्येचें अभिमंत्रण करून बाण वटवृक्षावर सोडायचा, वटवृक्ष जवळपास नसेल तर दुसऱ्या कोणत्याहि झाडावर बाण सोडला असतां, त्या झाडावर असलेलीं जितकीं पानें तुटतील किंवा गळून पडतील, तितकीं शत्रूपक्षांतील सैनिकांचीं मस्तकें तुटून खालीं पडत. म्हणजे बाण सोडायचा झाडावर आणि त्याचा परिणाम घडायचा शत्रुपक्षांतील सैनिकांवर.

द्रोणाचार्य दुर्योधनाला माहेश्वरी विद्या शिकवून म्हणाले, " दुर्योधना, आत्तां तुला जी विद्या मीं शिकवली त्याचं प्रात्यक्षिक मी आतां पाहणार आहें, आणि तेंहि तुझ्याकडून."

दुर्योधनालाहि त्या विद्येचा प्रभाव कळून आल्यामुळें विलक्षण जिज्ञासा निर्माण झाली होती त्या विद्येचा प्रयोग केव्हां एकदां करून पाहीन असें त्याला झालें होतें. अनायासें योग जुळून आला असें दुर्योधनाला वाटलें आणि त्यानें पटकन् म्हटलें,

" चला आचार्य ! मी तयार आहें."

द्रोणाचार्य निघाले. ते मनाशीं एक कल्पना घेऊनच—' आजपर्यंत दुर्योधनाच्या कुवतीची जी मीं अटकळ बांधली आहे त्याची खरी परीक्षा आज होईल. आजच्या परीक्षेनं दोन गोष्टी सिद्ध होणार आहेत. एक अर्जुन काय किंवा दुर्योधन काय, मला अध्यापनाच्या दृष्टीनं दोघेहि सारखेच. दुसरी, अर्जुन तो अर्जुन ! आणि दुर्योधन तो दुर्योधन ! "

द्रोणाचार्यांच्या बरोबर दुर्योधन होताच. दोघेहि एका मोठ्या वडाच्या झाडाखालीं थांबले. तेव्हां द्रोणाचार्य म्हणाले, " दुर्योधना, हें पहा आलं वडाचं झाड. या झाडावरच आपण माहेश्वरी विद्येचा प्रयोग करूं. "

" कांहीं हरकत नाहीं. "

" मी आधीं प्रयोग करतों. नंतर मी सांगेन त्या वेळीं तूं प्रयोग कर. द्रोणाचार्यांनी असें बोलून स्वतः एक बाण अभिमंत्रण करून झाडावर सोडला. तोंच त्या झाडावरील निम्मीं पानें गळून पडलीं.

त्यावर द्रोणाचार्य दुर्योधनाला म्हणाले, " दुर्योधना ! पाहिलंस ना, आत्तांच मीं शिकवलेल्या माहेश्वरी विद्येचं सामर्थ्य ? आतां तूं राहिलेलीं पानं पाडून दाखव बघूं. माहेश्वरी विद्या इथूनतिथून एकच. तिचा उपयोग मीं केला काय किंवा तूं केलास काय, परिणाम एकच. हं सोड बाण ! "

दुर्योधनाला आपली लगेच परीक्षा घेतली जाईल अशी कल्पना नव्हती. त्यामुळें तो बावरलाच. पण तसें न दाखवतां, तो हातांत धनुष्य घेऊन उभा राहिला. बाण लावून सोडतेवेळींच त्याच्या मनांत आलें होतें–' माहेश्वरी विद्येची सिद्धि झाली नाहीं तर ?'

—आणि तसेंच झालें. दुर्योधनानें बाण सोडला. पण त्या वडाच्या झाडाचीं जीं पानें शिल्लक राहिलीं होतीं त्यांपैकीं केवळ एकच पान खालीं पडलें, तें पाहून दुर्योधनाला फारच वाईट वाटलें. स्वतःला सांगितलेली विद्या पूर्णतया सफल झाली नाहीं यापेक्षां, अर्जुनापेक्षां विशेष अशी विद्या आपल्याला मिळूनहि ती सफल झाली नाहीं, याबद्दल त्याला अधिक वाईट वाटलें. पण त्याचा आतां काय उपयोग होता ?

द्रोणाचार्यांनाहि वाईट वाटलें. विद्या कोणालाहि दिली तरी

तिची सफलता होणें ही आवश्यक गोष्ट आहे. गुरु म्हणून त्यांना विशेष दुःख झालें; आणि त्या भरांत द्रोणाचार्य म्हणाले, "निव्वळ शंख आहेस, दुर्योधना तूं! तूं इतका मतिमंद असशील अशी माझी कल्पना नव्हती. मला आणि माझ्या विद्येला तूं कमीपणा आणला आहेस. दुर्योधना! बोल! आणला आहेस ना?"

दुर्योधन खालीं मान घालून उभा होता. तो तरी काय बोलणार? द्रोणाचार्यांच्या बोलण्यावर तो म्हणाला,

"होय, गुरुदेव!"

"केवळ नुसत्या होकारानें त्या अपराधाची भरपाई होऊं शकणार नाहीं आतां." द्रोणाचार्य तीव्र स्वरांत म्हणालें.

दुर्योधन या वेळीं विलक्षण पेंचांत सांपडला होता, तो करायला गेला एक अन् झालें मात्र भलतेंच. अर्जुनाच्या द्वेषानें जळणाऱ्या दुर्योधनाला स्वतःची फजिती स्वतःच्या हातानें झालेली पहावी लागली होती.

शेवटीं केवळ नाइलाज झाल्यामुळेंच दुर्योधन म्हणाला, "आचार्य, आपण द्याल ती शिक्षा भोगायला मी तयार आहें."

"मग ऐक तर! माझ्या दुखावलेल्या अंतःकरणांतून निघालेले हे उद्‌गार ऐक! तुला कोणतीहि विद्या साध्य व्हायची नाहीं." अशी शापवाणी उच्चारून द्रोणाचार्य तेथून तडक निघून गेले. द्रोणाचार्यांचें तें कटु कथन ऐकून आपण या भानगडींत पडलों नसतों तरी बरें झालें असतें, असें दुर्योधनाला वाटल्यावांचून राहिलें नाहीं. दुर्योधनहि खालीं मान घालून तेथून निघून गेला.

गुरुजींच्या ब्रह्मयज्ञतर्पणासाठीं भागीरथीचें पवित्र पाणी आणण्याचा अर्जुनाचा रोजचा परिपाठ होता, त्यानुसार तो आजहि गेला होता. पाठीमागें काय घडलें हें त्याला माहीत नव्हतें; आणि तें समजणार तरी कसें? आपला द्वेष करणारे आसपास वावरत

आहेत हें त्याला माहीत होतें. परंतु त्यांच्या उद्योगाकडे अर्जुन मुळींच लक्ष देत नसे. आणि थोड्या वेळापूर्वींच दुर्योधनानें घडविलेलें पण त्याच्यावरच उलटलेलें कारस्थान त्याला कसें माहीत असणार ?

गंगेच्या विशाल प्रवाहाकडे पाहात असतांना त्याची दृष्टि स्थिर झाली. स्वच्छ-सुंदर जलाशयाकडे पाहण्यांत त्याची चित्तवृत्ति रंगली. अखंड वहात असलेला गंगेचा प्रवाह जणुं प्रत्येकाला कर्तव्याची जाणीव देत होता. त्याचेंच अनुसंधान अर्जुनाला होत असे. त्याच वृत्तीनें तो भारला होता. प्रवाहाकडे एकटक पहात असतांनाच त्याच्या कानांवर मंजुळ आवाज आला. कांहीं स्त्रियांचा तो आवाज होता. त्या आपसांत बोलत होत्या, मोठ्यानें हंसत होत्या.



गंगेच्या प्रवाहाकडे निश्चल दृष्टीनें पाहणाऱ्या या सुंदर तरुणाकडे पाहतांच त्या थबकल्या. त्याच्या एकाग्रतेबद्दलचें त्यांना विशेष कौतुक वाटलें. 'हा कोण ?' कुठला ? विचारावें म्हणून यांनीं थोड्या मोठ्यानेंच टाळ्या वाजविल्या. त्या आवाजानें भानावर येऊन अर्जुन इकडे तिकडे पाहूं लागला तोंच त्याला त्या स्त्रिया दिसल्या. त्यांच्याकडे पाहिल्यावर त्या कोणीतरी मोठ्या घराण्यांतील स्त्रिया असाव्यात असा त्यानें तर्क केला. अभावितपणें त्याचे हात जोडले गेले. आणि त्यांच्या तोंडून शब्द बाहेर पडले, "क्षमा करा मला. मी आपणांला पाहिलंच नाहीं."

"कांहीं चुकलंच नाहीं तर क्षमा कशाची करायची ?" त्यांतली प्रमुख दिसणारी स्त्री म्हणाली.

"उलट तुझ्या एकाग्रतेचं कौतुकच वाटलं आम्हां सर्वांना" दुसरी एक आर्जवानें बोलली.

"कशाचा अभ्यास चालू आहे वाटतं ?" तिसरीनें त्याच्याकडे निरखून पाहात विचारलें.

त्यांच्यापैकीं एकेक बोलत होती. अर्जुनाला त्यांच्या बोलण्यांत आत्मीयता वाटली. पण या कोण असाव्यात ही जिज्ञासा अर्जुनाच्या मनांत साहजिकच निर्माण झाली. आणि म्हणून अर्जुनानें विचारलेंहि. तो म्हणाला, "राग येणार नसेल तर एक विचारूं का ? आपल्या बोलण्यांतल्या आत्मीयतेनं मी भारावून गेलों आहें."

"विचार ना ! आम्हांला खात्री आहे कीं तूं राग येण्यासारखं कांहीं विचारणार नाहींस." ती प्रमुख स्त्री पुन्हां बोलली.

"एवढ्या आत्मविश्वासानं बोलणाऱ्या आपण आहांत तरी कोण ?"

20/3/09

"आम्ही ? आम्ही जलदेवता आहोंत. कोणालाहि या जला-पासून–पाण्यापासून कशाचीहि बाधा होऊं नये यासाठींच आम्ही संचार करींत असतों." त्यांनीं मोकळेपणीं उत्तर दिलें.

"तर मग माझा आधीं प्रणाम स्वीकारावा देव. देवता, गुरु, यांना पाहतांक्षणींच प्रणाम करावा असें शास्त्रवचन आहे."

नम्रपणें केलेल्या अर्जुनाच्या प्रणामाचा स्वीकार करीत त्या सर्वांनीं एकदम उच्चार केला,

"आयुष्मान् भव ! विजयी भव !"

"आपल्या आशीर्वचनांनीं हा पांडुपुत्र अर्जुन कृतार्थ झाला आहे. यापुढं चालू राहणाऱ्या माझ्या अध्ययनांत सुद्धां असाच आपला शुभाशीर्वाद असावा हीच आपल्याला प्रार्थना आहे."

"कुणापाशीं अध्ययन चालू आहे अर्जुना, तुझं ?"

"गुरुदेव द्रोणाचार्यांकडून मी धनुर्विद्येचें पाठ घेत असतों."

"वा ! छान जोडी जमली. तुझ्यासारखा शिष्य आणि द्रोणाचार्यांसारखे गुरुजी. तुम्हां दोघा गुरुशिष्यांच्या जोडीची कीर्ति अमर होईल."

"हा आपला मी वरच समजतों." अर्जुन नतमस्तक होऊन म्हणाला. त्याची ती नम्र वृत्ति पाहून सर्वांत मोठी जलदेवता म्हणाली, "अर्जुना, तुम्ही दोघे कीर्तीनं अमर व्हाल ही केवळ आम्हीं इच्छा व्यक्त केली. तुझ्या विनम्र वागण्याबोलण्यावर संतुष्ट होऊन तुला आम्ही वेगळाच वर देणार आहोंत."

"जर आपणांला वर द्यावयाचाच असेल तर माझ्या अध्य-यनाच्या पूर्तीशिवाय दुसरा कोणताहि वर नको; अशी माझी आपणांला मनापासून प्रार्थना आहे."

अर्जुनाची ही विनंती ऐकून जलदेवतांना त्याच्याविषयीं विशेषच आस्था वाटूं लागली. अध्ययनाविषयींची त्याची ओढ लक्षांत घेऊन त्यांनीं एकमुखानें त्याला वर दिला,

" अर्जुना ! जी विद्या प्राप्त करण्याचा तूं स्वतः प्रयत्न करशील, ती विद्या तुला साध्य होईल; आणि तुला अपयश असें कधींहि येणार नाही. "

जलदेवतांनीं दिलेल्या वराचा स्वीकार अर्जुनानें नतमस्तक होऊन केला.

भारावलेल्या स्थितींत क्षणमात्र तसाच राहिलेला अर्जुन वर पाहूं लागला, तों त्या जलदेवता केव्हांच निघून गेल्या होत्या.

वेळ बराच झाला होता. गुरुदेवांच्या नित्यकर्माला उशीर होणार या जाणिवेनें तो तटकन् भानावर आला. कमंडलू पाण्यानें भरून घेतला आणि झप्झप् पावलें टाकीत तो गुरुदेवांच्या निवासाकडे निघाला.

'खरोखर आजचा योग कशामुळें आला ?' जातांना त्याच्या मनांत विचार येत होते. 'गुरुदेवांच्या पूर्ण कृपेमुळं कीं आपल्या विद्यानिष्ठेमुळं ? कांहीं असलं तरी आज आपल्या जीवनांत अपूर्व अशी घटना घडली खास. त्याचा उपयोग आपल्याला भावी आयुष्यांत निश्चित होईल.'

असा विचार करीतकरीतच तो चालला असतांना रस्त्यावर एका जागीं वडाच्या पानांचा सडाच पडलेला त्याला दिसला. 'मघाशीं आपण याच रस्त्यानें आलों तेव्हां एक पानहि नव्हतें आणि आतां हीं इतकीं पानं कुठून आलीं ?' त्यानें वर पाहिलें तों वटवृक्षावरचीं निम्मीं अधिक पानें गळून पडलेलीं. या वडाच्या

झाडाचींच पानें गळून पडलीं असावींत हा विचार त्याला तितकासा बरोबर वाटला नाहीं.

आपोआप या झाडाचीं पानें कशीं गळून पडतील ?

तीं कोणीतरी मुद्दाम पाडलीं असावींत असा तर्क करून त्यानें स्वतःच कल्पना करावयास सुरुवात केली. तों नुकत्याच मिळालेल्या जलदेवतेच्या आशीर्वचनांनीं त्याला समजलें ही माहेश्वरी विद्या आहे.

ती विद्या आपणांला समजली पाहिजे, या इच्छेनें ती विद्या जाणण्याचा तो जसजसा प्रयत्न करूं लागला तसतशी ती विद्या त्याला आत्मसात् होऊं लागली. जलदेवतांचा तसा कृपाप्रसादच त्याला झालेला होता.

थोड्याच वेळांत माहेश्वरी विद्या त्याला प्राप्त झाली. त्या विद्येचें प्रत्यंतर घ्यावें असें साहजिकच अर्जुनाला वाटलें. त्यामुळें एकाच वेळीं दोन गोष्टी त्याला साधतां येणार होत्या. एक म्हणजे जलदेवतांचा तसा कृपाप्रसाद स्वतःला झाला आहे कीं नाहीं, आणि ही माहेश्वरी विद्याच आहे किंवा कसें ? असा विचार करून अर्जुनानें माहेश्वरी विद्येची प्रचीति घेण्याचें ठरविलें !

पण अर्जुनाला एक अडचण निर्माण झाली. गुरुदेवांच्यासाठीं आणलेलें पाणी खालीं कसें ठेवायचें ? थोडा वेळ विचार करून बाणाच्या टोकावर कमंडलू ठेवून तो त्यानें अभिमंत्रित केला आणि तो बाण दिला आकाशांत सोडून. आलेली अडचण दूर झाली आणि त्यानें दुसरा बाण धनुष्यावर जोडला. माहेश्वरी विद्या मनांत स्मरून त्यानें तो बाण त्या झाडावर सोडला. त्याबरोबर त्या झाडावरचीं उरलींसुरलीं सारीं पानें खालीं गळून पडलीं. हें पाहतांच त्याला मनोमन विश्वास निर्माण झाला कीं

आपल्याला माहेश्वरीं विद्या प्राप्त झाली आहे. आणि जलदेवतांचा कृपाप्रसादहि पूर्ण लाभला आहे. अर्थातच या गोष्टीचें अर्जुनाला विशेष समाधान झालें.

इतक्यांत अभिमंत्रण करून सोडलेला बाण कमंडलूसहित खालीं आला. बाण आवरून कमंडलू त्यानें वरचेवर हातांत धरला. आणि आतां गुरुदेव उशीर झाल्याबद्दल आपल्याला कांहीं म्हणतील काय, या भीतीनें त्यानें पाऊल उचललें.

त्याच्या मनाला एकाच गोष्टीचें राहून राहून आश्चर्य वाटत होतें कीं आजच दोन्ही घटना कशा योगानें जुळून आल्या. जलदेवतांनीं दिलेला वरप्रसाद आजच प्रत्यक्षांत सिद्ध करण्याचा योग आला. माहेश्वरी विद्या फक्त ऐकून माहीत होती, तिचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याचा प्रसंगहि त्याच्या अंतःकरणांत घर करून राहिला. घडलेला सारा वृत्तान्त गुरुदेवांना सांगावा का, या विचारांत असतांनाच त्याचें पाऊल गुरुदेवांच्या निवासांत पडलें.

● ●

# विलक्षण गुरुदक्षिणा

दुर्योधन स्वतःच्या झालेल्या फजितीनें हिरमुसला झाला होता. वरकरणीं तो सर्वांशीं बोलत होता. पण मनांत खट्टू होता. नेहमींची क्रीडांगणावर जमण्याची वेळ झाली, तशी कौरव-पांडव क्रीडांगणावर जमले. द्रोणाचार्यहि उपस्थित झाले. जणुं आपण या गांवचेच नाहीं, अशी भूमिका घेऊन दुर्योधन द्रोणाचार्यांना म्हणाला,

" गुरुदेव, आज आम्हां सर्वांना आपण माहेश्वरी विद्या शिकवा." त्याच्या बोलण्यानें द्रोणाचार्य उमगले कीं, दुर्योधन हा कालच्या त्याच्या फजितीच्या प्रसंगावर सारवासारव करतो आहे. हें जाणूनच त्यांनीं त्याच्या म्हणण्याला होकार दिला. ते म्हणाले,

" चला, आज मी तुम्हांला एक नवीन अस्त्रविद्या शिकवणार आहें; या विद्येचं नांव आहे माहेश्वरी विद्या व या अस्त्रविद्येचा प्रत्यक्ष प्रयोगच मी तुम्हांला करून दाखवणार आहें. चला माझ्याबरोबर."

सर्वांना घेऊन द्रोणाचार्य आदल्या दिवशींच्या त्याच वडाच्या झाडाकडे आले. तेथें येतांच त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला; कारण त्या वडाच्या झाडावर एकहि पान शिल्लक नव्हतें. दुर्योधन तर तें पाहून थक्कच झाला. हें असें झालें तरी कसें ? असें दोघांनाहि वाटलें. पण दोघांच्याहि वाटण्यांत बरेंच अंतर होतें. दुर्योधनाशिवाय या विद्येची आपण अजून कोणालाहि कल्पना दिली

नसतांना या विद्येंत कोण पारंगत झाला ही द्रोणाचार्यांची जिज्ञासा होती. तर आपल्याला अजिबात जमलें नाहीं त्यांत संपूर्णतया यशस्वी झालेला हा कदाचित् अर्जुनच निघाला तर ? ही दुर्योधनाची भीति होती.

तेव्हां साहजिकच गुरुदेवांचें लक्ष धनुर्धारी अर्जुनाकडे गेलें. गुरुदेवांच्या दृष्टींतील आशय समजण्याला अर्जुनाला वेळ लागला नाहीं. आणि त्याच्याहि मनांत काल घडलेला प्रसंग सांगायचाच होता. तो आत्मप्रौढीचा वाटण्यासारखा प्रसंग सांगावा किंवा नाहीं, या शंकेनेंच तो आतांपर्यंत बोलला नव्हता. पण आतां स्पष्टपणें सांगण्याशिवाय गत्यंतरच नव्हतें.

अतिशय नम्रतेनें पुढें होऊन खालीं मान घालून अर्जुन गुरुदेवांच्या समोर येऊन उभा ठाकला.

"अर्जुना ! ही घटना आहे काय ?" आचार्यांनीं विचारलें.

"आपलीच कृपा आहे गुरुदेव !" अर्जुनानें नम्रतेनें उत्तर दिलें.

"म्हणजे ? मीं नाहीं समजलों अर्जुना !"

"आपल्याच कृपेमुळं मी हें करूं शकलों, गुरुदेव !"

अर्जुनानें शांतपणें उत्तर दिलें. या उत्तरानें दुर्योधन तर थिजलाच, पण आचार्यांचें तितकेंसें समाधान झालें नाहीं; म्हणून त्यांनीं पुन्हां विचारलें, "अर्जुना, मी या विद्येची तुला कल्पना तरी दिली होती का ? मग ती माझी कृपा कशी ?"

"होय गुरुदेव ! आपण म्हणतां तें पूर्ण सत्य आहे. तथापि ती विद्या आपल्या कृपेमुळें मला प्राप्त झाली हेंहि सत्य आहे."

"मीं जर तुला ही विद्या शिकवली नाहीं तर ह्या विद्येचा प्रयोग केलास तरी कसा ?" कांहींतरी विलक्षण घटना घडली

आहे, हें जाणून त्याचा छडा लावण्यासाठीं द्रोणाचार्यांनीं विचारलें. अर्जुनानेंहि जें घडलें तेंच, त्यांच्या प्रश्नाला उत्तरें देत सांगण्याला सुरुवात केली.

"ही विद्या माझी मीच जाणूं शकलों, गुरुदेव !"

"हें सामर्थ्य तुला कोणी दिलं अर्जुना ?"

"भागीरथीच्या तीरावर प्रसन्न झालेल्या जलदेवतांनीं, गुरुदेव !" घटनेचा उलगडा होऊं लागला तसा द्रोणाचार्यांना सात्विक आनंद झाला.

"तुझ्यावर त्या प्रसन्न झाल्या ? असं काय तुझ्यांत त्यांनीं पाहिलं ?"

"गंगेच्या विशाल जलाशयावर माझी झालेली दृष्टीची एकाग्रता, गुरुदेव ! ती एकाग्रताच नाहीं का आपण माझ्या मनावर ठसवली ? त्याचाच परिणाम आहे हा."

"मग त्यांनींच तुला ही विद्या दिली ?"

"नाहीं गुरुदेव ! 'तूं स्मरण करशील ती विद्या तुला प्राप्त होईल' असा आशीर्वाद त्यांनीं मला दिला. आणि त्याचाच प्रयोग या झाडावर आधीं कोणीं केला असल्यानें मींहि करून पाहिला."

या वेळीं द्रोणाचार्यांची दृष्टि साहजिकच दुर्योधनाकडे वळली. दुर्योधन खालीं मान घालून उभा होता. या वेळीं वर तोंड करण्याची त्याची हिंमतहि होत नव्हती. कारण आतां सगळेंच आपलें कारस्थान उघडें पडणार अशी भीति त्याला निर्माण झाली होती.

द्रोणाचार्यांना या घटनेनें आनंदच झाला. पण हा प्रयोग करतेवेळीं आपला पाण्यानें भरलेला कमंडलू यानें जमिनीवर ठेवला असावा असें वाटून त्यांना राग आला. आणि त्यांनीं विचारलें,

"अर्जुना, त्या वेळीं कमंडलू कुठं ठेवला होतास ?"

" गुरुदेव, कमंडलूची योजना बाणावर केली होती, आणि तो बाण अवकाशांत पाठवून दिला होता. "

हें ऐकतांच द्रोणाचार्यांना अर्जुनाविषयीं मनस्वी आनंद झाला. त्यांनीं त्याला हृदयाशीं धरलें. त्याच्या पाठीवर शाबासकी देऊन त्याला कुरवाळीत म्हणाले, " अर्जुना ! तूंच माझा शिष्योत्तम आहेस. माझी इच्छा तूंच एकटा पूर्ण करूं शकशील, अशी आतां मला निश्चित खात्री वाटूं लागली आहे. "

कौरव-पांडवाच्या समोर हें सारें घडत होतें. गुरुदेवांनीं केलेलें अर्जुनाचें कौतुक पाहून पांडवांच्या अंगावर रोमांच उभे राहिले; तर, कौरवांच्या अंतःकरणांत मुळांत असलेला पांडवांचा द्वेष अनंत पटींनीं वाढला. दुर्योधन तर द्वेषाग्नीनें काळानिळा झाला. पण आतां करणार काय ? त्याच्या हातांत कांहीं राहिलेंच नव्हतें.

द्रोणाचार्यांनीं सर्वांच्या समक्ष माहेश्वरी विद्येचा प्रयोग करण्यास अर्जुनाला सांगितलें. अर्जुनानेंहि गुरुदेवांना वंदन करून तो प्रयोग संपूर्णपणें यशस्वी करून दाखविला.

अर्जुनाचें धनुर्विद्येंतील श्रेष्ठत्व आतां निर्विवाद झालें होतें. त्याला स्वतंत्रपणें शिकविण्याची द्रोणाचार्यांची विशेष इच्छा होती ती या प्रसंगानें सफल झाली.

द्रोणाचार्य सर्वांना उद्देशून म्हणाले, " आतांपर्यंत झालेल्या दोन्ही कसोट्यांमध्यें अर्जुन उत्तीर्ण झाला आहे. त्यानं स्वतःचं असं वेगळं स्थान तुम्हां सर्वांमध्यें निर्माण केलं आहे. ही गोष्ट त्याला, तुम्हां सर्वांना तशीच मलाहि अभिमानाची आहे. त्याचं धनुर्विद्याकौशल्य जास्तींत जास्त कसं प्रभावी होईल याची मी दक्षता घेणार आहें. "

सर्वांच्या समक्ष हें सारें सांगण्यांत द्रोणाचार्यांचा एक हेतु होता. अर्जुनालाच सर्व कांहीं शिकविलें असें कोणीं म्हणूं नये; विशेष

करून दुर्योधनाच्या मनांत असलेली शंका बळावूं नये, असें त्यांना वाटत होतें.

द्रोणाचार्य अर्जुनाला दररोज विशेष शिक्षण देऊं लागले. अर्जुन तर विद्याग्रहणासाठीं सदैव तत्परच होता. त्याला लाभलेल्या यशामुळें त्याच्या बुद्धीला अशी कांहीं धार आली होती कीं, द्रोणाचार्यांच्या मुखांतून आणि हातांतून निघणारे धनुर्विद्येचे पाठ तो सहजासहजीं आत्मसात् करीत होता. द्रोणाचार्यांनाहि अर्जुनाला शिकविण्यांत विशेष आनंद तसेंच समाधान लाभत होतें. स्वतः द्रोणाचार्यहि शिकविण्यांत रंगून जात होते. वेळाकाळाचें त्यांनाहि भान रहात नव्हतें.

द्रोणाचार्यांनीं अर्जुनाच्या विद्याग्रहणावर विशेष प्रसन्न होऊन धनुर्विद्येतील चमत्कार समजले जाणारे दंडायुद्धाचे प्रकार अर्जुनाला शिकविले. त्या छत्तीस दंडायुद्धांचें प्रेरण, समाकर्षण, कसें करावें याचें सप्रयोग ज्ञान त्यांनीं त्याला दिलें. सव्यापसव्य, लघुलाघव असे जोडीचे प्रकार शिकवून दृढ, शीघ्र, दुरापात नांवाचे कठीण प्रयोगहि त्याच्याकडून करून घेतले.

ज्या आत्मीयतेनें अर्जुनाला द्रोणाचार्यांनीं शिकविलें त्यापेक्षां अधिक उत्साहानें अर्जुनानें ती विद्या घेतली. आणि तीमध्यें त्यानें इतकी गति वाढवली कीं, द्रोणाचार्यांच्या अंतःकरणांत आपल्या प्रतिज्ञापूर्तीबद्दल नुसता आत्मविश्वासच निर्माण झाला असें नाहीं तर आपला हा विद्यार्थी आपल्यापेक्षां तिप्पट गुणी झाला आहे, अशी त्यांची खात्री पटली. याच वेळीं त्यांच्या मनाचें स्वप्नचित्र साकार झाल्यासारखें त्यांना वाटलें.

अध्यापनाशिवाय अध्ययनाची पूर्तता नसते, ह्याची पुरेपूर जाणीव असल्यानें द्रोणाचार्यांनीं आपली शस्त्रास्त्रविद्या विद्या-

र्थ्यांना दिली. ज्यासाठीं हें अध्यापन त्यांनीं केलें होतें, तो विचार त्यांच्या मनांत आतां एकसारखा येऊं लागला. तो केव्हांतरी एकदां स्पष्ट केलाच पाहिजे, असें त्यांनीं निश्चित ठरविलें आणि एकदां सर्वांना आपल्या निवासस्थानीं बोलाविलें.

द्रोणाचार्यांच्या आदेशानुसार कौरव-पांडव त्यांच्या निवासस्थानीं जमले. आपल्याला येथें कशासाठीं बोलाविलें याचा त्यांच्यापैकीं कोणालाच पत्ता नव्हता. त्यामुळें ते सारे आपसांत कुजबुजत होते.

द्रोणाचार्य येतांच सर्वांनीं उठून त्यांना अभिवादन केलें. सर्वांना बसावयास सांगून द्रोणाचार्य म्हणाले,

" माझ्या विद्यार्थ्यांनो ! मी आज तुम्हांला इथं कां बोलावलं याचं कारण तुमच्या लक्षांत आलं नसेल आणि तें लक्षांत येणारहि नाहीं. तें स्पष्ट करण्यासाठींच मी तुम्हां सर्वांना आज कांहीं विशेष गोष्ट सांगणार आहें. "

नेहमींपेक्षां कांहीं वेगळेंच ऐकावयास मिळणार या जाणिवेनें सर्व स्तब्ध झाले होते. साऱ्यांचे डोळे आणि कान आचार्यांच्या भाषणाकडे लागून राहिले होते.

" हें पाहा, मीं माझी सर्व विद्या तुम्हांला दिली आहे. गुरूचें कर्तव्य मीं पार पाडलें आहे. त्यांत कोणत्याहि प्रकारची कुचराई माझ्याकडून झालेली नाहीं, असा माझा आत्मविश्वास आहे.

" आतां मीं तुमच्या कर्तव्याबद्दल बोलणार आहें. जसा मी माझ्या कर्तव्यांतून मुक्त झालों, तसे तुम्ही, माझ्या विद्यार्थ्यांनींहि आपल्या ऋणांतून मुक्त होणें आवश्यक आहे.

" विद्यार्थ्यांनीं गुरुजनांच्या ऋणांतून मुक्त होणं म्हणजे त्यांना गुरुदक्षिणा अर्पण करणें. ती गुरुदक्षिणा मी आपणहून तुम्हांकडे

मागणार आहें. वास्तविक हें मीं बोलणें वा मागणें बरोबर नाहीं, तरी पण मी माझ्या मनांतील हेतुसिद्धीसाठीं हें बोललों आहें. अर्थात् त्यांत वावगें असें कांहीं नाहीं !"

सर्वांनीं हें भाषण ऐकलें. केवळ गुरुदक्षिणेसाठींच आपणांला द्रोणाचार्यांनीं बोलावलें यांत विशेष असें कौरवांना कांहींच वाटलें नाहीं. त्यांतहि दुर्योधनाला ऐश्वर्याचा उन्माद असल्यानें असल्या साध्या गोष्टीसाठीं सर्वांना एकत्र आणण्याचें कारणच काय, असें त्याला वाटलें. त्याच विचारांत तो उठून उभा राहिला आणि म्हणाला,

"आचार्य ! आपण गुरुदक्षिणेची इच्छा प्रकट केलीत, हें एका दृष्टीनें बरेंच झालें. आम्ही आपल्या ऋणांतून मुक्त होणें हें योग्यच आहे. आपण कांहींहि मागितलेंत तरी आम्हां कौरवांना तें अशक्य नाहीं. आपण कांहीं मागा ! महावस्त्रें, अलंकार, द्रव्य-राशी इत्यादि कोणत्याहि गोष्टींची मागणी करा. त्याची पूर्ति आम्ही करूं, इतकेंच काय एखाद्या देशाची मागणी केलीत तरी आपल्याला एखादा देशहि देऊन टाकूं. तेव्हां कोणत्याहि प्रकारचा संकोच न करतां आपण दक्षिणेची मागणी करावी."

दुर्योधनाच्या या भाषणाला कौरवांनीं पाठिंबा दिला.

पांडव स्तब्ध राहिले. अर्जुन मात्र हळूच हंसला, कारण त्यानेंच फक्त जाणलें होतें कीं द्रोणाचार्यांना अशा प्रकारची गुरुदक्षिणा नको आहे आणि तें द्रोणाचार्यांच्या पुढील बोलण्यानें स्पष्टहि झालें.

दुर्योधनाचें तें सत्ता-संपत्तीचा वास असणारें भाषण ऐकून द्रोणाचार्य ताबडतोब उत्तरले, "दुर्योधना ! असल्या क्षुल्लक गुरु-दक्षिणेसाठीं मीं माझी बहुमोल विद्या तुम्हांला दिलेली नाहीं.

अर्थात् तूं तुझ्या मनोधर्माप्रमाणें बोललास हें ठीक आहे. पण केवळ, द्रव्य-वस्त्रावर दृष्टि ठेवून मीं तुम्हांला विद्या दिली नाहीं, हें तूं पुन्हां एकदा लक्षांत ठेव."

द्रोणाचार्यांच्या या स्पष्ट उद्गारांनीं सारे कौरव स्तिमित झाले. दुर्योधन-दुःशासनांना कसेंसेंच वाटलें. त्यांतहि दुर्योधनाला असें वाटलें कीं, 'अशी कोणती गुरुदक्षिणा यांची असेल ? समजा, ती आपणांस देतां आली नाहीं तर ? '

हेंच जाणून घेण्यासाठीं दुर्योधनानें विचारलें, " महाराज ! मग आपली इच्छा तरी कोणती आहे ? "

" मीं दिलेल्या धनुर्विद्येच्या पराक्रमानें तुम्ही मला संतुष्ट केलेंत, म्हणजेच मला गुरुदक्षिणा मिळाली असें मी समजेन. "

द्रोणाचार्यांचें तें बोलणें ऐकूनहि तशी कांहीं विशेष गुरुदक्षिणेची अट आहे असें दुर्योधनाला वाटलें नाहीं. ती आपण सहज पुरी करूं शकूं अशा आविर्भावांत दुर्योधन म्हणाला,

" आम्ही कोणावर पराक्रम दाखवून आपली गुरुदक्षिणा द्यावयाची आहे ? "

दुर्योधनाचा तो प्रश्न ऐकतांच द्रोणाचार्य त्याच्यावर नजर रोखून म्हणाले, " दुर्योधना ! ऐकायची आहे इच्छा ? पण ती ऐकून गप्प मात्र होऊं नकोस ! पांचाल देशाच्या द्रुपदराजाला माझ्यासमोर बांधून आणावें, अशी माझी इच्छा आहे. ही माझी इच्छा जो पूर्ण करील तोच माझा खरा शिष्य ! आणि तीच माझी खरी खरी गुरुदक्षिणा ! "

द्रोणाचार्यांचे ते उद्गार ऐकून दुर्योधन कांहींहि न बोलतां मटकन् खालींच बसला. त्याचा अपेक्षाभंग झाला होता. अशी कांहीं विलक्षण गुरुदक्षिणा असेल असें त्याला वाटलें नव्हतें.

दुर्योधन कांहींहि न बोलतां खालीं बसलेला पाहतांच द्रोणाचार्य म्हणाले, " दुर्योधना, खालीं कां बसलास ? मघाशीं तर मोठ्या जोरानं बोलत होतास. अरे तुझ्या नेहमींच्या वागण्याबोलण्याला हें शोभून दिसत नाहीं. त्यांतूनहि तूं एकटा नाहींस, तुम्ही शंभर भाऊ आहांत. कर्णासारखा पराक्रमी वीरहि तुझ्याबरोबर आहे. तुम्ही मनांत आणलें तर एकट्या द्रुपदाला बांधून आणणं विशेष अवघड नाहीं. एवढंहि धाडस तुला करवत नाहीं, याबद्दल मला फार वाईट वाटूं लागलं आहे. "

दुर्योधनाला बोललेलें सहन न होऊन कर्ण मध्येंच उठून बोलूं लागला. तो म्हणाला, " आचार्य ! द्रुपदराजाचा पराक्रम आपणांला माहीत नाहीं, म्हणूनच आपण दुर्योधनाला दोष देत आहांत. द्रुपदाजवळ फार मोठं सैन्य असून तो स्वतःहि फार मोठा पराक्रमी आहे. त्याला बांधून आणणं हें सामान्य काम नाहीं. "

कर्णाची ही लुडबूड ऐकून संतापलेले द्रोणाचार्य म्हणाले, " अरे कर्णा ! द्रोणाचार्यांच्या खऱ्या शिष्याला या जगांत सर्व कांहीं शक्य आहे ! आणि कर्णा, तूं हें बोलतोस ? परशुरामांजवळ— त्या थोर, गुरूजवळ विद्या घेतलेल्या तुला ही कमीपणाची भाषा शोभत नाहीं. उलट तुझी विद्या व्यर्थ आहे, असंच म्हणावं लागेल. मी पुन्हां एकदां निक्षून सांगतों कीं, माझ्या धनुर्विद्येचं खरंखुरं रहस्य ज्याला समजलं असेल तो द्रुपदाला सहजासहजीं बांधून आणील. "

अर्जुन हा संवाद स्वस्थपणें ऐकत होता. आपणाला ही गुरुदक्षिणा देण्याचें भाग्य लाभतें कीं नाहीं याचाच तो विचार करीत होता. पण झालें वेगळेंच. कोणीहि पुढें होईना, तेव्हां अर्जुन शांतपणें उभा राहिला. गुरुदेवांच्या पुढें येऊन हात जोडून नम्रतेनें म्हणाला,

"गुरुदेव ! आपण निराश होण्याचं मुळींच कारण नाहीं. आपण केवळ आज्ञा करावी. आपल्या कृपेनं आणि आपण दिलेल्या धनुर्विद्येच्या सामर्थ्यावर मी द्रुपदाला सहज बांधून आपणांसमोर आणीन."

अर्जुनाचें हें बोलणें ऐकतांच सगळे कौरव हंसूं लागले. त्यांना वाटलें हा अर्जुन वेडयासारखा बडबडतो आहे. कौरव आपसांत कुजबूज करूं लागले. 'या अर्जुनाला द्रुपदाचा पराक्रम माहीत नाहीं' 'स्वतः फार मोठा योद्धा लागून गेला कीं नाहीं!' 'फजीत होऊन, परतेल तेव्हां समजेल!' कोणी कांहीं कोणी कांहीं म्हणूं लागले.

परंतु अर्जुनाच्या आत्मविश्वासपूर्ण बोलण्यानें द्रोणाचार्यांना अत्यंत आनंद झाला. जवळ जाऊन त्याच्या मस्तकावर हात ठेवून ते म्हणाले, "अर्जुना, माझ्या सर्व शिष्यांत तूंच धन्य आहेस ! मला तुझ्याबद्दल विश्वास वाटतो कीं, तूं द्रुपदाला माझ्या समोर बांधून आणशील. मला तर तूंच खरा क्षत्रिय वाटतोस. जयापजयाचा विचार न करितां केवळ गुरूच्या इच्छेसाठीं, तूं युद्धाला तयार झालास यांतच सर्व आलें. तूं समर्थपणें युद्ध कर ! तुझा निश्चित विजय होईल. माझा तुला पूर्ण आशीर्वाद आहे."

द्रोणाचार्यांच्या पायांवर मस्तक ठेवून धनुर्धारी अर्जुन आशीर्वाद घेत होता, त्या वेळीं त्याच्या मनांत विचार चालले होते.

सर्वांच्या आधीं गुरुदक्षिणा देण्याचा मान मला मिळतो आहे. गुरुवर्यांनीं शिष्योत्तम मानून मला सर्व विद्या दिली, त्या विद्या-ऋणांतून सर्वप्रथम मला मुक्त झालंच पाहिजे. सर्वांत प्रथम गुरु-दक्षिणा मलाच दिली पाहिजे आणि तीहि गुरुदेवांच्या इच्छे-प्रमाणें; गुरुदेवांच्या समोर हात बांधलेल्या द्रुपदाला आणून

त्यांची गुरुदक्षिणा मी पूर्ण करीन. तें भाग्य मला लाभेल आणि त्यांतच मी कृतार्थ होईन ! ....'

ह्या विचारांतच रंगलेल्या अर्जुनाच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले. त्या अश्रुधारांनीं द्रोणाचार्यांच्या चरणांना अभिषेक झाला. द्रोणाचार्यांनीं त्याला वर उचललें. स्वतःच्या हातांनीं त्याच्या डोळ्यांतील अश्रु पुसले. दोन्ही हातांनीं त्याचे खांदे थोपटून "विजयी भव !" असा आशीर्वाद दिला. आणि बराच मोठा संग्राम त्याला एकट्याला करावा लागणार म्हणून द्रोणाचार्यांनीं त्याला मोहिनी अस्त्राची विद्या शिकवली. त्याच्या पाठीवरून हात फिरवीत त्याला निरोप दिला.

धर्मराज पांडवांतील सर्वांत मोठा. अर्जुन एकटाच जाणार, ही कल्पनासुद्धां त्याला सहन होईना. तेव्हां धर्म अर्जुनाला म्हणाला, "अर्जुना; माझं ऐक. तूं भीमाला बरोबर घेऊन जा."

पण अर्जुनानें त्या गोष्टीला स्पष्ट नकार देऊन सांगितलें, "दादा, गुरुदेवांची गुरुदक्षिणा मी एकट्यानंच देण्याचं ठरवलं आहे. नव्हे तशी मी प्रतिज्ञा केली आहे. दुसऱ्या कोणाला बरोबर नेण्यांत प्रतिज्ञेचं स्वारस्य तें काय राहिलं ! आणि त्यामुळें मी लोकांच्या टीकेचा विषय होईन तें वेगळंच ! 'एकट्याची हिंमत नव्हती तर प्रतिज्ञा कां करावी !' असं लोक हिणवतील. बरं, समजा, विजय मिळालाच तर 'जोडीला भीम होता म्हणून ! नाहींतर एकटा अर्जुन काय करूं शकतो ?' असं बोलायलाहि लोक कमी करणार नाहींत."

या उत्तरानें धर्म गप्प राहिला. कुंतीची अवस्था मात्र फारच अवघड झाली. ती वीरपत्नी होती तशीच वीरमाताहि होती. पतीच्या पश्चात् कुलभूषण ठरणाऱ्या पुत्राला एकटा समरांगणा-

वर प्रथमच पाठवीत असतांना कोणत्या माउलीच्या अंतःकरणांत गद्गदणार नाहीं ? निःशब्द होऊन तिनें अर्जुनाला छातीशीं धरलें. त्याच्या डोक्यावरून पाठीवर हात फिरविला. आणि कसेंतरी ती गद्गद स्वरांत पुटपुटली, " विजयी हो ! "

बंधूंचा व मातेचा निरोप घेऊन अर्जुन भीष्माचार्यांचा आशीर्वाद घेण्यासाठीं गेला. भीष्माचार्यांनीं विचारलें, " अर्जुना, बरोबर कोणाला नेणार नसलास तर निदान सैन्य तरी घेऊन जा. "

पण अर्जुनाला तेंहि मान्य नव्हतें. तो म्हणाला, " पितामह, मला सैन्य बरोबर कसं नेंतां येईल ? माझी प्रतिज्ञाच एकटयानं या युद्धाला जाण्याची आहे. त्या प्रतिज्ञेचा भंग नाहीं का होणार अशानं ? प्रतिज्ञाभंग करण्याला भीष्माचार्यच सांगूं लागले तर ! ... "

यापुढें कांहींहि न बोलतां अर्जुन थांबला. भीष्माचार्यांनींहि काय समजायचें तें समजून आशीर्वाद दिला.

केवळ एकटा अर्जुन रथांत बसून निघाला. त्याचे सहायक होते धनुष्य-बाण ! आणि गुरुजनांचे मनापासूनचे आशीर्वाद, आई-भावांचें सौहार्द व स्वतःचा प्रखर आत्मविश्वास !

गुरुदेव द्रोणाचार्यांचें मनोमन स्मरण करीत आणि गुरुदक्षिणा पार पाडल्याचें चित्र रंगवीत तो धनुर्धर शिष्य अर्जुन रथांत बसला. त्याचा रथ पांचाल देशाच्या राजधानीच्या रोखानें निघाला.

● ●

# शिष्याचा पराक्रम

" जा, तुमच्या राजाला जाऊन सांगा, तुला धरून नेण्यासाठीं द्रोणाचार्यांचा शिष्य अर्जुन शृंगारवनांत येऊन थांबला आहे. "

अर्जुन डौलानें बोलत होता. त्याच्या बोलण्याकडे हालचालीकडे त्या शृंगारवनाचे रक्षक पहातच राहिले. द्रुपदाच्या खास आदेशानुसार तयार करण्यांत आलेल्या शृंगारवनांत प्रथम याच रक्षकांनीं त्याला अडविलें होतें. पण त्यांच्याकडे पूर्ण दुर्लक्ष करून अर्जुन वेगानें रथ हांकारून पुढें निघाला. त्याच्या रथ हांकण्याच्या कौशल्यानें आणि वेगानें सारे रक्षक बाजूला झाले आणि नकळत त्याच्या रथाच्या मागून पळत निघाले.

शृंगारवनाच्या मध्यभागीं आल्यावर इकडे तिकडे पहात अर्जुनानें आदेशस्वरूपांत वरील उद्गार काढले. त्याच्या उद्गारांतील आत्मविश्वास सर्वांना जाणवणारा होता. याला पुन्हां अडविण्यांत किंवा याच्याशीं अधिक बोलण्यांत अर्थ नाहीं असें जाणून त्यांच्यापैकीं कांहींजण राजाला सांगण्याकरितां धांवत गेले.

अर्जुन पांचाल देशाच्या राजधानींत शिरला तो राजमार्गानें थेट शृंगारवनाच्या प्रवेशद्वारापाशीं आला होता. द्रुपदराजाच्या राजधानीचें शृंगारवन हें भूषण मानलें जात होतें. सर्व प्रकारच्या ऋतूंतील सोई त्या वनांत होत्या. नाना जातींच्या फुलझाडांनीं, फळबागांनीं समृद्ध असलेल्या त्या शृंगारवनांत चौकाचौकांतून

पुष्करण्या बांधल्या होत्या. त्यांच्या मध्यभागीं उत्तमोत्तम शिल्पकृति ठेवलेल्या होत्या. अष्टौप्रहर उडणारीं तेथील कारंजीं वातावरणाला सजीवता आणीत होतीं. प्रसन्नतेनें आपलें ऐश्वर्य प्रकट करणाऱ्या त्या शृंगारवनाच्या मध्यभागीं द्रुपदराजाचा प्रासाद होता. त्या ऐश्वर्यशाली राजवाड्यांतच द्रुपदराजाचें वास्तव्य असतें हें जाणून अर्जुन तडक प्रवेशद्वारांतून आंत निघाला, त्या वेळींच तेथील रक्षकांनीं त्याला अडवीत दटावलें, ' कोण आहे रे तो ? अडवा ! अडवा तो रथ. प्रवेशपत्राशिवाय आंत प्रवेश करतो आहे तो ! "

पण त्यांच्या बोलण्याकडे किंवा अडविण्याकडे अर्जुन लक्ष देतोच कशाला ? भरवेगानें त्याचा रथ निघाला तो थेट शृंगारवनाच्या मध्यभागीं असलेल्या प्रशस्त चौकांत येऊन थांबला. आणि मागाहून धांवत आलेल्या रक्षकांना त्यानें पुन्हां ऐकविलें—

" जा, तुमच्या राजाला जाऊन सांगा, पळा लवकर ! "

राजाकडे धांवत गेलेल्या सेवकांना प्रश्न पडला कीं, राजापुढें जाऊन काय सांगायचें ? अखेर त्यांतलाच एक हुशार सेवक पुढें झाला. विश्रांति घेत पडलेल्या राजासमोर जाऊन त्रिवार प्रणाम करून तो म्हणाला, " महाराजांचा जयजयकार असो ! "

पडल्यापडल्याच द्रुपदराजानें विचारलें, " काय रे, कां आलास तूं ? "

" महाराज क्षमा असावी. शृंगारवनांत येऊन एक माणूस बडबडतो आहे. "

" अरे पण तो आंत आला कसा ? "

" महाराज; आम्हीं अडवलं त्याला, पण तसाच त्यानं आपला रथ वेगानं आंत आणला. "

" रथांत बसून वेगानं आंत आला तो ? आणि बडबडतोय् काय ? "

द्रुपदानें विचारतांक्षणीं तो रक्षक गडबडला. तेव्हां राजानें त्याला सांगितलें, " घाबरूं नकोस ! तो काय म्हणाला हें स्पष्ट सांग. "

" महाराज, तो बडबडतो कीं, ' तुझ्या राजाला जाऊन सांग ! कीं तुला धरून नेण्यासाठीं द्रोणाचार्यांचा शिष्य मी अर्जुन आलो आहें. "

" अस्सं ? ठीक आहे, जा आतां तूं ! " याप्रमाणें द्रुपदानें त्याला सांगितलें खरें; पण द्रोणाचार्यांचें नांव ऐकतांच त्याला पाठीमागें घडलेला प्रसंग आठवला. तसा त्या आठवणीनें तो चमकलाहि. पण तो सत्तेच्या मदानें धुंद झालेला होता. त्याला विवेक कुठून सुचायला ? त्यानें भद्रसेन नांवाच्या आपल्या सेनापतीला बोलावून घेतलें, आणि शृंगारवनांत घुसलेल्या अर्जुनाला स्वतः जाऊन पकडून आणण्याची आज्ञा केली. ती आज्ञा ऐकून भद्रसेन अचंब्यानें म्हणाला, " महाराज, आपली आज्ञा मला मान्य आहे. पण अशा सामान्य माणसाला पकडून आणण्यासाठीं मी स्वतः जाण्याची काय जरुरी आहे ! मग मोठमोठ्या रथी, महारथी योद्ध्यांबरोबर लढण्यास आपण कोणास पाठवणार ? "

भद्रसेनाचें बोलणें न पटून द्रुपद राजानें सांगितलें, ' भद्रसेन ! मीं आज्ञा दिली आहे ती खरी. तुम्ही कांहीं करा, फक्त त्याला माझ्यापुढं पकडून आणा म्हणजे झालं. "

" आज्ञा महाराज ! " त्रिवार वंदन करून भद्रसेन बाहेर पडला. एका सामान्य माणसाला धरून आणण्यासाठीं स्वतः आपण जाणें त्याला कांहीं प्रशस्त वाटेना; पण अर्जुनाला पकडून तर आणलेंच

पाहिजे होतें. कारण राजाची ती आज्ञा आहे. म्हणून भद्रसेनानें रखवाली करणाऱ्या कांहीं रक्षकांना एकत्र बोलविलें आणि त्यांना आदेश दिला, " जा, त्या शृंगारवनांतील मध्यभागीं असलेल्या चौकांत एक माणूस रथांत बसून बडबडतो आहे, त्याला पकडून आणा ! "

ते सारे रक्षक हातांतील शस्त्रें सरसावून अर्जुनाच्या रथावर चालून गेले. त्या सर्वांना पाहून अर्जुनाच्या मनांत आलें कीं, आपल्याला अगदीं सामान्य मानव समजून हीं माणसें पाठवून देण्यांत आलीं आहेत. सेनापति अगर दुसरा कोणी मोठा योद्धा आलेला दिसत नाहीं. हा तर आपला अपमान आहे. असा सगळा विचार करून अर्जुनानें एक क्षर बण सोडला, आणि तोहि सहजपणें. त्या एकाच बाणाची गति अशी कांहीं विचित्र होती कीं, एकाच वेळीं अनेक बाणांचा संचार होत आहे असें पाहणारांना वाटलें. त्या बाणानें अर्जुनाच्या अंगावर धांवून आलेल्या सर्वांचे नाक आणि ओठच कापले गेले.

अचानक हा एकाच बाणाचा प्रताप अनुभवून ' ते रक्षक घाबरून गेले. नाक आणि ओठ तुटल्यामुळें विद्रूप होऊन रक्तबंबाळ झालेले ते रक्षक भद्रसेनाकडे रडत-ओरडतच गेले. भद्रसेनानें जेव्हां त्यांच्याकडे पाहिलें तेव्हां त्याला त्यांनीं कांहींहि न सांगतां सारें समजलें. भद्रसेनाच्या लक्षांत आलें कीं हा बडबडणारा माणूस दिसतो तसा सामान्य नाहीं; तरी पण त्यानें एकाला सर्व माहिती विचारून घेतली. अर्जुनाच्या केवळ एकाच बाणानें सहजासहजीं असा चमत्कार केला हें जेव्हां त्यानें ऐकलें तेव्हां तो फार आश्चर्यचकित झाला. आणि मग मात्र स्वत:च त्याच्यावर चाल करण्यासाठीं निघाला. निघतेवेळीं त्यानें बरेंचसें सैन्य बरोबर घेतलें.

रथावर चारी बाजूंनीं चालून जाण्यासाठीं हत्ती, घोडदळ धनुर्धारी सैनिक यांच्यासह भद्रसेन निघाला. सर्वांना सूचना देऊन, त्यानें अर्जुनाभोंवतीं गराडा घातला. आणि स्वतः त्याच्यावर बाणांचा वर्षाव करण्यास प्रारंभ केला. भद्रसेनाला वाटलें, कदाचित् अर्जुन आपल्या बाणवृष्टीनें घाबरून जाईल. पण झालें वेगळेंच. अर्जुनानें त्याच्या बाणवर्षावाचें आपल्या बाणांनीं निवारण केलें. तो भद्रसेनाच्या रोखानें पुढें येऊं लागला, तसा भद्रसेन घाबरलाच. तरीपण धीर धरून तो म्हणाला,

"अर्जुना ! तसं पाहिलं तर तूं अजून लहान आहेस. तुझ्यासारख्या पोराबरोबर युद्ध करणं हें मला योग्य वाटत नाहीं. तूं इथं एकटा येण्यांत तुझं अज्ञानच प्रकट झालं आहे. तरी मीं तुला सांगतों कीं तूं आल्या मार्गानं परत जा ! नाहीं तर तूं स्वतःचं मरण मात्र ओढवून घेशील."

भद्रसेनाचें हें घमेंडीचें बोलणें ऐकून अर्जुनाला त्याची कींव आली. याला आपल्याबद्दल कशी माहिती असणार तेव्हां आपणच जाणीव करून दिली पाहिजे; असें मनांत येऊन अर्जुन त्याला म्हणाला,

"भद्रसेना ! माझ्याबद्दल नाहीं ती समजूत करून घेऊं नकोस. आतांपर्यंत बोललास तेवढं पुरे ! आधीं युद्धाला तयार हो; मग पुढलं पुढं बघूं !"

अर्जुनाच्या या आत्मविश्वासपूर्ण उत्तरानें भद्रसेनाचा निरुपायच झाला. कारण पहिल्याच तडाख्यांत अर्जुनानें आपल्या युद्धकौशल्याची चुणूक त्याला दाखविली होती; त्यामुळें मनांतून तो थोडासा गांगरलाच होता. पण अर्जुनाच्या आव्हानामुळें त्याला आतां युद्धाला प्रवृत्त होणें भागच पडलें.

भद्रसेनानें अर्जुनाबरोबर युद्ध करण्यास प्रारंभ केला तो चढाईनेंच. एकाच वेळीं पांच प्रकारचे बाण त्यानें अर्जुनावर टाकले. पण अर्जुनानें ते बाण एकाच बाणानें तोडून टाकले; आणि एका बाणाचे अनंत बाण होणाऱ्या बाणांची वृष्टि त्याच्या सैन्यावर केली. सैनिकांना हें कळेचना कीं हे बाण येतात तरी कोठून ? आणि किती ? त्या जीवघेण्या बाणवर्षावानें भद्रसेनाचें सैन्य भयभीत झालें. आणि दाही दिशांना पळूं लागलें. सैन्यांतील भीतीचें वातावरण पाहून भद्रसेन थोडासा वरमला; तरी पण सैनिकांना 'घावरूं नका ! पळून जाऊं नका ! ' असें ओरडून सांगत त्यानें युद्ध चालूच ठेवलें. तथापि थोडयाच वेळांत अर्जुनाचा एक बाण त्याच्या मस्तकाला स्पर्श करून गेला. त्या बाणानें आपलें काम केलें. भद्रसेन मूर्च्छित होऊन पडला. अर्जुन त्याच्या जवळ आला. त्यानें त्याच्या डोक्यावर पांच पाट काढले. त्याचें नाक कापलें. दोन्ही कान कापून टाकले. तशाच मिशाहि कापून घेतल्या. थोडा वेळ तसेंच बसून स्वतःच्या कमरेच्या शेल्यानें त्याला वारा घालण्यास त्यानें सुरुवात केली. भद्रसेन थोडया वेळानें शुद्धीवर आला. आपली अवस्था पाहून तो शरमला. त्याची युद्धाची नि सामर्थ्याची घमेंड, खुमखुमी पार नाहींशी झाली होती. तो वर तोंड करूनसुद्धां पाहीना. तेव्हां अर्जुन त्याला म्हणाला,

"भद्रसेना ! तुला कळलं ना, मी किती लहान आहें, अज्ञानी आहे तें ! बरं तें असूं दे ! या शृंगारवनांत मीं तुला हा शृंगार दिला आहे. तो घेऊन जा आणि तुझ्या राजाला दाखव आणि त्यालाहि लवकर युद्धासाठीं पाठवून दे, जा."

भद्रसेन सेनापति अर्जुनाच्या हातांतून निसटला खरा; पण राजाला तोंड दाखवायचें कसें ? दोन्ही हातांनीं त्यानें आपलें

तोंड झांकून घेतलें. कसातरी लपतछपत तो भद्रसेन राजाजवळ आला आणि ढसढसा रडूं लागला.

"महाराज ! तो दिसतो छोटा बालवीर; पण आहे मात्र असमान्य योद्धा. अहो, मीं इतक्या लढाया जिंकल्या–एकट्यानं जिंकल्या. आयुष्यभर लढत आलों, पण यानं एका क्षणांत माझी अशी फजिती करून टाकली. मला कांहींच करतां आलं नाहीं. आणि हे अलंकार पाहिलेत का ? तुम्हांला दाखवायला सांगितलेत... "

असें म्हणून भद्रसेनानें स्वतःचें पाट काढलेलें डोकें, कापलेले नाक-कान, कापलेल्या अर्ध्यामुर्ध्या मिशा राजाला दाखविल्या. तेव्हां द्रुपद राजा संतापून म्हणाला, "भद्रसेन ! केवळ हें दाखवण्यासाठीं इथं परत आलांत काय तुम्ही ? "

"नाहीं महाराज ! हें सांगण्याकरतां आलों आहे कीं, आपण त्याच्याशीं वैर करूं नये. एवढंच नव्हे तर तो सांगेल त्याप्रमाणं आपण वागावं. नाहींतर कांहींतरी अनर्थ होईल असं मला भय वाटतं."

"माझा अनर्थ करणारा अजून जन्माला यायचा आहे; भद्रसेन !" द्रुपद राजा कडाडला, "आणि मी काय करावं हें तुम्ही मला सांगूं नये."

मग द्रुपद स्वतःच निघाला अर्जुनाशीं युद्ध करण्याकरितां. त्यानें आपल्या साऱ्या सैन्याला सज्ज होण्याची आज्ञा दिली. घोडदळ, पायदळ, गजदळ तयार झालें. खासे सैनिकहि निघाले. जणूं कांहीं फार मोठ्या सैन्याशींच गांठ पडणार होती. एकटा अर्जुन तर होता, पण द्रुपदानें त्याची धास्ती एवढी घेतली होती कीं, जणूं कित्येक अक्षौहिणी सैन्यासह एखादा महारथी युद्धाला उतरला आहे.

शृंगारवनांत मोठमोठीं अनेक पटांगणें होतीं. त्यांतल्याच एका मोठ्या पटांगणांत द्रुपदाचें सारें सैन्य एकवटलें होतें. त्या सर्व सैन्याच्या पुढें एकटा अर्जुन आपल्या रथांत बसून तें सर्व दृश्य पहात होता. त्याच्याच रोखानें येणाऱ्या द्रुपदानें त्याच्याभोंवतीं बाणांचें जाळें विणण्यास सुरुवात केली. तें जाळें आकाशांत फार मोठ्या अंतरावरून तयार होत होतें. ढगासारखा बाणांचा मेघ तयार होऊं लागला, तसा अंधार पडूं लागला. अर्जुनाच्या लक्षांत आलें. त्यानें एकच बाण अभिमंत्रून सोडला. त्याचे अक्षरशः कोटि कोटि बाण तयार झाले. आणि त्या बाणांनीं द्रुपदानें रचलेलें जाळें पार नष्ट करून टाकलें. आतां मात्र द्रुपदाला अर्जुनाच्या खऱ्या सामर्थ्याची कल्पना आली. पण आतां युद्ध मध्येंच थांबवणार कसें ? तें भ्याडपणाचें ठरलें असतें. म्हणून द्रुपदानें स्वतःचा रथ अर्जुनाच्या पुढ्यांत नेऊन उभा केला.

दोघांचेहि रथ समोरासमोर उभे होते. कांहींहि न बोलतां युद्ध सुरू करणें बरें नाहीं असें समजून द्रुपद म्हणाला,

"पार्था ! तूं स्वतः आपणहून युद्ध करण्यास आला असतास तर योद्धा म्हणून मी तुझं अभिनंदन केलं असतं. पण तूं दुसऱ्याच्या सांगण्यावरून इथं लढण्यास आला आहेस. मला वाटतं तुला तुझ्या प्राणांची किंमत दिसत नाहीं. त्याहिपेक्षां मला तुझ्या दुसऱ्या अविचाराबद्दल विशेष वाईट वाटतं; तें हें कीं, द्रोणासारख्यांच्या सांगण्यावरून तूं इथं आलास !"

अर्जुन फक्त ऐकत होता. द्रुपदाच्या अहंकारी वृत्तीची त्याला चीड येऊं लागली होती. पण अजून त्याची सहनशक्ति संपली नव्हती.

पुन्हां द्रुपद म्हणाला, "अरे, द्रोणाची योग्यता ती काय ! घरोघर भिक्षा मागून कसंतरी पोट भरणाऱ्या ब्राह्मणाला राज्याची इच्छा असावी ? मोठं नवलच आहे; नव्हे शुद्ध वेडेपणा आहे ! त्याहिपेक्षां तुझ्यासारख्या पोराला त्यानं त्याच्या प्रतिज्ञापूर्तीसाठीं पाठवावं, हा तर वेडेपणाचा कळस म्हटला पाहिजे. भिकारी ब्राह्मणाचा शिष्य बनणारा तूं तर मला महामूर्ख दिसतोस !"

द्रुपद राजा जेव्हां अर्जुनाच्या प्रत्यक्ष गुरूविषयीं–द्रोणाचार्याविषयीं अनादरानें बोलूं लागला तेव्हां साहजिकच अर्जुनाचा उजवा हात त्याच्या भात्याकडे गेला.

द्रुपदाच्या हें लक्षांत यायला वेळ लागला नाहीं. म्हणून चटकन विषय वदलून तो म्हणाला, " पण आतां तूं माझ्यासमोर युद्धासाठीं उभा ठाकला आहेस ! त्यामुळें मला तुझ्याशीं युद्ध केलंच पाहिजे. वास्तविक तुझ्यासारख्या पोराबरोबर युद्ध करण्याचा माझ्यावर प्रसंग यावा... "

अर्जुन एकदम उसळून ओरडला, " पुरे कर द्रुपदा, तुझी घमेंडखोर वटवट ! आचार्य ब्राह्मण खरे, पण भिकारी नव्हेत तूं समजतोस तसे ! आणि त्यांचा पराक्रम समजण्यापूर्वीं त्यांच्या–तुझ्या दृष्टीनें या महामूर्ख–शिष्याचा पराक्रम प्रत्यक्षच पहा. व्यर्थ वेळ दवडूं नकोस. हा पहा द्रोणशिष्याचा बाण आला तुझा वेध घेण्यासाठीं. सांभाळ ! "

असें म्हणून अर्जुनानें धनुष्याची प्रत्यंचा ताणली आणि त्याच्या धनुष्यापासून एक तेजस्वी बाण सुटला.

द्रुपदानेंहि अर्जुनाच्या बोलण्याबरोबर निर्वाणीचा एक बाण सोडला. त्या बाणानें अर्जुनाच्या रथाभोंवतीं बाणांचें जाळें तयार

होऊं लागलें. हें जाळें जर पूर्ण तयार झालें तर यांतून सुटणें अति अवघड आहे; हें जाणून अर्जुनानें सावध होऊन लगेच अग्निबाण सोडला. त्यामुळें बाणांचें जाळें जळून जाऊन अर्जुनाच्या अग्निबाणानें उलट द्रुपदाच्या सैन्यावर अग्निवर्षाव करण्यास सुरुवात केली. सगळ्या सैन्यांत आगीचे लोळ निर्माण झाले. लांकडी रथ जळूं लागले. घोडे, हत्ती आगीनें होरपळून इतस्ततः धांवूं लागले. सैनिक हाय खाऊन ओरडूं लागले, पळूं लागले. तेव्हां द्रुपदानें पर्जन्यास्त्राचे मंत्र म्हणून बाण सोडला. त्याबरोबर आकाशांत काळे मेघ संचार करूं लागले. विजा चमकूं लागल्या. मुसळधार पाऊस पडूं लागला. पावसानें अग्नि विझविण्याचें आपलें काम केलें. पण त्यांतून एक निराळीच आपत्ति निर्माण झाली. पावसानें उत्पन्न झालेल्या पाणलोटांत द्रुपदाचें सारें सैन्य वाहून जाऊं लागलें.

अर्जुन एकटाच होता. पर्जन्यास्त्राचा त्रास द्रुपदाच्याच सैन्याला होऊं लागला. पण त्या अस्त्रावर आपल्याजवळ कांहीं प्रतिअस्त्राचा इलाज नाहीं अशी द्रुपदाची समजूत होऊं नये म्हणून अर्जुनानें मारुतास्त्राचा उपयोग केला. त्याबरोबर सोसाट्याचा वारा सुटला. सारी मेघमाला पांगली, आकाशांतील ढग विरले, पाऊस थांबला, पण वाऱ्यानें इतका तुफान वेग घेतला कीं. मोठमोठ्या वावटळी निर्माण झाल्या. कांहीं दिसेनासें झालें. तेव्हां द्रुपदानें पर्वतास्त्राचा उपयोग केला. मोठमोठ्या पर्वतांच्या रांगा एखाद्या भुईकोट किल्ल्याच्या भिंतींप्रमाणें उभ्या ठाकल्या. वाऱ्याला अडथळा झाला. वारें थांबलें. पण जिकडे तिकडे अंधारच अंधार पसरला. म्हणून मग अर्जुनानें वज्रास्त्राचा उपयोग करून त्या पर्वतांचे तुकडे तुकडे करून टाकले.

द्रुपदानें सगळीकडे पाहिलें. त्याच्या सैन्याची धूळधाण झाली

होती. त्याच्या प्रत्येक अस्त्राला अर्जुनाकडून दुसऱ्या जबरदस्त अस्त्राचें उत्तर मिळत होतें; त्यामुळें द्रुपदाच्या मनांत अर्जुनाविषयीं खात्री पटली कीं हा सामान्य योद्धा नाहीं.

आतां कोणत्या अस्त्राची योजना करावी, याचा द्रुपद विचार करीत असतांनाच अर्जुनानें त्याच्यावर पांच बाण टाकले. द्रुपदाच्या रोखानें निघालेल्या त्या बाणांचा प्रतिकार होण्यापूर्वींच त्या बाणांनीं द्रुपदाच्या रथाचे घोडें आणि सारथी यांना मारून टाकलें.



सारथी नाहीं आणि घोडेहि नाहींत मग रथ चालणार कसा ? तेव्हां द्रुपदानें रथाच्या खालीं उडी टाकली. आणि तो दुसऱ्या रथांत चढूं लागला. त्या वेळीं अर्जुनानें त्याच्या सर्व सैन्यावर निद्रास्त्र सोडलें. सगळे सैनिक जागच्या जागीं आपलीं शस्त्रें खालीं टाकून झोपीं गेले. त्या मोहिनी अस्त्राच्या जबरदस्त प्रभावानें द्रुपदराजाहि रथांत चढतांचढतांच शस्त्रें टाकून निद्राधीन झाला आणि झोकांड्या खात रथांत पडला. द्रुपद राजासह राहिलेलें सैन्य निद्रित झालें हें पाहून अर्जुन रथाखालीं उतरला तो थेट द्रुपदाच्या रथावर गेला. त्या रथांत चढून द्रुपदाला त्यानें खांद्यावर घेतलें आणि आपल्या रथांत आणलें. स्वतःच्या कमरेच्या शेल्यानें द्रुपदाला त्यानें रथाच्या ध्वजस्तंभाला बांधून टाकलें.

अर्जुनाचा फार मोठा कार्यभाग झाला होता. आतां यापुढील काम कसें करायचें हा विचार करीत असतांनाच, त्यानें निश्चय करून मोहिनी अस्त्र काढून घेतलें.

हळूहळू सैन्य जागें होऊं लागलें. इकडेतिकडे पाहूं लागलें. तों त्यांना दिसलें कीं आपल्या राजाला अर्जुनाच्या रथावर ध्वज-स्तंभाला बांधून ठेवलें आहे. राजाची ही अवस्था तर आपलें काय होईल ! या भीतीनें सारे सैनिक पळूं लागले; भ्यालेल्या आणि पळूं लागलेल्या सैनिकांना अर्जुन म्हणाला,

" वीर हो ! तुम्ही मुळींच भिऊं नका ! घाबरूंहि नका आणि तुमच्या द्रुपदराजाबद्दलहि मुळींच काळजी करूं नका. मी एकदां त्याला माझ्या गुरुदेवांपुढं नेऊन उभा करणार. त्यांची भेट घडवून तुमचा राजा मी तुम्हांस परत देणार आहें. "

अर्जुनाच्या बोलण्यानें भ्यालेले सैनिक स्वस्थ झाले. आणि आतां येथें थांबण्यांत कांहींच अर्थ नाहीं असें जाणून तेथून निघून गेले.

द्रुपद राजाहि मोहिनी अस्त्रांतून मुक्त झाला होता. सैनिकांना उद्देशून केलेलें भापण त्यानें ऐकलें होतें. द्रोणाचार्यांच्या भेटीचा परिणाम काय होईल, याची द्रुपदाला पूर्ण कल्पना होती. म्हणून तो अर्जुनाला विनवणीच्या स्वरांत म्हणाला,

" पार्था, वाटल्यास तूं माझा शिरच्छेद कर, पण अशा स्थितींत तूं मला द्रोणाकडे नेऊं नकोस. अशा स्थितींत द्रोणानं पाहिल्यास माझी अवस्था मरणान्तिक होईल. खरं पाहिलं तर माझंच चुकलं. मीं त्याला अर्ध राज्य देण्याचं वचन दिलं होतं. पण तें मी बुद्धि-पुरस्सर पाळलं नाहीं. सत्तेच्या धुंदीनं भारावलेला मी त्याला वाटेल तसं बोललों. आतां त्याचं मला फार वाईट वाटतं. पण त्याचा आतां काय उपयोग ! मला द्रोणाकडे अशा स्थितींत नेण्यापेक्षां माझं सर्व राज्य तूं घे. पण मला सोड. "

अर्जुनानें द्रुपदाचें विनवणीचें भाषण ऐकलें आणि तो निर्विकार मुद्रेनें म्हणाला,

"द्रुपदा ! तूं क्षत्रिय आहेस ना ? जो युद्धासाठीं समरांगणांत उभा ठाकतो तो जयापजयाची पर्वा करीत नाहीं. कोणती तरी एखादी गोष्ट पदरीं यायचीच. त्याचं एवढं दुःख बाळगण्याचं काय कारण ? असे प्रसंग मोठमोठ्या योद्ध्यांवर आलेले आहेत. पण ते असे तुझ्यासारखे धैर्यच्युत झाले नाहींत. उलट आपल्या पराभवाचा दंड त्यांनीं सव्याज परत घेतला आहे. तुला तसं वाटत असेल तर तूं पुन्हां माझ्याशीं युद्ध कर."

पण द्रुपदाची पुन्हां लढण्याची छाती झाली नाहीं. तेव्हां तशाच अवस्थेंत द्रुपदाला घेऊन अर्जुनाचा रथ हस्तिनापुराच्या दिशेनें परत निघाला.

• •

# प्रतिज्ञेची पूर्तता

साऱ्या हस्तिनापुरांत एकच विषय चर्चिला जात होता, 'अर्जुनानें द्रुपदराजाला बांधून आणलें आहे!' राजा द्रुपद कांहीं सामान्य माणूस नव्हे; एका देशाचा सम्राट् आणि फार मोठा योद्धा. पण त्यालाहि अर्जुनानें बांधून आणलें ही गोष्ट सर्व हस्तिनापुरवासीयांना नवलाईची वाटत होती. अर्थात् त्याला अपवाद होताच. तो फक्त कौरवांचा!

हस्तिनापूरच्या प्रवेशद्वारापाशीं स्वागतोत्सव आयोजित केला होता. कौरवांच्या मनांतून ही गोष्ट व्हायला नको होती; पण भीष्माचार्यांनींच स्वागताची योजना आंखल्यामुळें त्यांचा नाइलाज झाला.

प्रवेशद्वार सजविलें होतें. तोरणें बांधलीं होतीं. मोठमोठे रंगीबेरंगी हार त्यावर लटकावले होते. प्रवेशद्वाराच्या पुढच्या अंगाला ध्वजस्तंभोवर विजयध्वज फडफडत होता. प्रवेशद्वारावरच्या नगारखान्यांत चौघडा वाजूं लागला. रस्त्यावर फुलांचे सडे घालण्यांत आले. दारापुढेंच सजवलेला प्रशस्त गजराज शुंडादंडांत विजयमाला घेऊन उभा होता.

अर्जुनाचा रथ प्रवेशद्वारापाशीं येतांच एकच जयजयकार झाला, "धनुर्धर पार्थाचा जयजयकार असो!" "विजयी अर्जुनाचा जयजयकार असो!" तो जयजयकार चालू असतांनाच निर-

निराळ्या वाद्यांच्या गजरांत दाराशीं झुलत असलेल्या गजराजानें विजयी अर्जुनाच्या गळ्यांत जयमाला घातली. रथांतून खालीं उतरलेल्या अर्जुनाला सुवासिनींनीं पंचारतीनें ओवाळलें.

भीष्माचार्य आणि विदुर पुढें झाले. ते दोघेहि आपल्या परिवारासह आले होते. भीष्माचार्यांना अर्जुनाच्या युद्धकौशल्याची जाणीव झाली होती. तर, महात्मा विदुराला पांडवांचें प्रेम अधिक असल्यानें अर्जुनाचा विजय विशेष कौतुकाचा विषय वाटला होता. दोघांनींहि पुढें होऊन नमस्कार करणाऱ्या अर्जुनाला आशीर्वाद दिला, "असाच विजयी हो ! चिरंजीव हो !"

विशेष प्रेमानें केलेल्या हस्तिनापुरवासीयांच्या कौतुकाचा स्वीकार करीत अर्जुनानें आपला रथ गुरुदेव द्रोणाचार्यांच्या निवासस्थानाकडे नेला.

द्रोणाचार्यांना ज्या वेळीं ही वार्ता समजली त्या वेळीं त्यांना द्रुपदाच्या राजसभेंत स्वतः उच्चारलेल्या प्रतिज्ञेची आठवण झाली. आणि त्या प्रतिज्ञेची पूर्तता आज आपल्या डोळ्यांसमोर घडणार, या कल्पनेनेंच त्यांच्या अंगावर हर्षाचे रोमांच उभे राहिले. त्यांनीं हेरलेला आणि तयार केलेला शिष्योत्तम अर्जुन हाच खराखुरा शिष्योत्तम आहे हें जगमान्य झालें होतें.

विजयी अर्जुनाचा रथ द्रोणाचार्यांच्या निवासस्थानापाशीं येऊन थांबला. अर्जुन खालीं उतरून शांतपणानें आंत गेला आणि त्याची वाट पहात उभ्या असलेल्या गुरूंना व गुरुपत्नीला त्यानें साष्टांग नमस्कार घातला. कर्तव्यपूर्तीच्या समाधानानें अर्जुनाच्या डोळ्यांतील आनंदाश्रूंनीं द्रोणाचार्यांचे पाय भिजवले. द्रोणाचार्यांच्याहि डोळ्यांत नकळत अश्रूंची दाटी झाली. अर्जुनाला प्रेमभरानें त्यांनीं उठविलें. छातीशीं धरून त्याला कुरवाळलें. गुरुशिष्यांची जोडी

कृतकृत्यतेच्या भावनेनें कृतार्थ झाली. द्रोणाचार्यांच्या परमोच्च आनंदाचा क्षण होता तो आणि अर्जुनाच्या कर्तव्यपूर्तीच्या समाधानाचा क्षणहि हाच होता.



गुरुपत्नी कृपीनेंहि अर्जुनाला मनापासून आशीर्वाद दिला. तोंवर द्रोणाचार्यांच्या निवासस्थानीं आंतील भागांत सगळेच येऊन बसले होते. भीष्माचार्य होते, महात्मा विदुर होते, कौरव होते, पांडव होते. सर्वांना द्रोणाचार्यांनीं बोलावून घेतलें होतें.

अर्जुन पुन्हां बाहेर गेला. त्यानें आपल्या रथावर बांधलेल्या सम्राट द्रुपदाला खालीं उतरवून घेतलें. तरीहि त्याचे हात बांधलेलेच होते.

अर्जुन त्याला घेऊन आपल्या गुरुदेवांसमीप आला. आचार्य द्रोणांपुढें बंदिवान द्रुपदाला बांधून आणून अर्जुनानें उभें केलें. द्रोण

अविचल दृष्टीनें तें दृश्य पहात होते. आपल्या प्रतिज्ञेची साक्षात् पूर्तता ते आपल्यासमोर पहात होते.

अर्जुन द्रोणाचार्यांना हात जोडून एवढेंच म्हणाला, "गुरुदेव, आपली गुरुदक्षिणा देऊन मी धन्य झालों आहें."

"सर्वदा विजयी हो शिष्योत्तमा!" द्रोणाचार्यांनीं मनापासून आशीर्वाद दिला.

बंदिवान राजा द्रुपद द्रोणापुढें खालीं मान घालून उभा होता. 'भिकारी ब्राह्मण' म्हणून आपण ज्याला हिणवलें त्याच्यापुढें आज आपल्याला आपल्या मुक्ततेची भीक मागावी लागत आहे याची जाणीव द्रुपदाला तीव्रतेनें झाली. महामूर्ख म्हणून धिक्कारलेल्या थोर अर्जुनानें आपल्याला बांधून आणलें तें या द्रोणाच्या तेजस्वी धनुर्विद्येच्या बळावर हेंहि त्याच्या लक्षांत येऊन चुकलें. पण आतां पश्चात्ताप करण्यापलीकडे त्याच्या हातीं काय होतें?

तथापि द्रुपद लीनपणें द्रोणाचार्यांकडे पहात म्हणाला, "आचार्य, आपली योग्यता मीं जाणली नाहीं. मी दिलेलं वचनहि पाळलं नाहीं. मी अपराधी आहें. माझ्या बाळपणींच्या वचनाप्रमाणं आपल्याला मी माझं अर्धं राज्य देण्यास तयार आहें."

"द्रुपदा! तुझं राज्य घेऊन माझ्यासारख्या ब्राह्मणाला काय करायचं आहे? मी मनांत आणीन तर मला प्राप्त झालेल्या विद्येच्या बळावर मी अनेक राज्यं जिंकून घेईन. पण त्याची अपेक्षा नाहीं." द्रोणांनीं गंभीरपणानें उत्तर दिलें.

"मग, द्रुपदाला अर्जुनाकरवीं बांधून आणण्याचा हा उद्योग आपण कशासाठीं करविलात, आचार्य?" भीष्मांनीं सहजच विचारलें.

"महाराज, प्रत्येक माणसाला स्वाभिमान असला पाहिजे. मी

दरिद्री ब्राह्मण असलों तरी तो मला होता आणि आहेहि. त्याला धक्का दिला या उन्मत्त सम्राटानें. त्याचें योग्य तें प्रायश्चित्त देणें हें माझें कर्तव्य होतें. आणि म्हणूनच या द्रुपदानें मला धिक्कारतांच मी त्या प्रतिज्ञेचा उच्चार केला होता ' मी माझ्या शिष्याकरवीं तुला बंदिवान करून माझ्यासमोर आणीन ! ' आणि त्या प्रतिज्ञेची पूर्तता... "

" या आपल्या शिष्योत्तमानं–अर्जुनानं केली, असंच ना ? " विदुरांनीं आचार्यांचें वाक्य पुरें केलें. " आणि मग या आपल्या प्रतिज्ञेच्या पूर्ततेनंतर द्रुपदाला परत पाठवायला आपली कांहीं अडचण नसावी. "

" अर्थातच ! " द्रोणाचार्य बोलले, " माझं त्याचं शत्रुत्व नाहीं. त्याच्या कर्तव्याची जाणीव त्याला करून द्यावयाची होती ती मीं योग्य तऱ्हेनं दिलेली आहे. माझं काम झालेलं आहे. आतां खुशाल त्याच्या राजधानीला त्याला परत जाऊं दे. "

" मग त्याला विलंब कशाला ? "

" त्याचा योग्य आदरसत्कार करूनच त्याला परत पाठविलं पाहिजे. कसं झालं तरी तो माझा बालमित्र आहे. आणि दुसरं म्हणजे आतां तो माझा पाहुणा आहे. मला माझा मित्रधर्म आणि गृहस्थधर्महि पाळला पाहिजे. " द्रोण बोलले.

" साधु ! साधु ! " भीष्मांनीं मान डोलविली.

• •

०६४२८ ... १५
क्रमांक ... ३५० ... १०/६/६७

99828
वा. वा.

IRBK-0111824